
पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ । अंक ३ रा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ ऑक्टोबर २०२२



# सत्यशोधक समाजाची 150 वर्षे

पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ ।
अंक ३ । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ ऑक्टोबर २०२२

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट | 8888541822

• **जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

**अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त**

• **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय : का जातेय तरुणाई आत्महत्येच्या दारात...** ३/ **कव्हर स्टोरी :** सत्यशोधक समाजाची १५० वर्षे – ५ / **हवा दिल्लीची :** 'राजपथ'चे झाले 'कर्तव्यपथ'; पण नाव बदलून इतिहास बदलणार कसा? – **विजय नाईक – १०** / **रेषा आणि फटकारे –** युक्रांद ८० – **संजय पवार – १४** / ग्रामगीतेतील लिंगभाव – **डॉ. प्रल्हाद दत्तराव भोपे – १८** / मराठवाड्यातील सामाजिक चळवळीची स्थित्यंतरे! – **बी.व्ही. जोंधळे – २२** / 'पन्नास खोके, समदं ओके' – **प्रा.डॉ. सुधाकर शेंडगे –२५**/ **व्यक्तिविशेष :** अण्वस्त्रविरोधात जागतिक शांततेचा प्रचार करणारे : मिखाईल गोर्बाचेव्ह – **डॉ. नागार्जुन वाडेकर – २८** / वाचनाने मला घडवले, मी कायम वाचकांचा ऋणी : प्राचार्य रा. रं. बोराडे – **आशय बबिता दिलीप येडगे – ३२** / **ग्रंथ परिचय –** जात वास्तवाची उकल मांडणारा कवितासंग्रह : सालं अतीच झालं! – **डॉ. मिलिंद विनायक बागुल – ३४** / **आज–कालचे प्रश्न – पंक्चरवाला – ३६.**

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# का जातेय तरुणाई आत्महत्येच्या दारात...

**स**रकारने तयार केलेल्या ज्या काही संस्था आहेत, त्यापैकी राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभाग (एनसीआरबी) अजूनही बऱ्यापैकी आपली विश्वासार्हता टिकवून आहे. या विभागाची अजून ईडी झालेली नाही. देशभरातील गुन्ह्यांची नोंद ठेवण्याचे काम एन.सी.आर.बी. करत असते. तिने उपलब्ध करून दिलेल्या माहिती आणि आकडेवारीवर लोकांचा बऱ्यापैकी विश्वास असतो. ही माहिती घेऊन सरकार धोरणे आखू शकते किंवा काही उपाययोजनाही करू शकते. एनसीआरबीने अलीकडे प्रसिद्ध केलेल्या एका माहितीमुळे समाज, देश आणि एकूणच राज्यकर्त्यांना धक्का बसू शकतो; पण एकूणच वाढत्या असहिष्णुतेमुळे तो बसण्याची शक्यताही क्षीण होत चालली आहे. या संस्थेने दिलेल्या माहितीनुसार आपल्या देशात मजूर, श्रमिक, नोकरदार आणि त्यातही युवक मजुरांच्या आत्मसंख्येत गेल्या वर्षी सात-साडेसात टक्क्यांनी वाढ झाली आहे. एकूणच आत्मसंख्येचा हा आकडा दीड लाखावर पोहोचला आहे. यात बारा टक्के नोकरदार किंवा मजूर आहेत. त्यांची संख्या पोहोचते चौदा हजारांवर. २०२० सालापेक्षा हा आकडा हजार-दीड हजाराने कमी असला, तरी आत्महत्या करणाऱ्यांची श्रेणी विभागली गेली असल्याने तो कमी वाटतो. चौदा हजार एवढाच आकडा चर्चेसाठी घेतला, की देशात कर्मचारी-मजुरांच्या दर महिन्याला आत्महत्या होतात एकशे सोळा. दिवसाला तीन-साडेतीन! विश्वगुरू होण्यास निघालेल्या देशातील आत्महत्यांचा हा काटेरी ऋतू चक्रावून सोडणारा आहे.



श्रमिकांच्या आत्महत्यांमागे अनेक कारणे असू शकली, तरी रोजगार गमावणे हे प्रमुख कारण आहे. रोजगार म्हणजे जगण्याचे साधन असते आणि तेच निसटून गेले, की जगायचे कसा, हा गंभीर प्रश्न तयार होतो. रोजगार आहे; पण वाढत्या महागाईसमोर तो नांगी टाकतो, टिकू शकत नाही. तुटपुंजा कमाईत जगता येत नाही किंवा कुटुंब जगवता येत नाही. दारिद्र्य, महागाई, बेकारी यांचा एक चक्रव्यूह तयार होतो. तो आत-बाहेरून पिळून काढतो आणि ‘जगण्यापेक्षा मरण बरे बा’ असे समजून तो आत्महत्येला म्हणजेच मृत्यूला सामोरा जातो. तो जगण्यापासून सटकतो; पण त्याचे कुटुंब वाऱ्यावर येते. त्यांच्यासमोरही असाच चक्रव्यूह तयार होतो. त्यांचे जीवन आणखी कठीण होते. कर्ता माणूस निघून जातो आणि मागे राहिलेल्यांच्या मानेवरही बेकारीची टांगती तलवार लटकते. हे झाले रोजगार मिळवून तो गमावून बसलेल्यांचे! अशांची संख्या खूप म्हणजे खूपच आहे. वाढती स्पर्धा, यांत्रिकीकरण, नफेखोर आणि नको तेवढी पिळवणूक करणारी संस्कृती, महामारी, कंत्राटी

पद्धती, अशा अनेक गोष्टींमुळे मुठीत आलेला रोजगार सटकून जातो आणि जगण्यासाठी तयार केलेला पिरॅमिड पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळतो. जगण्याचे साधन राहत नाही आणि ते संपले, की जगण्याचे कारणही दुर्मीळ व्हायला लागते. सब कुछ खलास-खत्म! यासारखे काहीतरी विपरीत घडायला लागते. मरणाचे आकडे फुगू लागतात. या फुगत्या आकड्यांकडे समाज आणि शासनाचे लक्ष जात नाही. देशाला धावते-पळते ठेवण्याच्या प्रयत्नातही आत्महत्यांकडे दुर्लक्ष होते किंवा प्रश्नाला हात घालून उत्तर शोधणे अवघड जाते. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर चर्चा होतात. काही चिकटपट्ट्याही तयार होतात. त्यांच्या प्रश्नांचा विचार करणे आवश्यकच आहे; पण त्या तुलनेने नोकरदारांच्या आणि तरुणांच्या आत्महत्यांकडे कुणाचे लक्ष जात नाही. अहवालातील आकड्यातच त्या घर करून बसतात. त्यांच्यासाठी कुठले पॅकेज येत नाही. देश तरुणांचा आहे, असे आपण गौरवाने, अभिमानाने सांगत असतो; पण देशाचा कणा आणि वैभव असलेल्या तरुणाईला आत्महत्येसारख्या अमानवी गोष्टीला सामोरे जावे लागत असेल तर?

बेकारीत सतत होरपळत राहणाऱ्या आणि उपजीविकेच्या साधनांपासून दूर असणाऱ्यांची कैफियत वेगळी. शिकलेल्या आणि न शिकलेल्या किंवा अर्ध शिकलेल्या तरुणांची कैफियत वेगळी. त्यांच्या प्रश्नांना वेगवेगळी किनार आहे. मागेल त्याला, मागेल तेव्हा, मागेल तिथे आणि मागेल तेवढे काम, अशा घोषणा बहुतेक पक्षांनी केल्या; पण त्या वास्तवात येऊ शकल्या नाहीत. रोजगार हमीतून कामे तयार करण्यात आली; पण त्यांची संख्या कमी, त्याची अंमलबजावणी सदोष असल्याने ती योजना महात्मा गांधींच्या नावाने कागदावरच चालत राहिली. जे सुशिक्षित बेकार आहेत त्यांना नोकऱ्या देण्याचे आश्वासन दर निवडणुकीत दिले जाते. 'घरटी नोकरी' अशी घोषणा होते आणि ती करणारे मतांचे मालक होतात. निवडणुका संपल्या, की लाखो-कोट्यवधी तरुणांची मनगटे रिकामीच राहिलेली दिसतात. त्यात भर पडत जाते. नोकऱ्या मागणाऱ्यांची संख्या वाढते आणि नोकऱ्यांची संख्या मात्र कमी होत जाते. एक दुष्टचक्र तयार होते. ते या तरुणांना भेदता येत नाही. आपल्याकडे पुजाऱ्यांना, साधूंना, गाई पाळणाऱ्या किंवा त्या जगवणाऱ्यांना, स्वातंत्र्यसैनिकांना, म्हाताऱ्या-कोताऱ्यांना वीतभर मानधन मिळते. ते शेळीच्या शेपटासारखे असते. ढुंगण लपवता येत नाही आणि तेथे बसलेल्या माशाही पळवता येत नाहीत. गंमत म्हणजे बेरोजगार तरुणांच्या वाट्याला हे थोटूक वाटावे, असे शेपूटही येत नाही. त्यांच्या जगण्याचा अधिकार राज्यघटनेने मान्य केला आहे; पण हे जगणे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न होत नाही.

नोकऱ्याच न मिळणे आणि मिळालेल्या निघून जाणे, अशा चक्रात अनेक जण भरडले जात आहेत. आत्महत्या करणाऱ्या नोकरांच्या कुटुंबीयांना कसलीही भरपाई मिळत नाही. फक्त आत्महत्येचा आकडा अहवालात वाढतो. नव्या भांडवलशाहीने जगभरातल्या युवकांना रोजगार देण्याचे मान्य केले होते. भारतात तर भयमुक्त, भूकमुक्त, बेकारीमुक्त समाज तयार करण्याचे आश्वासन दिले होते. नवे तंत्रज्ञान खूप नोकऱ्या घेऊन येईल, असे सांगितले जात होते. प्रत्यक्षात उलटेच घडते आहे. शेअर बाजारात बैल उधळावा, तशी बेकारी उधळत आहे. नोकऱ्या नाहीत, ज्या आहेत त्या कंत्राटी, ज्या कंत्राटी आहेत तेथे पुरेशे वेतन नाही, अशी स्थिती आहे. यावर मात करण्यासाठी कुशल भारत म्हणजे स्किल इंडियासारखा अचाट प्रयोग करण्याचा प्रयत्न होतो. काही मिळवायचे आहे तर तंत्रज्ञान आत्मसात करा, असे सांगितले जाते. अर्थात, हे सारे बीपीएलवाल्यांसाठी आहे. वरची मुले वर जातात आणि खालची स्किल इंडियात लटकतात. वर कोणी आणि खाली कोणी राहायचे, हेही जणू अधोरेखित केल्यासारखे आहे. बेकारी काही अपोआप आलेली नाही, तर माणसाऐवजी यंत्रात गुंतवणूक करण्याच्या नव्या भांडवलशाहीच्या नफेखोर वृत्तीतून आली आहे. भांडवलशाहीची भूक कधी भागणार, की ती वाढतच जाणार, हे फक्त तिलाच ठाऊक असल्याने इतर काही बोलू शकत नाहीत.

जगभरातील तरुणाई पंख फुटत असताना किंवा ते



फुटण्यापूर्वीच बेकारीचा शिक्का आपल्या कपाळावर घेऊन ती फिरते आहे. शिक्का तापला आणि त्याचे चटके वाढले, की ते मरणाचा मार्ग शोधू लागते. अशा परिस्थितीत म्हणजे खंगत चाललेली युवा पिढी घेऊन कोणता देश फार मोठी मजल मारू शकत नाही. भांडवलशाही मजल मारू शकते, बेकार नाहीत. तरुण बेकारांना जगण्याच्या प्रवाहात न्यायचे कसे आणि जगणे सुंदर असते हे त्यांना सांगायचे कसे? पाच वेळा 'प' या अक्षराचा वापर करून पंचप्राण नावाची रुद्राक्षाची माळ बनवणाऱ्यांनाही याविषयी फारसे देणे-घेणे नाही. सर्वांनाच तरुणांचा वापर कडीपत्त्यासारखा करायचा आहे. आत्महत्या केलेल्यांसाठी शोक व्यक्त करण्यास कुणाला सवड नाही. देश वाहून नेणाऱ्या खांद्यांनाच बेकारीची कीड लागली असेल किंवा ठसठसणारे करट खांद्यावर फुलत असेल, तर काय आणि कसे घडेल, याचा समाजाने आणि तरुणांनीच विचार करायला हवा. मृगजळ तयार करण्याचे कंत्राट सातत्याने घेणाऱ्यांच्या मागे आपण धावतोय, की आपले जीवनमार्ग आपण तयार करतो आहोत, हा तो प्रश्न आहे. याचे उत्तर राजस्थानातील कोट्टामध्ये मिळत नाही, तर ते आपल्यालाच शोधावे लागते. ●●●

कव्हर स्टोरी

# सत्यशोधक समाजाची 150 वर्षे

**क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणेतून २४ सप्टेंबर, १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. या घटनेला २४ सप्टेंबर, २०२२ रोजी दीडशे वर्षे पूर्ण झाली आहेत. नवा माणूस आणि नवा समाज घडवण्यासाठी स्थापन झालेल्या या संस्थेविषयी दीडशे वर्षांपूर्वी महात्मा फुले यांनीच प्रसिद्ध केलेला अहवाल वाचकांसाठी मुद्दाम येथे देत आहोत. या अहवालात समाज स्थापनेची उद्दिष्टे, त्यांचे स्वरूप, रचना याविषयी सविस्तर माहिती आहे.**

*संपादक*

**पुणे सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट**

ता. २४ सप्टेंबर, सन १८७३ पासून ता.२४ सप्टेंबर, सन १८७५ पावेतो

**दोन वर्षांचा रिपोर्ट**

ता. २४ सप्टेंबर, सन १८७५ पासून ता. २४ सप्टेंबर, १८७६ पावेतो

**एक वर्षाचा रिपोर्ट**

**सत्यशोधक समाजाकडील मॅनेजिंग कमिटीच्या हुकुमावरून**

ज्ञानप्रकाश छापखान्यात छापले.

ता. २० मार्च, सन १८७७ इ.




**सत्यशोधक समाज**

समाजाची दोन वर्षांची म्हणजे समाज स्थापन झाल्या दिवसापासून आजतागायत झालेल्या सर्व प्रकारच्या वृत्तांताविषयी हकीगत.

(१) ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादिक लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकांस मुक्त करण्याकरिता व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारे आज हजारो वर्षे ते शूद्र लोकांस नीच मानून गफलतीने लुटीत आले आहेत, यास्तव सदुपदेश व विद्याद्वारे त्यांस त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरिता म्हणजे धर्म व व्यवहारासंबंधी ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथांपासून त्यांस मुक्त करण्याकरिता काही सुज्ञ शूद्र मंडळींनी हा समाज तारीख २४, माहे सप्टेंबर, १८७३ इसवी रोजी स्थापन केला. या समाजात राजकीय विषयांवर बोलणे अजिबात वर्ज्य आहे.

(२) राजमान्य कृष्णराव भालेकर व रावजी शिरोळे वगैरे भांबुर्डेकर मंडळींनी समाजाचे सत्य आणि स्तुत्य उपदेश ऐकून सभासद झाले. इकतेच नाही; पण त्यांनी मौजे भांबुर्डे, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे समाजाची शाखा स्थापून लोकांना कविता म्हणजे अभंग व दिंड्या याद्वारे उपदेश करून कित्येक गृहस्थांस सभासद केले आणि हल्ली दिवसानुदिवस त्यांचा क्रम उत्तम प्रकारे चालू असून उत्तरोत्तर उत्कर्ष पावत आहे.

(३) मौजे हडपसर येथेही सभासद बरेच असून उपदेशाचा क्रम साधारण प्रकारे चांगला चालू आहे. तसेच मौजे पर्वती येथील पोलीस पाटील वगैरे मंडळी समाजाचे स्तुत्य हेतू पाहून या कामी मनःपूर्वक झटत आहेत.

(४) राजमान्य राजश्री रामय्या व्यंकय्या अय्यावारू, नससिंगराव



सायबू वडनाळा, जाया यल्लाप्पा लिंगू आणि व्यंकू बाळोजी कालेवार वगैरे मंडळींनी शहर मुंबई येथे समाज स्थापून लोकांना उपदेश करून बरीच सुधारणा चालविली आहे. या परोपकारी आणि उदार सद्गृस्थांविषयी पुढे मजकूर येईल.

(५) राजमान्य राजश्री गोविंदराव बापूजी भिलारे, मौजे भिलार, तालुका जावळी, जिल्हा सातारा यांनी आपले गावी समाजाची शाखा स्थापून गावातील एकंदर रहिवासी लोकांस उपदेश केल्यावरून गावकरी आणि आसपासचे गावचे लोक सभासद झाले. याशिवाय नेमलेले दिवशी ईश्वराची प्रार्थना करणे व दुसऱ्या काही सुधारणा करण्याविषयी अंतःकरणपूर्वक झटत आहेत याचा उल्लेख पुढे येईल.

(६) समाजाचे हातून जी जी कृत्ये घडून आली ती येणेप्रमाणे :-

**लग्ने :**

लग्न करतेसमयी ब्राह्मण, भट, भिक्षुक इत्यादिक शूद्र लोकांची लग्ने यथासांग न लाविता केवळ आपले हिताकडेस लक्ष देऊन शूद्र लोकांस साधारणपणे खोटेखोटे हक्क सांगून मांडवखंडणी, लज्जाहोम, साडे आणि कंकण सोडणे वगैरेबद्दल शक्ती नसतानाही केवळ जुलूम करून गरीब शूद्रांचे द्रव्य हरण करितात आणि ते जर देण्यास त्यास सामर्थ्य नसेल, तर लग्ने लावायची तशीच ठेवितात. अशा प्रकारच्या पुष्कळ गोष्टी विदित आहेतच. याजकरिता आणि यथासांग लग्नविधी होण्याकरिता व लग्नात ज्या वाईट चाली आहेत, त्या बंद करण्याकरिता आणि ब्राह्मणांचे सदरील जुलमापासून मुक्तता व्हावी; या उद्देशाने ब्राह्मणास न बोलविता व कित्येक लग्नासंबंधी ज्या वाईट चाली होत्या त्या बंद करून समाजाचे मतांप्रमाणे जी लग्ने लागली ती येणेप्रमाणे -

**पहिले लग्न**

**वर–** सीताराम जबाजी आल्हाट, राहणार पुणे, पेठ जुना गंज.

**वधू –** राधाबाई, बाप ग्यानोबा निंबणकर, राहणार सदर, या उभयतांनी आपले लग्न ब्राह्मणांच्या साह्याशिवाय या समाजाचे मताप्रमाणे ता. २५ माहे डिसेंबर सन १८७३ इसवी रोजी केले. या स्तुत्य कृत्यास ज्या सद्गृहस्थांनी आणि सभ्य स्त्रियांनी उभय पक्षांची गरीब स्थिती पाहून उदार आश्रय दिल्यावरून ज्यांस त्रास सोसावा लागला, त्यांची नावे पुढीलप्रमाणे -

१. सौभाग्यवती सावित्रीबाई भ्रतार जोतीराव फुले.

२. सौभाग्यवती बजूबाई भ्रतार ग्यानोबा निंबणकर.

शिवाय दुसरे चार-पाच गृहस्थांनी उदार आश्रय देऊन संकटे व त्रास सहन करून कार्यसिद्धी केली; परंतु सदरील स्त्रियांपैकी सौभाग्यवती बजूबाई भ्रतार ग्यानोबा निंबणकर ह्या अद्यापपावेतो मतलबी कार्यसाधू यांचे उपदेशावरून आपले भ्रतारापासून त्रास सोशीत आहेत.

**दुसरे लग्न**

**वर –** ग्यानोबा कृष्णाजी ससाने, राहणार मौजे हडपसर, तालुका हवेली, जिल्हा पुणे.

**वधू –** काशीबाई, बाप नारायणराव विठोजी शिंदे, राहणार मौजे पर्वती, तालुका हवेली, जिल्हा पुणे.

हे लग्न सिद्धीस जाण्याकरिता काही सभ्य सद्गृहस्थांनी उत्तम प्रकारे मदत करून कार्यसिद्धी तारीख ७ माहे मे सन १८७४ इसवी रोजी जगन्नियंत्या परमेश्वराच्या कृपेने केली.

हे लग्न सिद्धीस न जावे म्हणून भवानी पेठेतील एका दुराग्रही अडत्याने मौजे हडपसर येथे जाऊन वराचे आप्तवर्गास सांगून त्यांची मने इतकी भरविली की, अखेरीस हे लग्न हडपसर येथे न करता पुणे मुक्कामी करणे भाग पडले. अशा समयी पुणे मुक्कामीही लग्न सिद्धीस जाऊ नये म्हणून मतलबी लोकांच्या सांगण्याप्रमाणे वागणारे मारुती सटवाजी फुले व तुकाराम खंडोजी फुले या उभयतांनी सदरील लग्न होते समयी मुद्दाम आपल्या अशक्त मुलांची लग्ने काढून जितकी म्हणून विघ्ने होतील तितकी केली. त्या नीच कर्माचा उच्चार येथे करणे प्रशस्त नाही म्हणून त्याजविषयी तपशीलवार हकीगत दिली

नाही. ह्या प्रसंगी फारच त्रास झाला आणि या दोघांच्या व स्वहित साधणाऱ्या साधू लोकांच्या सांगण्यावरून दुसरे अज्ञानी लोकांच्या विघ्नामुळे हे लग्न राहावयाचेच. परंतु अशा प्रसंगी राजमान्य राजश्री बाबाजी राणोजी फुले ह्या गृहस्थानी अजमासे २५० मनुष्य आपले आप्त वर्गापैकी आणून सदरी लिहिलेली दिवशी कार्यसिद्धी परमेश्वर कृपेने केली. याचप्रमाणे बंदोबस्ताचे बाबतीत रा.रा.पो. राजन्ना लिंगू व गंगाराम भाऊ म्हस्के या उभयतांनी प्रयत्न करून स्वतः झटून पोलिसांची मदत देवविली. या वेळेस मिठगंज पेठेतील मांग, महार लोकांनी व याशिवाय येथील रहिवासी मोमीन लोकांनी योग्य मदत झटून केली. ती अशी की, ज्या ज्या वेळेस सर्वथैव स्वहित साधू लोकांनी सदरील कृत्याबद्दल समाज मोडावा म्हणून विघ्ने केली ते समयी त्या लोकांची मदत देण्याचे कामी कमाल झाली. हे लोक या समाजाचे सभासद नसतानाही केवळ समाजाचा आदेश ऐकून त्यांनी या कामी अनिवार मदत केली. याकरिता आम्हांस त्यांचे आभार मानल्याशिवाय राहवत नाही. ही दोन लग्ने कशा प्रकारे झाली आणि तत्संबंधी कोणत्या वाईट चाली बंद केल्या याजबद्दलची एकंदर हकीगत समाजातील पुस्तकांत लिहिली आहे.



**१. सदरहू लोकांचे बुद्धिपरस्पर अविचारामुळे जी लग्ने झाली त्यापैकी एक नवरी मुलगी वयाने दोन वर्षांची असून लग्न झाल्यानंतर थोडकेच दिवसांनी वारली. या अविचाराबद्दल रा. तुकाराम सोनाजी भुजबळ यास निदान सुमारे ४०० रुपयांचे नुकसान करून घ्यावे लागले.**

रा.रा. गोविंदराव बापूजी भिलारे पाटील, मौजे भिलार, ता. जावळी, जि. सातारा यांजविषयी वरील कलमात हकीगत कळवू असे लिहिले ती ही की, गृहस्थ समाजाचे सभासद आहेत. या गृहस्थांनी येथील समाजाचे सभासदांची तीळप्राय मदत न घेता पहिल्या वर्षी ब्राह्मणाचे साहाय्यावाचून ६ लग्ने केली आणि दुसरे वर्षी ५ करविली व यापैकी एक दोन लग्ने तर स्वतःचे द्रव्ये खर्च करून केली.

(७) रा. ग्यानू मल्हारजी झगडे यांनी समाजाची बाल्यावस्था पाहून मेस्त्रीच्या कामावर असल्या कारणाने यांनी अदमासे पन्नास मनुष्यास समाजाचे खरे हेतू सांगितल्या कारणाने कित्येक सभासद झाले. या कारणाकरिता त्यांच्यावरील ब्राह्मण अधिकारी यांनी फारच त्रास दिल्यामुळे अखेरीस त्यास नोकरी सोडणे भाग पडले. यांचे उपदेशामुळे झालेले सभासदांनी व यांनी पैशाची बरीच मदत केली. शिवाय थोडे दिवसांपूर्वी मौजे घोरपडी येथे एक पुनर्विवाह ब्राह्मणाशिवाय केला व ते दिवसानुदिवस समाजाचा उत्कर्ष ज्या योगाने होईल ते उपाय करीत आहेत.

(८) रा.रा. भिकोबा बाळाजी साळी या गृहस्थांनी समाजातील मुलीस विद्याभ्यास करण्याची गोडी लागून उत्तेजन यावे एतदर्थ चोळीचे खण बक्षीस दिले. शिवाय या गृहस्थांनी दुसरे मंडळीस सत्याचा उपदेश करून काही लोकांस कुमार्गापासून सोडवून सुमार्गास लाविले. ज्याप्रमाणे मुलींस विद्येची गोडी लागली म्हणून बक्षीस दिले त्याप्रमाणेच सभासदांनी मुलास ऑईल क्लॉथ म्हणजे मेन कापडाची डगली करून दिली.

(९) या समाजातील काही सभासदांनी व त्यांचे कुटुंबांनी काही धर्मभोळ्या चाली बंद केल्या. त्या ह्या की, हरतालिकेचे घेणे, उपोषण, भाद्रपद शु. ४ म्हणजे गणेश चतुर्थी प्रीत्यर्थ उत्साह, ऋषी पंचमी, भाद्रपद वद्य पक्षामध्ये ती प्रीत्यर्थ ब्राह्मणास शिधा देऊन, पादपूजन करून अंगुलाचे तीर्थ उद्धार होण्याकरिता घेणे आणि फाल्गुन शु. १५ स हुताशनीचा उत्सव करून शंखध्वनी करणे.

रा. गणपतराव राजाराम फुले, सभासद, यांनी आपले मातोश्रीचे दशपिंड ब्राह्मणाशिवाय केले. याप्रमाणे रा. गणपत तुकाराम आल्हाट हेही सभासद असून त्यांनी आपल्या आजीचे पिंडदान ब्राह्मणाशिवाय केले. या उभयतांनी धैर्याने आणि पूर्ण समजुतीने स्तुत्य कृत्ये केली. हे पाहून समाजातील कित्येक लोकांनी अशा चांगल्या कृत्यास उत्तेजन द्यावे हे किती महत्त्वाचे आहे हे सांगावयास नको.

याचप्रमाणे रा.रा. नारायणराव तुकाराम नगरकर, समाजाचे चिटणीस, यांचे वडील बंधूंनी आपल्या भावजयीचे एकंदर उत्तरकार्य ब्राह्मणाशिवाय स्वतः केले. या शहरात हे गृहस्थ बरेच लोकांस माहीत असून या समाजाचे सभासद नसता हे स्तुत्य कार्य त्यांनी आपले स्वतःचे शोधावरून केले. अशाच प्रकारच्या ज्या दुसऱ्या काही दूषणास्पद असणाऱ्या धर्मभोळ्या बनावट चाली अजिबात नाहीशा केल्या.

(१०) सदरील धर्मभोळ्या चाली बंद होतात न होतात इतक्यात ब्राह्मण, भट, भिक्षुके इत्यादिकांस असे वाटले की, जे काही आजतागायत आपले गुह्य होते व जो मोठेपणा होता आणि ज्यांचे योगाने आपला उदरनिर्वाह होत आहे, तो आता हा समाज जर राहील तर बंद होऊन आपले वर्चस्वही राहणार नाही. या कारणावरून ज्या युक्ती-प्रयुक्तीने हा समाज नाशाप्रत पावेल ते करणे अवश्य आहे असे मनात आणून कित्येक अज्ञानी मुख्य मुख्य शूद्र लोकांस खोट्या मसलती देऊन त्यांची मने इतकी भ्रष्ट केली की, जे सभासद

आहेत त्याजवर बहिष्कार ठेवावा आणि दुसरे त्यास जितका त्रास देववेल तितका द्यावा अशा प्रकारचा क्रम चालू असतानाच इतक्यात रा.रा. बापूजी हरी शिंदे, हेड अकौंटंट, जि. बुलढाणा यांनी समाजाचे खरे व स्तुत्य हेतू पाहून सभासद झाले आणि मुंबई येथील कामाठीपुऱ्यातील अठरा श्रीमान गृहस्थांनी समाजाचे खरे हेतू पाहून सभासद झाले. या योगाने समाजाचा उत्कर्ष होऊन दुष्ट लोकांचे प्रयत्न व्यर्थ केले. सदरील सभासदांपैकी रा.रा. रामय्या व्यंकय्या अय्यावारू व व्यंकू बाळाजी कालेवार या उभयतांनी समाजाचे हेतू आणि गरीब, अज्ञानी शूद्र लोकांची संकटे व भट-भिक्षुक आणि सरकारी ब्राह्मण कामगार यांजपासून त्यास जे त्रास सोसावे लागतात ते आमच्या दयाळू इंग्रज सरकारास जाहीर करण्याकरिता बाराशे रुपयांचा छापखाना दिला.



रा.रा. व्यंकू बाळाजी कालेवार हे समाजाचे सभासद होण्यापूर्वी भाद्रपद मासी गणेश चतुर्थीचे उत्सवाचे वेळी हजारो ब्राह्मणांस पक्वान्न भोजन व दक्षणा देत असत. तो गणपती प्रीत्यर्थ उत्सवाचा खर्च ते समाजाचे सभासद झाल्यापासून बंद करून सर्व जातीचे पंगू, अंध, थोटे व लुळे अशा हजारो लोकांस पक्वान्न भोजन देण्याकडेस व स्त्रियांस प्रत्येकी लुगडी व चोळी आणि प्रत्येक पुरुषास दुहेरी धोतर, बंडी आणि टोपी अशा स्तुत्य कामांकडेस खर्च करून त्यांनी पंगू लोकांस संतुष्ट करण्याची सुरुवात केली. याचप्रमाणे जाया यल्लप्पा लिंगू हे प्रतिवर्षी दीपवाळीस ब्राह्मण भोजन व दक्षिणा देत असत, तो खर्च सभासद झाल्यापासून कमी करून दरवर्षी पंचवीस रुपयांचे वर्षासन समाजातील मंडळींची जी मुले मॅट्रिक्युलेशन परीक्षेस पास होतील, त्यापैकी पहिल्यास सोन्याचे पदक देण्यास्तव दिले आहे. मुंबईकर सभासदांनी रा.रा. जोतीराव फुले यांस गतवर्षी मुंबईस बोलावून नेले आणि तेथे त्यांच्याकडून काही व्याख्याने सत्याविषयी देवविली. त्या समयी रा.रा. व्यंकू बाळाजी कालेवार आणि काराडी लिंगू या उभयतांनी समाजाचे सन्मानार्थ मेजवान्याप्रीत्यर्थ पुष्कळ खर्च केला. रा.रा. नरसिंगराव सायबू वडनाला यांनी त्यास पोषाख दिला. मुंबईकर सद्गृहस्थांनी या स्तुत्य कृत्यास उदार आश्रय दिला. हे समाज विरुद्ध असणाऱ्या धूर्त लोकांस समजताच पुन्हा सभासदास आणि त्यांचे कुटुंबातील मनुष्यास त्रास देऊ लागले. तो असा की, रात्री चौर्यकर्म करणाऱ्या लोकांप्रमाणे दगड मारणे, घालून पाडून बोलणे याशिवाय दुसरी इतकी नीच वर्तवणूक दाखविली की, ती या रिपोर्टात घेणे प्रशस्त नाही. हा प्रकार सुरू असता रा.रा. विश्राम रामजी घोले, असिस्टंट सर्जन व रा.रा. लक्ष्मणराव हरी शिंदे, चीफ कॉ. हे समाजाचे सभासद होताच या दुष्ट लोकांचे बंडाचा बीमोड होऊन त्रास अगदी बंद झाला. या गृहस्थांपैकी रा.रा. विश्राम रामजी घोले हे अज्ञानी, शूद्र लोकास आपण या जगात कोणते रीतीने वागावे, आपणास जगात हक्क परमेश्वराने कोणते दिले आहेत याजबद्दल समाजाचे स्तुत्य हेतू कळविण्याचे काम अंतःकरणपूर्वक करीत आहेत.

रा.रा. नारायणराव गोविंद कडलक व नारायणराव तुकाराम नगरकर हे करावयास लागले तो आजपावेतो ते मनःपूर्वक काम करीत आहेत.

(११) या समाजाचे खरे हेतू जाणून सत्यदीपिका म्हणजे केवळ सत्याचा दीपकच या पत्राने समाज सुरू झाल्या दिवसापासून आजतागायत जी जी मदत अवश्य आणि सत्यास अनुसरून द्यावयाची ती दिली व ज्या ज्या सभासदांनी सत्यास स्मरून जी जी स्तुत्य कृत्ये केली ती छापून प्रसिद्ध केली. याचकरिता समाज या पत्रकर्त्याचे फारच आभार मानून सर्व शक्तिमान जगाचा उत्पन्नकर्ता त्यांस अशी प्रार्थना करितो की, ते पत्र चिरकाल चालून असाच सत्याचा प्रकाश जगभर होवो. सुबोध पत्रिका म्हणजे सदुपदेश करणारे पत्र. ह्याचे आणि समाजाचे हेतू काही अंशी सारखेच आहेत. यामुळे बंधुवर्गात जशी एकमेकास मदत करितो त्याप्रमाणे ह्या पत्रकर्त्याने कित्येक वेळी केली. याबद्दल समाज ज्यांचा आभारी आहे. त्याचप्रमाणे 'प्रमोद सिंधू' आणि 'इंदु प्रकाश' या दोन पत्रकर्त्यांनी समाजाचे स्तुत्य हेतू प्रदर्शित केले. याजमुळे समाज त्यांचे फार उपकार मानीत आहे.

(१२) समाज स्थापन करण्याचे कामात रा.रा. विनायक बापूजी भांडारकर व विनायक बापूजी डेंगळे आणि सीताराम सखाराम दातार यांनी उत्तम प्रकारे मदत केली. त्याचप्रमाणे रा.रा. रामशेठ बापूशेठ उरवणे यांनी बरेच शूद्र लोकांस समाजाचे स्तुत्य व सत्य हेतू कळवून त्यांस समाजाचे सभासद केले व नंतर आपणही सभासद झाले. रा. धोंडीराम नामदेव व पंढरीनाथ आबाजी चव्हाण या उभयतांनी धूर्त लोक, अज्ञानी शूद्र जनांस कसे लुटतात याजवर आपले शक्त्यनुसार उपदेश केले. पैकी पहिले गृहस्थानी कविताद्वारे आणि दुसरे गृहस्थ निबंधाद्वारे अज्ञानी जनास उपदेश करीत आहेत. त्याचप्रमाणे रा. कृष्णराव पांडुरंग भालेकर व नारायणराव रामजी पांढरे वेगैरे भांबुर्डेकर मंडळींचाही असाच क्रम चालू आहे.

रा.रा. विठ्ठल नामदेव गुठाळ यांनी रा. महादेव केशवराव सूर्यवंशी यास उपदेश केल्यावरून त्यांनी आपले घराची वास्तुशांती ब्राह्मणाच्या साह्याशिवाय केली. या कारणामुळे गुठाळ यांची सर्कत ब्राह्मण लोकांचे सांगण्यावरून त्यांचे भागीदार यांनी काढली. हे इतकेच करून स्वस्थ बसले असे नाही; परंतु कित्येक व्यापारासंबंधी त्यास त्रास देऊन ज्या योगाने त्यांचे नुकसान होईल ते उपाय त्यांनी केले. यामुळे गुठाळ यांना थोडे दिवस वाईट स्थितीत राहावे लागले. अखेरीस त्यांस इतकी विपत्ती प्राप्त झाली की, आपल्या मुलाचा विद्याभ्यास चालू ठेवण्याचे सामर्थ्य त्यांना राहिले नाही. हा मजकूर रा.रा. गंगाराम भाऊ म्हस्के यास समजला. ह्या सद्गृहस्थांनी त्या

मुलास दरमहा तीन रुपये स्कॉरलशिप १ वर्षपर्यंत देण्याचे कबूल केले. ही स्कॉलरशिप गुठाळ यांनी पाच महिने घेतली. कारण पुढे त्यांचा व्यापार चालू होताच यांनी होऊन असे कळविले की, आता परमेश्वरकृपेने बरे चालले आणि जी काही मदत केली याजबद्दल मी आभारी आहे, असे रा. गंगाराम भाऊस कळवून स्कॉलरशिप घेण्याचे बंद केले. हे गृहस्थ समाजाचे सभासद नसून त्यांनी अशाप्रसंगी मदत केली याजमुळे आम्ही त्यांचे आभारी आहोत.

विद्यार्थी घनश्याम किराड ह्याचा अभ्यास मॅट्रिक्युलेशन परिक्षेपर्यंत होऊन यांचे घरच्या गरिबीमुळे त्याचा अभ्यास बंद पडण्याचे वेळी रा.रा. हरी रावजी चिपळूणकर यांनी मेहेरबानी होऊन दरमहा ५ रुपयेप्रमाणे स्कॉलरशिप नऊ महिनेपर्यंत देण्याचेबूल केले. अशा अडचणीच्या वेळी ह्या समाजातील गरीब विद्यार्थ्यास योग्य कारणास्तव साह्य दिले म्हणून समाज त्यांचा फार आभारी आहे आणि आम्ही अशी आशा करतो की, हे सद्‌गृहस्थ समाजातील कोणासही जर असे प्रसंग येतील तर पुढेही मदत करण्यास मागे पाऊल घेणार नाहीत, अशी आमची पूर्ण खात्री आहे. ह्यांचा उदार आश्रय असल्यामुळे समाजात हे एकूण हे एक भूषण मानले पाहिजे.

समाजाकडून ज्या विद्यार्थ्यांस स्कॉलरशिप मिळतात त्या विद्यार्थ्यांची विद्येमध्ये कितपत प्रगती झाली हे समाजास समजावे म्हणून त्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे काम रा.रा. पो. राजन्ना लिंगू प्लिडर यांनी मेहेरबानी करून पत्करले. सबब समाज त्यांचे फार आभार मानीत आहे.

| **जमा तपशील** | **रक्कम रु. आ. पै.** |
|---|---|
| रा.रा. हरी रावजी चिपळूणकर | ३७–८–० |
| रा.रा. जोतीराव गोविंदराव फुल | ३४–६–० |
| रा.रा. जाया मलाया लिंगू | २५–०–० |
| सौ. बजूबाई निंबणकरीण (लग्न प्रीत्यर्थ) | २०–०–० |
| सौ. सावित्रीबाई फुले (सदर) | १५–०–० |
| रा.रा. गंगाराम भाऊ म्हस्के | १५–०–० |
| रा.रा. ग्यानोबा झगडे | १३–३–० |
| रा.रा. माधवराव मळोजी झगडे (लग्न प्रीत्यर्थ) | ७–०–० |
| रा.रा. ग्यानू कृष्णाजी ससाणे | ५–७–० |
| रा.रा. दावबा बापू शिंदे (लग्न प्रीत्यर्थ) | ५–०–० |
| रा.रा. भिकोबा बाळाजी सुकळे साळी | ४–०–० |
| रा.रा. ग्यानोबा लोंढे | ३–२–० |
| रा.रा. तुकाराम तात्या मुंबईकर | २–१०–० |
| सभासदाकडून दोन रुपयांच्या आतील आलेल्या रकमा मिळून | ३४–१२–० |
| | २२२–०–० |

| | |
|---|---|
| **खर्चाचा तपशील** | **रक्कम रु. आ. पै.** |
| स्कॉलरशिप खर्च | ५२–८–० |
| लग्नासंबंधी बक्षिसाद्वारे मदत | ४७–०–० |
| किरकोळ खर्च | ४१–१३–३ |
| छापखान्यासंबंधी खर्च | ४१–०–६ |
| समाजाच्या शाखांस पुस्तके | ९–४–० |
| बक्षीसे दिले त्याचबद्दल रा. विठ्ठल महादेव गुठाळ यास मदत | २५–०–० |
| मुलास कपडे बक्षीस दिल्याबद्दल | ४–१३–० |
| आज तारखेस शिल्लक | ०–९–३ |
| | २२२–०–० |

**जोतीराव गोविंदराव फुले**
स. शो. स. खजिनदार

ह्या प्रसंगी आम्हाला लिहिण्यास आनंद वाटतो, की आपल्या हल्लीच्या परमदयाळू सरकारने हिंदुस्थानात आगमन केल्यामुळे सर्व जातींच्या लोकांस विद्येचा सारखा लाभ व्हावा, या हेतूने गावोगावी विद्यालये स्थापिली. याच्या निःपक्षपाती व परोपकारी सर्व लहानथोर जातीच्या लोकांस विद्यालाभ करून घेण्याची संधी मिळाली व जरी या समयी लोकांचे अज्ञान अवस्थेमुळे व धर्माच्या वेड्या समजुतीमुळे शूद्र वर्गात विद्येची वृद्धी लोकसंख्येच्या मानाने फारच कमी आहे, यास्तव आपले लोकांत सुधारणा करण्याकरिता हे दिवस फार उत्तम आहेत. म्हणून अशी उमेद धरली पाहिजे की, आमच्या पैकी विद्वान सद्‌गृहस्थांनी आपले लोकांची आणि देशाची सुधारणा करणे आहे, तरी कृत्रिमी लोकांची भीती न धरिता मनाचा दृढनिश्चय करून सत्यास अनुसरून वर्तन करण्यास मागे घेऊ नये. जर घेतील तर आमचे शूद्र बांधवांची मानसिक दास्यत्वाचे कैदखान्यातून कधीही मुक्तता व्हावयाची नाही. ते पुन्हा अंधाररूप सागरात बुडाल्याप्रमाणे होणार आहे. याजकडेस लक्ष देऊन जे करणे ते करावे. ह्या सत्कृत्यास आम्ही प्रथम परमेश्वराची आराधना करून आरंभ केला. नंतर हे सत्कृत्य त्या जगन्नियंत्या परमेश्वराच्या कृपेने हा काळपोवेतो दिवसानुदिवस उत्तम प्रकारे उर्जीत स्थितीत येत आहे. पुढे जगाचा निर्माणकर्ता ते उत्तम स्थितीत आणील अशाबद्दल आम्ही त्यांची अंतःकरणपूर्वक नम्रतेने प्रार्थना करितो.

समाजाचे सभासद : रा.रा. रामशेट बापूशेट उरवणे, रा. विनायक बाबाजी डेंगळे, रा.रा. ग्यानू मल्हारजी झगडे, रा. कृष्णराव पांडुरंग भालेकर, रा.रा. जोतीराव गोविंदराव फुले. ●●●

**–समाप्त–**

**नारायण तुकाराम नगरकर,**
सत्यशोधक समाजाचे चिटणीस
**(डॉ. आर.एम. पाटील, पुणे यांच्या संग्रहातून)**

# ‘राजपथ’चे झाले ‘कर्तव्यपथ’; पण नाव बदलून इतिहास बदलणार कसा?

**मोदी यांनी ‘राजपथ’चे ‘कर्तव्यपथ’ असे नामकरण करताना, ‘‘किंग्ज वे (राजपथ) हे गुलामीचे प्रतीक आता कायमचे नष्ट झाले,’’ असे घोषित केले. राजपथावर वर्षानुवर्षे प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारीला भारताच्या राजकीय, लष्करी व सांस्कृतिक सामर्थ्याचे प्रदर्शन होत आले आहे. येथून पुढेही होईल; पण कर्तव्यपथावर. कर्तव्य कुणाचे, हे अद्याप मोदी यांनी स्पष्ट केलेले नाही. त्यांना जनतेकडून कर्तव्याची अपेक्षा असावी, असे दिसते. कर्तव्याबरोबरच अधिकार व स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टींची जोड असावी लागते. मामला एकतर्फी नसतो.**



विजय नाईक



मागील आठवड्यात कॅनॉट प्लेसकडे जाताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी उद्‌घाटन केलेल्या ‘कर्तव्यपथ’कडे नजर फिरविली; पण तिथे पिवळ्या रंगाची बॅरिकेडस् लावल्याने त्यापलीकडे माणसे दिसत नव्हती. सशस्त्र पोलिसांचा सर्वत्र पहारा चालू होता. ब्रिटिशांनी बांधलेल्या छत्रीखाली आझाद हिंद सेनेचे सर्वेसर्वा नेताजी सुभाष चंद्र बोस यांचा पुतळाही एकाकी उभा होता. त्याच्या भोवतीही बॅरिकेडस् व पोलिसांचा पहारा असल्याने तिथे फिरकण्याचे धाडस कुणी करू शकत नव्हते. मोदी यांनी ‘राजपथ’चे ‘कर्तव्यपथ’ असे नामकरण केल्यानंतर पुढील चार दिवस सामान्यांना हा परिसर खुला होता; परंतु तो नेहमीसाठी दिल्लीकर व पर्यटकांना खुला राहण्याची लक्षणे दिसत नाहीत. सुभाषबाबूंच्या पुतळ्यामागे काही अंतरावर नव्याने युद्ध स्मारक बांधलेले आहे, तेही जवळजवळ बंद असते. त्यामुळे गेली पंचाहत्तर वर्षे ज्या राजपथावर दिल्लीकरांच्या सायंकाळी बहरायच्या, तसे चित्र आता दिसेल की नाही, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. याचे एकमेव कारण म्हणजे लवकरच हा परिसर अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे कामकाजाचे क्षेत्र होणार आहे. उपराष्ट्रपती, पंतप्रधान यांची निवासस्थाने, मंत्र्यांची कार्यालये, नवे संसदगृह, मंत्रालयांच्या इमारती, केंद्रीय सचिवालय, खासदारांची कार्यालये, त्यांच्या येण्या-जाण्यासाठी उभारले जाणारे भुयारी मार्ग, यामुळे तिथे वावर असेल, तो त्यांचा व गुप्तचर खात्याचे अधिकारी, कमांडोज व पोलिसांचा. परिणामतः येता-जाता कर्तव्यपथाला ‘देखल्या देवा दंडवत’ करावा, तसे सामान्याला करावे लागणार. मोदींनी उद्‌घाटन करताना दाखविलेला दिलदारपणा दाखविणे चालू ठेवले, तरच सामान्यांना तो पाहणे, त्यावरून फेरफटका मारणे शक्य होईल.

पहिल्या तीन दिवसांत लाखो लोकांनी तिथे गर्दी केली. तथापि, भेळपुरी, पाणीपुरी, पापड, चहा, कॉफी विक्रेत्यांनी पोलिसांची नजर चुकवून तेथे जाऊनही त्यांना लोकांनी फारसा प्रतिसाद दिला नाही, की त्यांच्या मनासारखी विक्री झाली नाही. त्यात काय व केव्हा सुधारणा होतात, याकडे दिल्लीकरांचे लक्ष लागले आहे.

**मोदींना जनतेकडून कर्तव्याची अपेक्षा असावी!**

मोगलांच्या काळापासून दिल्ली देशाची शान होती, राजधानीचे

स्थान होते. ब्रिटिशांच्या काळात कोलकात्याहून राजधानी इथे हलविल्यानंतर दिल्लीला महत्त्व आले. ज्या मोगलांचा इतिहास मोदी पुसून टाकू इच्छितात, त्यांच्यापैकीच बादशहा शहाजहानने बांधलेल्या लाल किल्ल्यावरून मोदींसह सारे पंतप्रधान गेली पंचाहत्तर वर्षे १५ ऑगस्ट रोजी देशाला संदेश देत आलेत. मोगल व ब्रिटिशांच्या राजवटीतील भव्य वास्तू, प्रचंड उद्याने, त्यांची स्मारके, ब्रिटिशांनी बांधलेला राजपथ, नॉर्थ व साउथ ब्लॉक, राष्ट्रपती भवन आदींपैकी काहीही येथून हलणार नाही, या वास्तू इतिहासाची साक्ष देतात. मोदी यांनी 'राजपथ'चे 'कर्तव्यपथ' असे नामकरण करताना, ''किंग्ज वे (राजपथ) हे गुलामीचे प्रतीक आता कायमचे नष्ट झाले,'' असे घोषित केले. या पथाला ना सरकार, ना दिल्लीकर 'किंग्ज वे' या नावाने ओळखत होते. याच पथावर वर्षानुवर्षे प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारीला भारताच्या राजकीय, लष्करी व सांस्कृतिक सामर्थ्याचे प्रदर्शन होत आले आहे. येथून पुढेही होईल; पण कर्तव्यपथावर. कर्तव्य कुणाचे, हे अद्याप मोदी यांनी स्पष्ट केलेले नाही. त्यांना जनतेकडून कर्तव्याची अपेक्षा असावी, असे दिसते. कर्तव्याबरोबरच अधिकार व स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टींची जोड असावी लागते. मामला एकतर्फी नसतो. या पथाचे नाव बदलून सोपे 'लोकपथ' केले असते, तर ते अधिक संयुक्तिक झाले असते. येथून चार-पाच फर्लांगांवर जनपथ आहे, तरीही लोकांची गल्लत झाली नसती.

**...म्हणूनच ते कर्तव्याची भाषा करतात**

उत्तर प्रदेश सरकारने अलाहाबादचे 'प्रयागराज' असे नामकरण केले, तसेच मद्रासचे चेन्नई, बँगलोरचे बंगळुरू, पाटण्याचे पाटलीपुत्र झाले; पण मोदींच्या गुजरातची राजधानी अहमदाबादचे काय. त्याचे नाव मोदी बदलणार केव्हा? दिल्लीतील औरंगजेब मार्ग हे नाव बदलून ते 'डॉ. अब्दुल कलाम मार्ग' असे करण्यात आले. तरी त्या मार्गावरील 'औरंगजेब लेन' कायम आहे. पंतप्रधानांचे निवासस्थान असलेल्या मार्गाचे 'रेस कोर्स' हे नाव बदलून मोदींनी 'लोककल्याण मार्ग' असे केले. २०१४ पूर्वी हे निवासस्थान येण्या-जाणाऱ्याला रस्त्यावरून दिसायचे; पण 'लोकप्रिय' मोदी यांच्या कार्यकाळात त्याभोवती इतकी गर्द झाडी व उंच कुंपण उभारण्यात आले, की आता ते जनतेच्या पूर्णपणे दृष्टिआड झाले आहे. गेली अनेक वर्षे अगदी अटल बिहारी वाजपेयी व नंतर डॉ. मनमोहन सिंग यांच्या कारकीर्दीत वर्षातून किमान दोन-तीन वेळा पत्रकार तेथे जात, त्यांना बोलाविले जात असे. पंतप्रधानांच्या निवासस्थानी भोजन व पत्रकार परिषदादेखील होत, ते मोदी यांच्या कारकीर्दीतील गेल्या आठ वर्षांत 'इतिहासजमा' झाले आहे. मोदी यांना माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना अभिप्रेत असलेले 'अनुशासन पर्व' राबवायचे आहे, म्हणूनच ते कर्तव्याची भाषा करतात.

**मोदींना 'भयभीत लोकशाही' अभिप्रेत आहे काय?**

मोगल राजेरजवाड्यांनी व ब्रिटिशांनी जशा स्वतःच्या वास्तव्यातील खाणाखुणा दिल्लीत सोडल्या, त्याचप्रमाणे मोदी यांना त्यांच्या कारकीर्दीत वास्तू निर्माण करून इतिहासावर आपली छाप सोडायची आहे. म्हणूनच तब्बल २० हजार कोटी रुपये खर्चून सेंट्रल व्हिस्टा प्रकल्प हाती घेण्यात आला. पंतप्रधान झाल्यावर मोदी जेव्हा प्रथम संसदेत गेले, तेव्हा तेथील पायरीवर डोके ठेवून, नतमस्तक होऊन त्यांनी संसदेत प्रवेश केला होता. तेथील स्वतंत्र विचार-विनिमयाचे प्रतीक व स्थळ असलेला सेंट्रल हॉल नव्या संसद भवनात नसेल. तरीही लोकशाहीचे नवे मंदिर बांधल्याचे श्रेय ते घेतील. इमारतीवरील अशोक चक्रावरील सिंहांचे शिल्प दिसताच भयभीत व्हावे, असे आहे. त्यामुळे त्यांना 'भयभीत लोकशाही' अभिप्रेत आहे काय, असा प्रश्न पडतो.

सरकार कुणाचेही असो, काँग्रेस वा भाजप वा अन्य पक्षांचे, त्यातील नेत्यांना रस्ते, वास्तू आदींची नावे बदलण्याचे वेड लागलेले दिसते. काँग्रेसच्या काळात इंदिरा गांधी, पंडित नेहरू, राजीव गांधी यांची नावे निरनिराळ्या वास्तूंना देण्याचा सपाटा होता. दिल्लीचे इंदिरा



गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ, इंदिरा गांधी नॅशनल सेंटर फॉर आर्टस, कॅनॉट प्लेस (सीपी)चे राजीव चौक, असे करण्यात आले, अमेठी येथे राजीव गांधी नॅशनल एव्हिएशन युनिव्हर्सिटी उभारण्यात आली, अशी अनेक उदाहरणे देता येतील. मात्र, आजही उबर, ओला, रिक्षावाले राजीव चौक नव्हे, तर 'सीपी' हे नाव त्वरित ओळखतात.

**'मोदीज मेगा शो'**

मोदी यांनी राजपथाला कोणत्याही व्यक्तीचे नाव दिले नाही; परंतु त्यांच्या नावे अनेक योजना कार्यरत आहेत. छत्रीखाली सुभाषबाबूंचा पुतळा उभारून त्यांच्यावर काँग्रेसतर्फे झालेला अन्याय दूर करण्याचा त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे लोकांकडून स्वागत होत आहे. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार असताना संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये पहिल्यांदा स्वातंत्र्यवीर सावरकरांचे छायाचित्र लावण्यात आले. त्या समारंभावर काँग्रेसने बहिष्कार टाकला होता. इंदिरा गांधी सत्तेत असताना राजपथावरील छत्रीच्या खाली महात्मा गांधी यांचा पुतळा उभारण्यात यावा, असाही विचार त्यावेळी झाला होता; परंतु

तो कधीच प्रत्यक्षात आला नाही. १९६८ मध्ये राजे पंचम जॉर्ज यांचा पुतळा या छत्रीतून हलविण्यात आला होता. तेव्हापासून ते ८ सप्टेंबर, २०२२ पर्यंत, तब्बल ५४ वर्षे ती जागा रिकामी होती. मोदी यांनी तेथे सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा स्थापन करून पुन्हा एकदा त्यांच्या नेतृत्वाखाली आझाद हिंद सेनेने ब्रिटिशांविरुद्ध केलेल्या कारवाईची स्मृती जागृत केली. अर्थात, या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आमंत्रण एका उपसचिवाने पाठविल्याने पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता जाम चिडल्या. कार्यक्रमाला त्या अनुपस्थित राहिल्या. ''मी काही गुलाम नाही,'' अशी खरमरीत टिप्पणीही त्यांनी केली. डोळ्यात भरेल अशी आणखी त्रुटी म्हणजे, सुभाषबाबूंच्या कुटुंबातील एकही व्यक्ती कार्यक्रमाला उपस्थित नव्हती, की कर्तव्यपथाच्या उद्घाटनाचे आमंत्रण राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू व उपराष्ट्रपती श्री. जगदीप धनखड यांना देण्यात आले नव्हते. कार्यक्रमाचे वर्णन 'मोदीज मेगा शो' असे करण्यात आले, ते योग्यच होय. पुढेही प्रत्येक इमारतीचे उद्घाटन करताना केवळ मोदीच आपल्याला दिसणार आहेत. आता पाहायचे इतकेच, की महात्मा गांधी यांची समाधी आहे, तिचे 'राजघाट' हे नाव ते बदलणार काय. कारण त्यातही 'राज' हा शब्द आहे.

**उलट तो बाजार अधिक लोकप्रिय झाला**

मोदी यांना भारतावर असलेला वसाहतवादी प्रभाव व मानस बदलायचे आहे. नेहरूंच्या कारकीर्दीनंतर ते थेट वाजपेयी व नंतर डॉ. मनमोहन सिंग यांच्या कारकीर्दीपर्यंत इंग्रजी भाषी एलीट उच्चभ्रूंचा प्रभाव दिल्लीच्या व देशाच्या राजकारण व नोकरशाहीवर होता, असे मोदी व त्यांचे निकटवर्तीय मानतात. म्हणूनच मध्य दिल्लीतील सर्वाधिक महागड्या खान मार्केट या बाजाराला त्यांनी 'खान मार्केट गँग' असे नाव दिले. ते दिल्याने बाजाराचे फारसे बिघडलेले नाही. उलट तो बाजार अधिक लोकप्रिय झाला असून, मंत्री, उच्चभ्रू, राजदूत, श्रीमंत व्यक्ती, राजे आदी लोक रोज या मार्केटची भ्रमंती करताना दिसतात.

**इंदिरा गांधींच्या कार्यकाळात काश्मिरी पंडितांची चलती होती**

गुणात्मक फरक पडला आहे, तो उच्चभ्रू मानल्या जाणाऱ्या परराष्ट्र मंत्रालयात. नेहरूंच्या काळात या मंत्रालयात जम्मू-काश्मीरमधील उच्चभ्रू ब्राह्मणांची बरीच भरती होत होती. त्यांना राजदूतपदी अथवा केंद्र सरकारमध्ये उच्चपदे मिळत होती. केवळ भगिनी म्हणून विजयालक्ष्मी पंडित यांची नेमणूक नेहरूंनी सोव्हिएत युनियनधील भारतीय राजदूतपदी केली होती. नेहरू हयात होते, तेव्हा व इंदिरा गांधी यांच्या काही कार्यकाळात काश्मिरी पंडितांची चलती होती. राजकारणातही माकनलाल फोतेदार, दुर्गा प्रसाद धर यांच्यासारखे काश्मिरी नेते मोठमोठ्या पदांवर होते. त्याचबरोबर उत्तम इंग्रजी जाणणाऱ्या दाक्षिणात्यांचा दिल्लीवर प्रभाव होता. त्यामुळे अन्य राज्यांतून परराष्ट्र सेवेत गेलेल्या उच्चाधिकाऱ्यांची नाराजी अनेक वर्षे राहिली.

२०१४ पासून सारे काही वेगाने बदलत असून, केंद्रीय मंत्रिमंडळ असो, की अन्य नेमणुका, त्यावर मोदी यांचा धोरणात्मक शिक्का दिसत आहे. आता उच्चाधिकाऱ्यांना हिंदी येणे आवश्यक असते. कै. सुषमा स्वराज परराष्ट्रमंत्री झाल्यापासून मंत्रालयात केवळ असे प्रवक्ते नेमण्यात आले, की ज्यांना इंग्रजीबरोबर हिंदीचे उत्तम ज्ञान आहे. उदा. विकास स्वरूप, गोपाळ बागळे, अनुराग श्रीवास्तव व विद्यमान अरिंदम सेनगुप्ता, तसेच परराष्ट्र सचिव इंग्रजी व हिंदी, अशा दोन्ही भाषांतून पत्रकारांशी संवाद साधू लागले.

**वास्तुकार व शिल्पकारांनी केलेल्या टीकेची दखल मोदींनी घेतली नाही**

मोदींच्या नेतृत्वाखाली दिल्लीचा कायापालट होतोय काय, असा प्रश्न विचारल्यास होय आणि नाही, अशी दोन उत्तरे द्यावी लागतील. मोदी यांनी गेली अनेक वर्षे निरनिराळ्या प्रदर्शनांसाठी वापरले जाणारे




प्रगती मैदान भुईसपाट करून तेथील १८० एकर जागेत नवनव्या वास्तू, मोठमोठी प्रदर्शने व सभागृहे असलेले नवे प्रगती मैदान उभे केले आहे. जुन्या वास्तूत जगप्रसिद्ध वास्तुकार बकमिन्स्टर फुलर यांनी कोणत्याही खांबांचा आधार न घेता उभारलेले 'जिओडेसिक डोम' जमीनदोस्त केले. त्यावर प्रसिद्ध वास्तुकार व शिल्पकारांनी केलेल्या टीकेची कोणतीही दखल मोदी यांनी घेतली नाही. प्रगती मैदानानजीक वाहनांसाठी नुकत्याच बांधण्यात आलेल्या भुयारी मार्गाचे त्यांनीच उद्घाटन केले. तिथे रस्ते व महामार्ग उभारणारे मंत्री नितीन गडकरी यांना समारंभाचे आमंत्रण नव्हते. अशा प्रत्येक प्रसंगातून त्यांचा सहकाऱ्यांबाबतचा आकस स्पष्ट होतो. वाढदिवसाचा १७ सप्टेंबरचा दिवस असो, की आणखी कोणता, त्यात 'मोदी एके मोदी,' 'मोदी दुणे मोदी', असे चित्र दिसते. मध्य प्रदेशातील कुनो अभयारण्यात




नामिबियातून आणलेल्या आठ चित्त्यांना मुक्त संचार करण्यासाठीचा जो कार्यक्रम झाला, त्या पिंजऱ्यांच्या वरील भागात उभे होते, ते फक्त मोदी अन् मोदीच. केंद्रीय वन व पर्यावरण खात्याचे मंत्री भूपेंद्र यादव वा राज्यमंत्री अश्विनीकुमार दिसले नाहीत. मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान समारंभाला उपस्थित होते.

अलीकडच्या काळात पुणे येथे छत्रपती शिवाजी महाराज, झांसी येथे राणी लक्ष्मीबाई यांच्या पुतळ्यांचे अनावरण त्यांनी केले. युद्धनौका विक्रांतवरील ब्रिटिशकालीन बोधचिन्ह (इनसिग्निया) बदलून शिवाजी महाराजांच्या नौदलाचे बोधचिन्ह तेथे लावले, ते मोदी यांनीच. देशाला भारतीयत्वाची आठवण करून देण्याची एकही संधी ते दवडत नाहीत.

**तोवर भाजपचा अश्व रोखण्याचे कार्य प्रादेशिक पक्षांना करावे लागेल!**

मोदींच्या कर्तव्य अथवा कर्तव्यपथाच्या घोषणेपासून सामान्याने काय शिकायचे? रोज व्यक्तिस्वातंत्र्यावर घाव घातले जात असताना, सामान्य जनतेला आजच्या दिवसांत लोकशाही टिकविण्याचे 'कर्तव्य' बजावावे लागणार आहे. त्यासाठी पोलीसराज, अनेक जाचक सरकारी संस्थांशी, सरकारप्रणीत संघटना व टोळ्यांशी सामना करावा लागणार आहे. त्याची तयारी जनतेला करावी लागेल. दुसरीकडे विरोधकांना सत्तारूढ पक्षाविरुद्ध एकजूट होण्याचे 'कर्तव्य' बजावावे लागणार आहे. मोदी यांचा अश्व थांबणारा नाही. त्याला रोखणारा एकही नेता आज देशपातळीवर दिसत नाही. विरोधक एकमेकांविरुद्ध ठाकले, तर मोदी यांचे २०२४ मधील यश ठरलेले आहे. तत्पूर्वी, त्यांची प्रतिमा उंचावणाऱ्या दोन-तीन घटना घडणार आहेत. १) २०२४ च्या निवडणुका येण्यापूर्वी अयोध्येतील राम मंदिर उभारणीचे काम पूर्ण झालेले असेल. त्याचा एक वेगळाच कैफ देशाला चढणार आहे. २) २०२३ मध्ये भारताकडे 'शांघाय सहकार्य संघटनेचे' अध्यक्षपद येणार आहे. तिच्या भारतात होणाऱ्या परिषदेच्या अध्यक्षपदी अर्थातच मोदी असतील व ३) जगातील सर्वांत महत्त्वाच्या जी-२० गटाचे अध्यक्षपद भारताकडे येणार असून, या गटाच्या ९ व १० सप्टेंबर २०२३ रोजी दिल्लीत होणाऱ्या शिखर परिषदेचे अध्यक्षपद नरेंद्र मोदी करणार आहेत. त्यामुळे त्यांची जागतिक प्रतिमा सुधारेल. या महत्त्वाच्या घडामोडी विरोधकांपुढे नवनवे पेच निर्माण करणार आहेत.

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल मोदी यांना भले 'सिरिअल किलर ऑफ गव्हर्नमेन्ट' म्हणोत; परंतु गेल्या काही महिन्यांत कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा आदी राज्यांतून सुरू झालेले 'आयाराम गयारामा'चे युग विरोधकांना महागात पडणार, अशीच चिन्हे दिसत आहेत. विरोधी पक्षातून भाजपमध्ये रोज खोगीरभरती होत आहे. विरोधकांसाठी रोजची रात्र वैऱ्याची आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सुरू केलेली 'भारत जोडो यात्रा' काय किमया करणार, हे लवकरच दिसेल. ती पूर्ण होण्यापूर्वी जाहीर झालेल्या काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून देशाला नवे चित्र दिसणार आहे. लोकशाही पद्धतीने निवडणूक होणार असून, चुरशीत राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत व संसद सदस्य व प्रसिद्ध लेखक शशी थरूर उतरल्याने भाजपला आता घराणेशाहीचे कोलीत वापरता येणार नाही. तरीही, काँग्रेस जोवर सशक्त व लोकप्रिय होत नाही, तोवर भाजपचा अश्व रोखण्याचे व संघराज्याची प्रतिमा कायम ठेवण्याचे कार्य प्रादेशिक पक्षांना करावे लागेल, असेच दिसते. •••

**(लेखक दिल्लीस्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

# युक्रांद 80

**डॉ. कुमार सप्तर्षी हे ८० वर्षांचे झालेत आणि त्यानिमित्ताने एका ग्रंथाची निर्मिती केली गेलीय, 'डॉ. कुमार सप्तर्षी : व्यक्ती आणि कार्य'. अंजली सोमण यांनी ग्रंथाचे संपादन केलेय आणि कॉन्टिनेन्टल प्रकाशनने हा ग्रंथ प्रकाशित केलाय. २१ ऑगस्टला डॉक्टरांचा वाढदिवस असतो, त्यादिवशी त्याचे पुण्यात प्रकाशनही झाले. या ग्रंथात अनेकांचे लेख आहेत. शिवाय स्वत: डॉ. कुमार सप्तर्षी यांनीही स्वत:बद्दल लिहिलंय.**



संजय पवार

आज जे वयाच्या ५०/६० च्या पुढे आहेत त्यांना डॉ. कुमार सप्तर्षी यांनी ७० च्या दशकात, त्या वेळच्या तरुण-तरुणींवर युवक क्रांती दल नामक युवा संघटना व त्याचा लीडर डॉ. कुमार सप्तर्षी यांनी केलेले गारूड आठवत असेल!


त्या काळात डॉक्टर किंवा कुमार हे एक राज्यस्तरीय असे आजच्या भाषेतले आयकॉन बनले होते. ६० च्या दशकात जगभर सर्व प्रकारच्या प्रस्थापित व्यवस्थांविरोधात जी तरुणांची आंदोलने सुरू झाली, त्यांची लागण भारतात तशीच महाराष्ट्रातही झाली. महाराष्ट्रात लघू अनियतकालिक चळवळींनी साठोत्तरी साहित्य चळवळ म्हणून साहित्यात परिवर्तन आणले. त्याचवेळी राजकीय सामाजिक क्षेत्रातही परिवर्तनाचे वारे शिरू लागले होते. स्वातंत्र्याच्या पंचवशीत देशभरातला तरुण अस्वस्थ होता.

**मुंबईसह महाराष्ट्र ६० साली अस्तित्वात आला**


स्वातंत्र्योत्तर भारतात फाळणी, गांधींचा खून, संविधान निर्मिती यातून काँग्रेसचा प्रभाव देशभर होता. नेहरूंच्या डावीकडे झुकलेल्या व समाजवादी धर्मनिरपेक्ष धोरणांनी उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान यातील पायाभरणीनंतरही देशात विशेषत: स्वातंत्र्यानंतर जन्मलेल्या पिढीत, स्वातंत्र्याच्या पंचविशीत अस्वस्थता होती. महाराष्ट्रात भाषावार प्रांतरचनेनंतर मुंबईसह महाराष्ट्राचा लढा होऊन मुंबईसह महाराष्ट्र ६० साली अस्तित्वात आला.

**मराठी माणसांच्या न्याय्य हक्कांसाठी शिवसेनेची स्थापना**

या लढ्याने समाजवादी, कम्युनिस्ट, जनसंघ, शेकाप या पक्षांना व महाराष्ट्र एकीकरण समितीला मिळालेले यश पाहता डावा विचार मूळ धरू लागला होता आणि त्याच वेळी ६६ साली बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसांच्या न्याय्य हक्कांसाठी शिवसेनेची स्थापना केली व त्याला मुंबई व ठाणे शहरात प्रचंड पाठिंबा मिळाला. या अन्यायात मराठी तरुणांचा रोजगार परप्रांतीय बळकावताहेत हा राग होता. बाळासाहेब ठाकरे हे प्रबोधनकार ठाकरेंचे चिरंजीव असले, तरी त्यांची शैली ही प्रबोधनापेक्षा राडेबाजीची होती. तिची लोकप्रियता वाढत्या समाजवाद व कम्युनिस्ट विचार ठेचायला सत्ताधारी काँग्रेसला उपयोगी पडली. त्यांनी ती तशी वापरूनही घेतली.




शिवसेनेचा मराठी अस्मितेचा प्रश्न बहुभाषिक मुंबईपुरताच लागू होत होता; पण मुंबईसह उर्वरित महाराष्ट्रात एक मोठा सुशिक्षित तरुण वर्ग हा व्यवस्थेवरच नाराज होता. स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्षांनंतरही संविधान, आरक्षण लागू होऊनही वाढती विषमता, बेरोजगारी, जातीयता, धर्मांधता, स्त्री अत्याचार व सत्ताधारी काँग्रेसची देशभरची बहुमताची सत्ता व त्यातून आलेले मांद्य, यामुळे तरुणांत जी अस्वस्थता होती त्याला जगभरातील हिप्पी, जिप्सी संप्रदायासोबतच फिडेल कॅस्ट्रो, चे. गेव्हारा या क्रांतिकारी विचारांनी झपाटले. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्रांतीची घुसळण जगभर चालू होती. राजकीय विचारात, सामाजिक दृष्टिकोनात, साहित्य, कला या सर्वांतच परिवर्तन घडत होते. असंतोष हा तरुणांचा


डॉ. कुमार सप्तर्षी


राजा ढाले


नामदेव ढसाळ

स्थायीभाव झाला होता.

**महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरेंपेक्षा अधिक लोकप्रिय असे तरुण नेतृत्व**

महाराष्ट्रात तेव्हा समाजवाद्यांचे राष्ट्र सेवा दल, कम्युनिस्टांच्या विद्यार्थी, कामगार संघटना, इतर जनसंघटना यातून व्यवस्था बदलाचा, परिवर्तनाचा विचार मांडला जात होता. गांधी खुनानंतर बंदी घातलेला व नंतर बंदी उठवलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखाही सुरू झाल्या होत्या; पण तरुणांवर प्रभाव होता तो मुख्यत्वे समाजवादी व कम्युनिस्ट विचारांचा. याच काळात युवक क्रांती दल व दलित पँथर यांचा जन्म झाला. मुंबईत शिवसेना तरुणाईचे आकर्षण होती; पण युक्रांद व दलित पँथरच्या स्थापनेनंतर मुंबईसह महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरेंपेक्षा अधिक लोकप्रिय असे तरुण नेतृत्व उभे राहिले, ते होते युक्रांदचे डॉ. कुमार सप्तर्षी व दलित पँथरचे राजा ढाले आणि नामदेव ढसाळ!

बाळासाहेब ठाकरेंचा तेव्हा मुंबई, ठाण्याबाहेर संघटनात्मक प्रभाव नव्हता; पण डॉ.सप्तर्षी, ढाले व ढसाळ यांचा मुंबईसह उर्वरित महाराष्ट्रात व्यक्तित्व व संघटनात्मक प्रभाव होताच, शिवाय हे तरुण नेते ठाकरेंपेक्षा वयाने तरुण होते! ठाकरे लोकशाही न मानणारे दंडुके, मनगटशाहीचे पुरस्कर्ते, तर हे तिघे संविधान, संसदीय लोकशाही, सनदशीर संघर्षासह न्यायव्यवस्था मानणारे होते. ते केवळ मराठी अस्मिता व परप्रांतीय रोजगार आक्रमण यावरच बोलत नव्हते, तर व्यवस्था परिवर्तनाच्या संपूर्ण क्रांतीची भाषा बोलत होते!


**पँथरच्या पन्नाशीप्रमाणे युक्रांदच्या पन्नाशीचे ना कुठे स्मरण दिसले, ना कार्यक्रम**

नुकतीच पँथरच्या पन्नाशीचा स्मृतिजागर झाला. दलित पँथर व युवक क्रांती दल यांचा जन्म व कार्यकाळ साधारण सारखाच असावा; पण पँथरच्या पन्नाशीप्रमाणे युक्रांदच्या पन्नाशीचे ना कुठे स्मरण दिसले, ना काही कार्यक्रम. थेट डॉ. कुमार सप्तर्षींच्या ८० व्या वर्षानिमित्त (सध्याच्या अमृतकालवादी विचारांच्या भाषेत सहस्रचंद्रदर्शन!) ग्रंथ निर्मिती व त्याचे प्रकाशन हेसुद्धा अक्षरनामा वेबपोर्टलवरून कळले. पुण्यात स्थानिक पातळीवरून काही बातम्या आल्या असाव्यात. डॉ. कुमार सप्तर्षींचा अमृत महोत्सवही साजरा केला गेला होता; पण त्याला शिवसेनाध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीने परिवर्तनवादी जनमानसात प्रतिकूल प्रतिक्रिया उमटली होती. मधल्या पाच वर्षांत राजकारणाचा लंबक दुसऱ्या टोकाला गेलाय व आलाय. आता उद्धव ठाकरे आले, तर कदाचित पूर्वीसारखी प्रतिक्रिया येणार नाही, असो. अशा चिकित्सेचा हा लेख विषयही नाही.

या लेखात युक्रांद आणि डॉ. कुमार सप्तर्षी यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनानंतर आजतागायत जी काही विविध आंदोलने, संघटना, पक्ष स्थापन झाले. त्या-त्या काळात त्यांच्या नेतृत्वाने जो महाराष्ट्र ढवळून काढला होता, त्यात युवक क्रांती दल आणि डॉ.कुमार सप्तर्षी यांची नोंद ही खूपच ठळकपणे करावी लागेल. त्या काळच्या राजेश खन्ना व नंतरच्या अमिताभ बच्चनसारखे गारूड डॉ. कुमार सप्तर्षींचे होते, अशी ही एक तुलना केली, तर फार अस्थायी वा हास्यास्पद होणार नाही. अरुण साधू यांनी जे एकमेव नाटक लिहिले पडघम, जे जब्बार पटेलांनी दिग्दर्शित केले व थिएटर अकादमीने प्रस्तुत केलं, त्या नाटकाचा गाभा हा युक्रांद व नायक प्रवीण हा डॉ. कुमार सप्तर्षींवर आधारित होता, अशी गरमागरम चर्चा होती. नाटक ८५ साली रंगभूमीवर आले तेंव्हा!

**महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक जीवनात ठसा उमटवणारी व्यक्तित्वे**

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक जीवनात ठसा उमटवणारी जी व्यक्तित्वे झाली, ज्यांचा प्रभाव संपूर्ण महाराष्ट्रावर पडला वा आजही आहे, त्यात यशवंतराव चव्हाण, आचार्य अत्रे, श्रीपाद अमृत डांगे, एस.एम. जोशी, शरद पवार, बाळासाहेब ठाकरे आणि शरद जोशी या नावांसोबतच डॉ. कुमार सप्तर्षी, राजा ढाले, नामदेव ढसाळ यांच्यानंतर मोठ्या कालांतराने करिश्मा असलेले नेतृत्व म्हणून राज ठाकरे यांचे नाव घेता येईल.




यशवंतराव चव्हाण



आचार्य अत्रे



श्रीपाद अमृत डांगे



एस.एम. जोशी



शरद पवार



बाळासाहेब ठाकरे



शरद जोशी



राज ठाकरे

वरीलपैकी यशवंतरावांचे प्रस्थ होते. सुसंस्कृत राजकारणी असा लौकिक होता. वक्तृत्व म्हणून आचार्य अत्रे, डांगे, बाळासाहेब ठाकरे, डॉ. कुमार सप्तर्षी, राजा ढाले, नामदेव ढसाळ, शरद जोशी व राज ठाकरे यांची नोंद करावी लागेल. एस.एम. सौम्य तर शरद पवार हे अनप्रेडिक्टेबल चोवीस तास पूर्ण राजकारणी आहेत. राज ठाकरेंकडे करिश्मा आहे; पण संघटन कौशल्यात अजून निपुणता नाही. शरद जोशी व त्यांच्या शेतकरी संघटनेने महाराष्ट्रात आणलेले तुफान आजही गावोगावी पांढऱ्या वा करड्या केसांचे लाल बिल्लाधारी अभिमामाने फिरताना दिसतात. ते पाहून आधीच्या भारित काळाची कल्पना येऊ शकते. या सर्वांत युक्रांद व डॉ. कुमार सप्तर्षींचे योगदान जे आहे, त्याचे ना योग्य दस्ताऐवजीकरण झाले, ना मूल्यमापन झाले. युक्रांद आणि डॉ. सप्तर्षी यांना वेगळे करताच येणार नाही. तो काळ, त्यांचा प्रभाव व त्यावेळी पेरलेले नंतर जमिनीवर आता फार दिसत नसले, तरी ते किमान तीन ते चार पिढ्या आत-आत झिरपलेय!

**युक्रांदने संपूर्ण क्रांतीच्या विचारांचे बीज महाराष्ट्रात पेरले**

युक्रांद काय होते? त्यात साने गुरुजी होते, गांधी, शाहू, फुले, आंबेडकर आणि मार्क्सही होता. त्यात सनदशीर सत्याग्रह आणि संघर्षात्मक जेल भरो आंदोलनेही होती. समविचारी संघटनांशी समन्वय होता. त्याचवेळी त्यात उच्चवर्णीय, दलित, आदिवासी, भटके उच्चशिक्षित, अर्धशिक्षित, निरक्षर तरुण-तरुणींचा मेळा होता. युक्रांदवर समाजवादी प्रभाव होता; पण भाबडेपणा नव्हता. मार्क्स होता; पण पोथीनिष्ठा नव्हती. आंबेडकर होते; पण बौद्धतेरापलीकडे जाण्याची आस, आच होती. फुले, शाहूंचा वारसा सांगताना शेतकरी व विद्यार्थी हे अग्रभागी होते. मध्यमवर्गीयांचा भरणा अधिक असूनही दलित पँथर यासह भटके विमुक्त व आदिवासी यांनाही युक्रांद आपली वाटायची. विशिष्ट विचारसरणीचा काच नव्हता. खऱ्या अर्थाने व्यवस्था परिवर्तनवादी अशा संपूर्ण क्रांतीच्या विचारांचे बीज युक्रांदने महाराष्ट्रात पेरले. पुढे युक्रांदही फुटली. नेतृत्वाचे वाद, गट-तट अशा सर्व अवस्थांतून जात शीर्ष नेतृत्वासह कार्यकर्त्यांनी आपापला किनारा शोधला; पण युक्रांदने तयार केलेल्या वातावरणाचा परिणाम आपल्याला आजही दिसू शकतो. काहींना अतिशयोक्ती वाटेल; पण डॉ. कुमार सप्तर्षींच्या नेतृत्व व संघटनात्मक कौशल्याची धार नंतर फक्त शरद जोशी व शेतकरी संघटनेत दिसली!

**युक्रांदमधील पहिली फूट**

युक्रांदमधली पहिली फूट आणीबाणीनंतर जनता पार्टीच्या स्थापनेनंतर पडली.बिगर संसदीय राजकारण, की संसदीय राजकारण यावरून पहिली फूट पडली व डॉ. कुमार सप्तर्षींनी संसदीय राजकारणाचा म्हणजेच सत्तेच्या राजकारणाचा, निवडणुकीचा मार्ग स्वीकारला. युक्रांदचा एक मोठा भाग बिगरसंसदीय राजकारण करत राहिला; पण डॉ. कुमार सप्तर्षींप्रमाणेच अनिल अवचट, सुभाष लोमटे, शांताराम पंदेरे, रंगा रायचुरे, आनंद करंदीकर, अजित सरदार, रत्नाकर महाजन, भालचंद्र मुणगेकर, मधू मोहिते, रेखा ठाकूर, अरुण

संग्रहित छायाचित्र



ठाकूर, मंगल खिंवसरा, वसुधा सरदार, नीलम गोऱ्हे, शैला सातपुते, राम सातपुते, हुसेन दलवाई, अजित दळवी, रवी वाघमारे, संजीव चांदोरकर, अशी किती तरी नावे लिहिता येतील. (थोडे विषयांतर वसुधा सरदार एकदा गप्पा मारताना म्हणाली होती, कुमार, सुभाष, शांतारामसह अनेक जण सारखीच दाढी, मिशा, चष्मे व झब्बे व शबनम वापरत की पटकन कोण हे ओळखताच येत नसे. क्लोनच वाटत आजच्या भाषेत!)

ज्या कारणावरून युक्रांद प्रथम फुटली व तेव्हा डॉ. सप्तर्षींना विरोध करणारे आज आपल्याला विविध राजकीय पक्षांत दिसतात. हुसेन दलवाई, शैला सातपुते, भालचंद्र मुणगेकर, रत्नाकर महाजन (काँग्रेस), नीलम गोऱ्हे (शिवसेना), रेखा ठाकूर, शांताराम पंदेरे (वंचित बहुजन आघाडी), या सर्वांचा राजकीय प्रवास या सर्वांनी युक्रांदपासून सुरुवात करून नोंदवून ठेवायला हवा.

**युक्रांदने उभ्या केलेल्या वातावरणाचा परिणाम**

युक्रांदने उभ्या केलेल्या वातावरणाचा कळत-नकळत परिणाम हा पुढील पिढ्यांवर झाला. युक्रांदनंतरच्या भटक्या-विमुक्तांसह स्त्रियांच्या चळवळींवर जसा पडला, तसाच तो नंतरच्या आंतरजातीय-धर्मीय विवाह, सहजीवन, लोकविज्ञान, अंधश्रद्धा चळवळींवरही पडला. महाराष्ट्रात ऐंशीच्या दशकानंतर विखुरलेले; पण परिवर्तनवादी खुले वातावरण तयार झाले, त्यातूनच थिएटर अकादमी, दलित रंगभूमी, जिगीषासारख्या नाट्यचळवळी उभ्या राहिल्या. जब्बार पटेल, अमोल पालेकर, सत्यदेव दुबे, विजय तेंडुलकर यांना जी प्रयोगशील भूमी उपलब्ध झाली, ती युक्रांदसारख्या चळवळींचे सांस्कृतिक बायप्रॉडक्ट होते.

युक्रांद आणि डॉ. सप्तर्षी यांनी संघटन व नेतृत्व यांचा एक आगळाच आदर्श उभा केला. आज ऐंशीव्या वर्षी डॉ. सप्तर्षी नेतृत्वात नसतील वा युक्रांद नावाची संघटनाही नसेल; पण त्याचे अंश तुम्हाला अजित दळवी, प्रशांत दळवी, जयंत संजय पवार, शफाअत खान यांच्या नाटकात, जयदेव डोळे, निखिल वागळे यांच्या पत्रकारितेत, किशोर कदम, गणेश विसपुते, प्रज्ञा पवारच्या कवितेत. शिल्पा कांबळेच्या, राकेश वानखेडेच्या कादंबऱ्यांत आणि सुमित्रा भावेंसह नागराज मंजुळेंच्या चित्रपटात सापडू शकतात!

कितीतरी मोठे संचित आहे हे. हे नेस्तनाबूत करायला निघालेल्या संघ परिवार व भाजपची कीव येते. आहे असा वारसा, असा विचार, अशी परंपरा, असे नेतृत्व तुमच्याकडे? वल्लभभाई पटेल ते नेताजी सुभाषचंद्र बोस किंवा मोहिते पाटील ते एकनाथ शिंदे उसनवारीवर किती ढोल पिटणार?

डॉ. सप्तर्षींनी स्वत:संबंधी या पुस्तकात लिहिलेला लेख वाचनीयच आहे. ८० व्या वर्षीही इतकी सुस्पष्टता अभिमानास्पद वाटते. सप्तर्षींच्या निमित्ताने युक्रांदच ८० वर्षांची झाली असे वाटले तर नवल नाही, इतके ते अद्वैत आहे. ●●●

**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**

# ग्रामगीतेतील लिंगभाव

**प्रस्तावना**


**भारत हा जगातील मोठ्या लोकसंख्येचा देश असून, त्यातील ५०% लोकसंख्या ही स्त्रियांची आहे. जी स्त्रीही आपले घर व्यवस्थित चालवू शकते, ती देशही चालवू शकते, हे तिने आजवर सिद्ध केलेले आहे. भारतीय संविधानाने समानता हे तत्त्व अंगीकारले आहे. सर्व स्तरांवर, सर्व ठिकाणी सर्वांना समान हक्क व अधिकार मिळणे यास समानता असे म्हणता येईल. एखादा देश कितपत प्रगत व विकसित झालेला आहे हे पाहायचे असेल, तर त्या वर्गातील स्त्रियांची स्थिती कशी आहे, हे जाणून घेतले पाहिजे. सांगण्याचे तात्पर्य असे, की देशाच्या विकासात स्त्रीविकास व स्त्रीसमानता हा विषय अत्यंत महत्त्वाचा व अविभाज्य घटक ठरतो. स्त्रीविकास व समानता यासंदर्भाने विसाव्या शतकात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता या ग्रंथातील विसाव्या अध्यायामध्ये महिलोन्नतीसंदर्भात मांडलेले विचार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.**




**डॉ. प्रल्हाद दत्तराव भोपे**

भारतीय स्त्रियांस पुरुषसत्ताक व्यवस्थेने दुय्यमत्वाची वागणूक दिलेली होती. प्राचीन लेण्यातील स्त्री-पुरुष यांच्या शिल्पाकृती जरी आपण पहिल्या, तर स्त्रिया या पुरुषव्यवस्थेच्या बळीच ठरलेल्या दिसून येतात आणि त्या मानसिकतेचा पगडा आज एकविसाव्या शतकातही स्त्रियांमध्ये आपणास जाणवतो. स्त्रियांस दिलेल्या वाईट वागणूकीमुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृती या ग्रंथाचे जाहीर दहन केले होते. भारतीय स्त्रीमुक्तीचे उद्गाते महात्मा जोतीराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यामुळे स्त्रिया लिहित्या झाल्या व आम्ही अबला नसून सबला आहोत, सक्षम आहोत हे त्यांनी सिद्ध केले. मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे, फातिमा शेख यासारख्या क्रांतिकारक स्त्रीयांनी पुरुषसत्ताक व्यवस्थेला जाब विचारला.

ग्रामोन्नती अध्यायाच्या सुरुवातीसच मंजुळामातेचे स्मरण तुकडोजी महाराजांनी केलेले असून, आपली माता सहनशील, कष्टाळू, धर्मप्रिय, सह्रद, पतिपरायण, भक्तिमती, आदर्श गृहिणी होती. तिच्या संस्कारात मी वाढलो, असे ते म्हणतात. स्त्री ही क्षणकालची पत्नी व अनंत काळाची माता असते, हे अगदी सत्यच आहे. गावाच्या उन्नतीचा व उद्याच्या राष्ट्राच्या जडणघडणीचा पाया विद्यार्थी व गुरुजानांवर असतो; पण त्याहीपेक्षा आदर्श मातेच्या संस्कारावर अधिक अवलंबून असतो. जिजाऊ यांच्या आदर्श संस्कारांमुळेच महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी मिळाले. मंजुळा मातेच्या संस्कारामुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज घडले. माता भुवनेश्वरी यांच्या संस्काराने स्वामी विवेकानंद जगास प्राप्त झाले. तेव्हा व्यक्तीच्या चारित्र्यनिर्माणामध्ये मातेचे उपकार अनंत आहेत. महाराज म्हणतात,




**विद्या गुरुहूनि थोर । आदर्श मातेचे उपकार ।**
**गर्भापासोनि तिचे संस्कार । बालकांवरि ।।**
(ग्रामगीता अध्याय २०, ओवी २)



इंदिरा गांधी गुरुकुंज आश्रमाचे निरीक्षक करताना. समवेत श्री तुकडोजी महाराज (सन १९५६)

आदर्श माता आपल्या तान्ह्यावर गर्भापासून संस्कार घडवीत राहते. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी । ती जगाते उद्धारी' अशी म्हणच आहे. स्त्रीच्या तेजावरच पुरुषाचे मोठेपण अवलंबून राहते. ही स्त्री शक्ती बालकाला माउलीच्या रूपात प्रथम जवळ करते.पुढे वात्सल्याने त्यास सांभाळते. एखादी स्त्री भगिनी म्हणून निरपेक्ष प्रेम करते. एखादी सहधार्मिनी त्याला सर्वस्व देऊन साथसोबत करते. लोक म्हणतात 'बाप तैसा लेक' पण हे पूर्ण सत्य नव्हे. बाप जन्माला कारण ठरतो; पण आईच मुलाला जगात आणून चालते-बोलते करते. 'मातृशक्तीनेच वाढते सकळीक' हे मात्र सत्य आहे.

**पुरुष सर्वकाही करी । परि बांधला राही घराबाहेरी ।**
**सर्व विचार घेवोनि आचरी । तरीच शांती त्यासहि लाभे ।।**
**उत्तम महिला हेंच करी । आपुलें घर ब्रीदासह सावरी ।**
**मुलबाळ आदर्श करी । वरी प्रेमळपण सर्वांशी ।।**

(ग्रामगीता अध्याय २०, ओवी ६, ७)

आपल्याकडे एक म्हण आहे, की 'यशस्वी पुरुषाच्या मागे एका स्त्रीचा हात असतो'. मात्र, केवळ एकाच स्त्रीचा त्या व्यक्तीच्या विकासात हात नसतो, तर घरातील सर्वच स्त्रियांचा हात त्या व्यक्तीच्या घडणीत असतो. त्याचबरोबर भारतीय स्त्री ही पूर्णपणे सक्षम बनण्यासाठी सावित्रीप्रमाणे तिच्या पाठीशी प्रत्येक घरात महात्मा जोतीराव फुले निर्माण झाल्याशिवाय स्त्री निर्भय बनणार नाही, हेही तेवढेच खरे आहे. तसेच स्त्री-पुरुषांनी एकमेकांस पूरक वागणे. दोघांनीही निर्भेळ सहजीवन अनुभवणे यालाच स्त्री-पुरुष समानता म्हणता येईल.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, स्त्रियांच्या समजूतदारपणाला कुठेच तोड नाही. आपल्याकडे चार देवांना प्राथमिकता दिलेली दिसते. मातृदेवो भव! पितृदेवो भव! आचार्य देवोभव! अतिथी देवो भव! हा गौरव वेदकाळापासून आल्याचा अभिमान महाराज व्यक्त करतात. ईश्वरानंतर पहिला देव आई आहे. नंतर वडील, सद्गुरू आणि अतिथी आहेत. गृहिणीची महती सांगण्यास माझ्याकडे शब्दच नाहीत, असे महाराज म्हणतात.

**पुरुष ह्या ना कळे जेवढे । स्त्रियेचें समजणे तितुकें गाढें ।**
**तियेच्या भावना-गंगेचे पवाडे । वर्णिले ना जाती माझ्याने ।।**

(ग्रामगीता अध्याय २०, ओवी २०)

कोणतीही स्त्री आपल्या घरासाठी ठरविते ते करूनच दाखविते. तिची परिश्रम, जिद्द, चिकाटी सारेच अद्भुत असते. म्हणून महाराज लिहितात,

**जगात असता नाना जीव । सकलास जाहीर त्यांचा भाव ।**
**परि मायाळूपनाचा गौरव । माऊलीसरिसा नाही ।।**

(ग्रामगीता अध्याय २०, ओवी २७)

जगात अनेक प्राणी आहेत. प्रत्येकाला काही भाव, स्वभाव असतो; पण माउलीची भूमिका जिणे स्वीकारली तिची कुणाशी तुलनाच होऊ शकत नाही. अशा माउलीरूपी स्त्रीस जर आज अधिक शिक्षण मिळाले, तर स्त्री जे-जे शिकेल ते-ते घरादारासाठी कारणी लावेल. तो स्त्रीचा अंगभूत गुणच आहे. ती जे विविध प्रयोग करेल तेही अल्पखर्चाने. पुरुषांपेक्षा स्त्रीकडे एक दक्षता असते ती मोठी विचित्रच असते. तिची ती इतरांचा विचार करण्याची रीती होय.

आजचे युग स्त्री-पुरुष समानतेचे आहे. आज पुरुषही उत्तम स्वयंपाक करू शकतो. स्त्रियाही चांगली मिळकत करू शकतात; परंतु स्त्री स्वातंत्र्याची टोकाची भूमिका महाराजांना मान्य नाही. स्त्री-पुरुषांच्या स्वभाव मिलनातूनच घरात स्वर्ग अवतरत असतो. महाराज म्हणतात,

**पुरुष आहे पिंडवर्णी । स्त्री आहे दक्ष कारुणी ।**

**दोघांचे स्वभाव मिळताक्षणी । होय मेदिनी वैकुंठचि ।।**

(ग्रामगीता अध्याय २०, ओवी २८)

सामान्यत: पुरुष पिंडवर्णी म्हणजे व्यवहारी असतो. जे त्याच्या सोयीचे आहे ते त्याला विशेष भावते. त्यालाच तो महत्त्व देत असतो. तो थोडा आग्रही, हट्टीही असतो. स्त्री स्वभावत: कारुणिक असते. करुणेने दयाभावाने, मायाळूपणाने बहुतेक गोष्टीकडे आधी पाहते. तिला जे-जे आपले आहे, ते चांगले वाटते. आपले घर कितीही चंद्रमौळी असले, तर तेच तिचे विश्व असते. पुरुषाला दुसरे घर जवळचे वाटू शकते. स्त्रीला आपला पती, पुत्र, कन्या अगदी प्रिय वाटत असते. जिला असे वाटतच नाही आणि भलतेच वाटते ती कुणाची गृहस्वामिनी, अर्धांगिनी, माउली म्हणवली जात नाही.

व्यवहारदक्ष पुरुष, कर्तबगार पती, खंबीर-गंभीर कार्यकुशल घरधनी आणि प्रेमळ, आतिथ्यशील, प्रसन्न स्वभावाची घरधनीण, गृहस्वामिनी एकत्र येतील, तर सारा परिवार पुढे येतो. ज्याच्या त्याच्या प्रशंसेला उतरतो. जणू त्या घराचा स्वर्गच होतो. त्यातही महाराज सरळ सांगून टाकतात... उत्तम पुरुष आणि उत्तम स्त्री यांचा संसार सुखसमृद्धीचा होतोच होतो. त्यामध्ये ''पुरुषाहूनि काकणभरी । महिला वरिच राहतसे !'' पुरुष फटाफट बोलून जातो. स्त्री बरेच मनात ठेवून घेते. वेळप्रसंगी गोडव्याने बोलून बिघडलेले सांभाळून घेण्याची एक संयमशक्ती, सहनशक्ती, कौशल्यच तिच्यापाशी असते. पुरुषाचा मार्ग सरधोपट तर स्त्रीचा व्यवहार, चतुराईचा असतो. पुरुष चिंताक्रांत होऊन प्रसंगी खचतो, वैतागतो, त्रागाही करतो. व्यसनाकडे वळू शकतो. प्रश्नाकडे पाठ फिरवून पलायन करतो. स्त्रीला हे करता येत नाही. करील तर ती स्त्रीच नव्हे. यासाठी महाराज नमूद करतात की,

**जेंव्हा पुरुष होय चिंतातूर । तेव्हा घरची लक्ष्मी सांगे विचार ।**
**हे मी पाहीले घरी अपार । प्रसंग येता जाण्याचे ।।**

(ग्रामगीता अध्याय २०, ओवी ३०)

स्वार्थाचा, अहंकाराचा निचरा झाल्याशिवाय व्यक्तीमध्ये कारुण्य उपजत नसते. करुणा नेहमी दुसऱ्यासाठीच असते. राष्ट्रसंतांनी गावातील महिलांच्या उन्नतीचा विषय मांडला. त्यांना केवळ स्त्रियांचे गुण व पुरुषांचे दोष मांडायचे नव्हते. हे त्याच्या संतवृतीत्त बसणार नव्हते. त्यांनी जे स्त्री-पुरुषांचे निरीक्षण केलेले होते ते पाहूनच तारतम्यानेच ते विधायक मांडणी करतात. त्यांना पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये चातुर्य लक्षणे अधिक दिसली. सामान्यतः स्त्रिया भविष्याकडे दृष्टी ठेवून वर्तमानाचा कोट शिवतात. पुरुष भूतकाळात वा वर्तमानात एकारलेपणाने बुडून भविष्याचे वाटोळे करीत असलेले दिसतात.

**मानवी स्वभावाचे अनुमान । प्रसंग पाहोनि अवधान ।।**
**पुढील काळाचे अनुसंधान । स्त्रियांचे ठायीं ।।**

(ग्रामगीता अध्याय २०, ओवी ३२)



श्री संत गाडगेबाबांसमवेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज १९४५ मध्ये

स्त्रीपाशी प्रसंगावधान असते, हे आपण हरघडी संसारात अनुभवतो. ती हातचे राखून ठेवते. कोंड्याचा मांडा करते. वेळप्रसंग निभावून नेते. जे करते ते निष्ठापूर्वक, भक्तिपूर्वक करते. तिच्यात शक्ती कमी असेल; पण भावबळ, मनोबल अधिक असते. म्हणून महाराज म्हणतात,

**स्त्रीलाच भक्ती, स्त्रीलाच ज्ञान । तिलाच संयम, शहाणपण ।**
**तिच्यानेच हालती वाटे संपूर्ण । संसारचक्रे ।।**

(ग्रामगीता अध्याय २०, ओवी ३३)

राष्ट्रसंत म्हणतात, की स्त्री-पुरुष रथाची दोन चाके आहेत व ही दोन्ही चाके जर सारखी मजबूत केली तरच संसाराची गाडी सुखाने पुढे जाईल, समाजजीवन सुधारेल. याचा अर्थ असा, की स्त्री व पुरुष दोघांचाही समान विकास झाला तरच समाजाचा व पर्यायाने देशाचा विकास शक्य आहे, असे त्यांना सुचवायचे होते. खरे तर जन्मतःच अपत्य हे नर किंवा मादी असते; परंतु कुटुंब व समाज त्या अपत्याला संस्काराद्वारा पुरुषत्व व स्त्रीत्व बहाल करतो. आर्थिक भेदाला सामाजिक भेदात परावर्तित करताना पुरुषाला उच्च व स्त्रीत्वाला कनिष्ठ दर्जा दिला जातो. त्यामुळे जन्मापासून (मातेच्या उदरात असल्यापासून) ते मृत्यूपर्यंत स्त्री वर्गाला असमानता, भेदभाव व अन्यायाला सातत्याने सामोरे जावे लागते. संगोपन, आहार, आरोग्य, कामाचा मोबदला, जमीन, मालमत्ता, अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आदी विविध बाबतीत भेद केला जातो व स्त्रियांच्या तुलनेत पुरुषाला अधिक महत्त्व व प्राधान्य दिले जाते, असे चित्र दुर्दैवाने आपल्या देशात आजही दिसते. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा. मुलगी म्हणजे परक्याचे धन, या संकुचित विचारामुळे मुलीचा जन्म नको. त्यासाठी गर्भपात करणे, जन्मानंतर ठार मारणे किंवा तिची हेळसांड करणे असे प्रकार घडताना दिसतात.

इ.स. २०११ च्या जनगणनेनुसार ०-६ वयोगटातील १,००० मुलांच्या मागे ९१४ मुली हे प्रमाण मुलगी नको या मानसिकतेचे द्योतक आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मुलगा-मुलगी या

दोघांनाही समान ठेवावे, हे ईश्वरी सूत्र असल्याचे तुकडोजी महाराज सांगतात.

**सर्व सोयी पुरुषांकरिता । स्त्रियांसाठी सर्व व्यथा ।**
**हे कोण बोलले शास्त्र आता? । द्यावे आता झुगारोनि ।**
**माझे म्हणणे श्रोतयाते । जे-जे सुख असेल पुरुषांचे ।**
**महिलासीहि असावे अभिन्नपणे ते । स्वातंत्र्य सुखासाधना ।।**

राष्ट्रसंत तुकडोजी म्हणतात, प्राचीन काळात स्त्रिया तत्त्वचर्चेमध्ये सहभागी होत. त्या वादविवादात अव्वल असत. नाना तऱ्हेच्या कलेमध्ये, युद्धामध्येदेखील त्या पारंगत होत्या. राष्ट्रमाता जिजाऊ, राणी दुर्गावती, झाशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर यांचा दाखला महाराज देतात. स्वभावाने मृदू असणारी स्त्री वेळप्रसंगी कठोर चंडिकेचे रूप धारण करते. अशी सर्वगुणसंपन्न स्त्री मागे का? असा प्रश्न उपस्थित करून या प्रश्नाचे उत्तर महाराज देतात. ते म्हणतात, स्वार्थापोटी लोकांनी स्त्रीचे जीवन रुक्ष करून टाकले. तिच्याकडे दुर्लक्ष केले. तिला उपेक्षित ठेवले, तिला भोगवस्तू मानले, उंबरठ्याच्या आत कोंडून ठेवले, शिक्षणाचा उच्च हक्क नाकारला, त्यामुळे स्त्री मागे राहिली. स्त्रीवर्ग दीनदुबळा बनला. आज स्त्रियांसाठी सर्व क्षेत्रे खुली आहेत; परंतु दास्यत्वाचा पगडा आजही एवढा आहे, की पिंजरा उघडला; पण पक्षीच पिंजऱ्याबाहेर पडायला तयार नाही, अशी स्त्रीची आत्मविश्वासाच्या अभावामुळे स्थिती आढळते. स्त्रीच्या विकासाच्या आड येणाऱ्या प्रथा, परंपरा चुकीच्या आहेत, असे मत महाराज व्यक्त करतात.

**मुलीने सदा लपोनि राहावे । मुलाने गावी रागरंग पाहावे ।**
**ऐसे दुष्ट रिवाज ठेवावे । न वाटती आम्हा ।।**
(ग्रामगीता अध्याय २०, ओवी ६४)

बाईपणाची शिकवण स्त्रीस लहानपणापासूनच घरातून दिली जाते. हे मात्र आजच्या शिक्षित स्त्रीने लक्षात ठेवणे गरजेचे आहे. मुलास व मुलीस समानतेने वागविले पाहिजे.आजही गुणवत्ता यादीत झळकणाऱ्या मुलींचे नंतर काय होते? त्या संसारातच गुरफटतात, त्यांच्या गुणवत्तेची, बुद्धीची गरज देशाला असताना त्यांच्यातील चातुर्य सीमित होते. घरातील प्रत्येक पुरुषाने सतत विचार केला पाहिजे, की माझ्या वागण्याने स्त्रीवर अन्याय होता कामा नये. मग ती आई, बहीण, पत्नी कोणीही असो, तिचा सन्मानच झाला पाहिजे. आज कितीतरी मुली स्वतःच्या आई-वडिलांना मुलांपेक्षा सक्षमपणे सांभाळताना मी पाहत आहे. आज शिक्षणाचा प्रसार व प्रभाव पालक वर्गावर दिसत आहे. मुलांप्रमाणे मुलींच्याही शिक्षणाचा विचार पालक करताना दिसत आहेत.

आज कायद्याने समान वेतन, समान काम मान्य केले असले, तरी शेतात, उद्योग कारखान्यांतून स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने मोबदला मिळत नाही. घरकामास उत्पादक संबोधले जात नाही. घरकाम हे स्त्रीचे कर्तव्य ठरविले जाते. तिला माणूस म्हणून वागविले जात नाही. स्त्रीला मानसन्मान, प्रतिष्ठा, मनुष्य म्हणून सर्व अधिकार मिळायला हवेत. महाराज हाच संदेश ग्रामगीतेतून देतात.

**म्हणती स्त्री ही गुलामची असते । तिला हक्क नाही उद्धरायापुरते ।**
**हे म्हणणे शोभेना शहाण्यातील । स्वार्थांधतेचे ।।**
(ग्रामगीता अध्याय २०, ओवी ४६)

**समाजी जो पुरुषांशी आदर । तसाची महिलांशी असावा व्यवहार ।**
**किंबहुना अधिक त्यांचा विचार । झाला पाहिजे सामाजी ।।**
(ग्रामगीता अध्याय २०, ओवी ७८)

एकीकडे स्त्री-पुरुष समानतेचा जागर चालू असताना कितीतरी निर्भया पुरुषी अन्याय, अत्याचार सहन करताना दिसतात. रोज आपण प्रसारमाध्यमांमध्ये पाहतो, वाचतो स्त्रीयांवरील अत्याचाराच्या बातम्या कमी होण्याऐवजी वाढतानाच दिसतात. स्त्री आज समाजातच नाही, तर घरातही किती सुरक्षित आहे? याचा विचार करण्याची गरज आहे.

आज शिक्षणामध्ये नैतिक शिक्षण, मूल्यशिक्षण, स्व-संरक्षण शिक्षण आदी देण्याची आवश्यकता आहे, सांगितले जाते; परंतु राष्ट्रसंतांनी या गोष्टी फार पूर्वी लिहून ठेवल्या आहेत.

**काही मुली शक्ती शिक्षण घेती । मुलांपेक्षाही धीट असती ।**
**नाही गुंडाचीही छाती । हात घालील त्यांचे वरी ।**
**तेथे कासयासी पडदा? । परावलंबनाची आपदा ।**
**आत्मसामार्थ्याने सदा । स्त्रिया मर्दिती असुरांना ।।**
**शिक्षणही सांभाळोनी तनु, मन । करावे मुलीबाळीस विद्वान ।**
**अंगी असावे शौर्य पूर्ण । ब्रीद आपुलें रक्षाया ।।**
(ग्रामगीता अध्याय २०, ओवी १००)

स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीने राष्ट्रसंतांनी सांगितलेले विचार आज तेवढेच प्रासंगिक आहेत. नववधू-वर यांना परस्परांना निवडण्याचा अधिकार, आंतरजातीय व विधवाविवाह यांचे समर्थन, बालविवाह व हुंडा पद्धतीला विरोध, स्त्री-पुरुष दोघांनाही संतती नियमनाचा सारखा अधिकार आदी विचार राष्ट्रसंतांची दूरदृष्टी व पुरोगामित्व दर्शविणारे आहेत.

आज देशात स्त्री-पुरुष समानता ही केवळ कायद्याने निर्माण होऊ शकत नाही.तरीही असमानता नष्ट करण्यासाठी महाराजांच्या विचारांबरोबर पुरुषी मानसिकता बदलणे आवश्यक आहे. महात्मा जोतीराव फुले यांच्यासारखा स्त्रीकडे एक आपल्यासारखीच व्यक्ती म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन आपणामध्ये निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी जनप्रबोधनाची, लोकशिक्षणाची प्रभावी चळवळ समाजात राबविणे अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजकृत ग्रामगीता, संपादक स्व. सुदाम सावरकर, एकोणतिसावी आवृत्ती, प्रकाशन तिथी २६ जानेवारी २०१६.
२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजविरचित ग्रामगीता सुबोध निरूपण - डॉ. अशोक कामत, प्रकाशन - गुरुकुल प्रतिष्ठान, पुणे.
३. जगाच्या कल्याणा संताच्या विभूती-स्वामी श्रीकांतानंद, प्रकाशन-तिथी १५-०८-२०१२, रामकृष्ण मठ, पुणे.
४. वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारदर्शन - संपादन डॉ. एल.एस. तुळणकर, आर.बी. प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती ०८/२०१६.

**(लेखक संत साहित्याचे अभ्यासक आहेत.)**



# मराठवाड्यातील सामाजिक चळवळीची स्थित्यंतरे!

**मराठवाड्यातील सत्तर-ऐंशीच्या दशकातील दलित चळवळ खूपच प्रभावी होती. दलितांवरील अत्याचार व भूमिहीन दलितांना सरकारी पडीत गायरान जमिनी मिळवून देण्यासाठी सत्याग्रही आंदोलने व्हायची. युवक संघटना दलित-दलितेतर संवादासाठी प्रयत्नशील होत्या; पण आता या साऱ्या सामाजिक चळवळी थंडावल्यात. आपले प्रश्न सोडवून घेण्यासाठी रस्त्यावर लढाई करण्यापेक्षा सत्तेत गेलेले बरे, अशी दलित चळवळीत एक सत्तालोलुप मानसिकता तयार झाली आहे.**




**बी.व्ही. जोंधळे**

निजामाच्या जोखडातून हैदराबाद संस्थान मुक्त झाल्यानंतर मराठवाड्यास सामाजिक-सांस्कृतिक चळवळीचा एक चांगला वारसा लाभला आहे. गेल्या ७५ वर्षांत या भागात ज्या चळवळी झाल्या त्या बऱ्याचशा सर्वसमावेशक जशा होत्या, तशाच त्या जातीनिरपेक्ष-सामाजिक परिवर्तनास चालना देणाऱ्याही ठरल्या. दलित समाजावर होणारे अत्याचार, हुंडाबंदी, अंधश्रद्धा निर्मूलन, डॉ. बाबा आढावांची एक 'एक गाव, एक पाणवठा चळवळ', युक्रांद-दलित युवक आघाडी या विद्यार्थी संघटनांनी १९७३-७४ च्या संधिकालात केलेले विद्यार्थी शिष्यवृत्तीवाढ आंदोलन, गायरान जमिनी मिळविण्याचे लढे, भटक्या-विमुक्तांच्या चळवळी, मंडल आयोगाची अंमलबजावणी यासाठी मराठवाड्यात ज्या चळवळी झाल्या, त्या सामाजिक अभिसरणाच्या दृष्टीने उल्लेखनीय ठरल्या. नामांतर लढ्यात दलित-दलितेतर कार्यकर्त्यांनी व डाव्या संघटनांनी दलितविरोधी मानसिकतेविरुद्ध प्रबोधनात्मक संघर्ष करून नामांतराचा जो लढा जिंकला, तो परिवर्तनवादी चळवळीत मैलाचा दगड ठरला. दलित पँथरच्या अन्याय-अत्याचार विरोधी पुकारलेल्या झंझावातानेही मराठवाडा एकेकाळी ढवळून निघाला. गांधीवादी-समाजवादी-साम्यवाद्यांनी दलित-शोषितांची जी पाठराखण केली, तीही सामाजिक सामंजस्य, सामाजिक सुसंवादाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेला मिलिंद परिसर हा केवळ पुस्तकी शिक्षण देणारा प्रकल्प नव्हता, तर सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाची ती एक कार्यशाळा, एक केंद्र असल्यामुळे मिलिंद परिसरातील विद्यार्थ्यांनी एकेकाळी अन्याय-अत्याचारविरोधी जे विराट मोर्चे काढले, मिलिंदच्याच भूमीत दलित साहित्य संकल्पनेची जी बीजे रोवली गेली, तीही चळवळ म्हणून मराठवाड्याच्या सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात दखलपात्र ठरली. आता अगदी दहा वर्षांपूर्वी अण्णा हजारे यांनी जे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन उभारले होते, त्यातही मराठवाड्यातील तरुण हिरीरीने सहभागी झालेले दिसले. शिवाय मराठवाड्यात जी विकास आंदोलने झाली, तीसुद्धा जाती-धर्मनिरपेक्ष होती.

**जातीच्या संघटना उदयास आल्या आहेत**

मराठवाड्याच्या संघर्षशीलतेची एक विशेषता अशी राहिली

आहे, की हैदराबाद संस्थानातील जुलमी निजामी सत्ता उलथून टाकण्यासाठी जो मुक्तिसंग्राम झाला, तो जाती-धर्मनिरपेक्ष होता. स्वातंत्र्यसेनानींनी मुक्तिलढ्यास हिंदू-मुस्लीम संघर्षाचे स्वरूप येऊ न देता मुक्तिलढा लोकांच्या मूलभूत स्वातंत्र्याच्या नि लोकजीवनाच्या विकासाच्या अंगाने नेला. मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाल्यानंतर मराठवाड्यात जी आंदोलने झाली, ती वर म्हटल्याप्रमाणे जाती-धर्माचा रोगट स्पर्श झालेली नव्हती; पण आता मात्र जाती-धर्मावर समाज दुभंगलेला दिसतो. मराठवाड्यातील तरुणांना आपली ओळख सांगण्यासाठी जातीचा आधार घ्यावा लागत आहे. जातीच्या संघटना उदयास आल्या आहेत. मराठवाड्याच्या राजकीय-सामाजिक चळवळीत आलेले हे विपरीत स्थित्यंतर चिंतनीय ठरावे असेच आहे.



मराठवाड्यातील तरुण एकेकाळी व्यापक सामाजिक हितासाठी संघर्ष करीत होता; पण पुढे सारेच बदलत गेले. सामाजिक, शैक्षणिक चळवळीत स्वतःला झोकून देणारे बरेचसे तरुण राजकारणात गेले. दरम्यानच्या काळात मराठवाड्यात जातीचे-धर्माचे राजकारण करणारे पक्ष वाढीस लागले. सेक्युलर डाव्या चळवळीत मरगळ आली व राजकारण-समाजकारणाचा सारा पोतच बिघडून गेला. सर्वांचे हित बाजूस पडून मी व माझ्यापुरते इतक्या संकुचित विचाराने तरुणाईला झपाटल्यामुळे रचनात्मक, नैतिक, विधायक आंदोलनाचा सर्वांनाच विसर पडू लागला.

**कार्यकर्ते म्हणविणाऱ्यांची एक नवी जमात उदयाला आली आहे**

मराठवाड्यात सत्तर-ऐंशीच्या दशकात तरुण पोरे रात्र-रात्र चहाचे प्याले रिचवत कट्ट्याकट्ट्यांवर सामाजिक प्रश्नांवर डोकेफोड चर्चा करायचे. गळ्यात शबनम बॅगा अडकवून व्यवस्था परिवर्तनासाठी झगडायचे. मराठवाड्यातील तरुणांनी धुंद होऊन जयप्रकाश नारायणांच्या भ्रष्टाचार विरोधी नवनिर्माण आंदोलनात आपला सहभाग नोंदवला होता; पण आता कार्यकर्त्यांची व्याख्याच पार बदलून गेली आहे. कार्यकर्ते म्हणविणाऱ्यांची एक नवी जमात उदयाला आली आहे. ही नवी जमात चळवळीच्या नावाखाली मला काय मिळणार, याचे गणित आधी मांडते. समाजव्यवस्थेच्या नावाखाली संस्था उघडून संस्थानिक होते. अवती-भोवती खुशमस्कऱ्यांची फौज ठेवते. ही फौज मग संध्याकाळी ढाबा संस्कृतीत रमते. सायकलवर, पायी फिरून कार्य करण्याची प्रथा आता केव्हाच इतिहासजमा झाली असून, कडक इस्त्रीचे झकपक-चकाकणारे कपडे घालून मोटार गाड्यांतून फिरणारे कार्यकर्ते आता तयार झाले आहेत. गळ्यात शबनम बॅगांऐवजी सोनसाखळ्या आणि हाताच्या पाचही बोटांत अंगठ्या, हे आजच्या बहुतांश कार्यकर्त्यांचे (काही अपवाद) व्यवच्छेदक लक्षण होऊन बसले आहे. समाजसेवेच्या नावाखाली ठेकेदारी-गुत्तेदारीच्या धंद्यासही चांगलीच बरकत आली आहे. पुढारलेल्या समाजाकडून सोयी-सवलतींसाठी जी आंदोलने होतात, ती आंदोलनेही जातीच्या पलीकडे जात नाहीत, असे एक विदारक चित्र मराठवाड्यात अलीकडच्या काळात निर्माण झाले आहे. जाती नष्ट करण्याऐवजी जातीतच उत्कर्ष शोधला जाणे, ही निश्चितच गंभीर बाब आहे.

**दलित चळवळीत एक सत्तालोलुप मानसिकता!**

मराठवाड्यातील सत्तर-ऐंशीच्या दशकातील दलित चळवळ खूपच प्रभावी होती. दलितांवरील अत्याचार व भूमिहीन दलितांना सरकारी पडीत गायरान जमिनी मिळवून देण्यासाठी सत्याग्रही आंदोलने व्हायची. युवक संघटना दलित-दलितेतर संवादासाठी प्रयत्नशील होत्या; पण आता या साऱ्या सामाजिक चळवळी थंडावल्यात. आपले प्रश्न सोडवून घेण्यासाठी रस्त्यावर लढाई करण्यापेक्षा सत्तेत गेलेले बरे, अशी दलित चळवळीत एक सत्तालोलुप मानसिकता तयार झाली आहे. दलित मध्यमवर्गीयांचे तर सामाजिक भान इतके हरवले आहे, की आपला समाज एकेकाळी अस्पृश्यतेच्या नरकतुल्य जाचाला कसा बळी पडला, हा इतिहास आपल्या मुलाबाळांना कळू नये म्हणून दलित साहित्य आपल्या लेकरांनी वाचू नये, यासाठी ते प्रयत्नशील असतात.

**मराठवाड्यात स्त्री-मुक्तीची चळवळ मात्र थंडावली**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते, जो समाज आपला इतिहास विसरतो, तो समाज इतिहास घडवू शकत नाही; पण याचाच नेमका विसर दलित मध्यमवर्गीयांना पडला. दलित युवक रस्त्यावरील आंदोलनापेक्षा इतरांप्रमाणेच रक्तदान शिबिरे, फळवाटप, पुस्तके-



वह्या वाटप, वृक्षारोपण अशा निरुपद्रवी उपक्रमात सहभागी होऊन चळवळ केल्याचे वांझोटे समाधान मिळवू लागला. दलित समाजावर गत दहाएक वर्षांत देशभर अमानुष अत्याचार झाल्याच्या बातम्या आल्या. खासगीकरणात त्यांच्या जीवन-मरणाचे प्रश्न उग्र झाले; पण या साऱ्यामुळे एकेकाळी अस्वस्थ होऊन पेटून उठणारी मराठवाड्यातील सामाजिक दलित चळवळ आता मात्र बंद कप्प्यात बंदिस्त झालेली दिसते.

स्त्री-पुरुष समतेसाठी, महिलांच्या मान-सन्मानासाठी, त्यांच्या मूलभूत मानवी हक्कांसाठीसुद्धा मराठवाड्यात एकेकाळी नारीशक्ती जागृत असलेली दिसायची. स्त्रियांना स्वयंपाकगृहात नाडणाऱ्या महागाईविरुद्ध महिला रस्त्यावर यायच्या; पण आता असे होत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाल्यामुळे महिला चळवळीचा समाजकारणापेक्षा राजकारणाकडे जास्त ओढा वाढलेला दिसतो. हे गैर नाही; पण रूढी-परंपरेतून स्त्रियांची मुक्तता करण्यासाठी ज्या प्रबोधनात्मक लढाऊ सामाजिक चळवळींची गरज असते, ती स्त्री-मुक्तीची चळवळ मात्र थंडावली आहे, हे नाकारता येत नाही.

**...तर मराठवाडा सुजलाम्-सुफलाम् होण्यास वेळ लागणार नाही**

मराठवाड्यात विकासाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे मराठवाडी तरुण आता पुणे, मुंबई, नाशिकसारख्या शहरांकडे धाव घेऊ लागला आहे. मराठवाड्यात जी विकास आंदोलने झाली त्याच्या फलनिष्पत्तीतूनच परभणी कृषी विद्यापीठ, मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ, आकाशवाणी केंद्र आदी मराठवाड्यास मिळाले. मराठवाड्याच्या मागासलेपणास सरकार, लोकप्रतिनिधी, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते जेवढे जबाबदार आहेत, तितकेच सर्वांगीण विकासासाठी जो सामाजिक सलोखा, सौहार्द, सामंजस्य आवश्यक असते, तेच संपुष्टात येऊन जाती-धर्माच्या राजकारण-समाजकारणामुळे मराठवाडी जनता दुभंगली आहे. परिणामी, मराठवाड्याचा आवाजच मंदावला आहे. मराठवाड्यास त्याच्या हक्काचे पाणी मिळत नाही. अलीकडे लातूरसारख्या शहरास रेल्वेने पाणीपुरवठा करावा लागला. उलट यंदा मराठवाड्यास ढगफुटी, अतिवृष्टीचा सामना करावा लागला. मराठवाड्यात कधी तहानेने व्याकुळलेली हजारो खेडी जशी पाहावयास मिळतात, त्याचप्रमाणे दुसरीकडे हजारो खेडी पाण्यात बुडालेलीही दिसतात. मराठवाड्यातील शेती नष्ट होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. मराठवाड्यातील वनक्षेत्र नष्ट होत चालले आहे. मराठवाड्यात एकही राष्ट्रीय पातळीवरील शिक्षण संस्था वा उच्चशिक्षण देणारी संस्था नाही. मराठवाड्यात येणाऱ्या उद्योगधंद्यांना सोयी-सवलती देताना स्थानिकांना नोकऱ्यांत अग्रक्रम द्यावा, अशी मागणी जनता विकास परिषदेने केली होती; पण उद्योगधंद्यांनी ती पाळली नाही. सरकारनेही लक्ष दिले नाही. अशा स्थितीत मराठवाड्यातील तरुणांची बुद्धी, श्रम मराठवाड्याबाहेर जात आहेत; पण चळवळ नाही. विकासासाठी आग्रही असलेल्या जुन्या पिढीची जागा नव्या पिढीने आपल्या शिरावर घेतली नाही. तो मराठवाड्याचे उजाड माळरान करून अन्यत्र तर जातच आहे; पण जाती-धर्माच्या राजकारणात मराठवाडा अडकला आहे. हे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक चळवळीतील विपरीत स्थित्यंतर मराठवाड्याच्या मुळावर उठणारे ठरत आहे; पण लक्षात कोण घेतो? पण सारेच काही संपले असे मानण्याचेही काही कारण नाही. मराठवाड्याचा विकास व्हावा, सामाजिक मातृभाव वाढविणाऱ्या सामाजिक चळवळी गतिमान व्हाव्यात, असे मानणारेही खूप आहेत. फक्त ते विखुरले आहेत. त्यांनी एकत्र येण्याची गरज आहे. मराठवाड्यातील लोकप्रतिनिधी, बुद्धिवादी, विचारवंत, साहित्यिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांतील कार्यकर्ते, व्यापारीवर्ग हे जर व्यापक हिताच्या उद्देशाने संघटित झाले, तर जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन मराठवाडा सुजलाम्-सुफलाम् होण्यास वेळ लागणार नाही. असा अशावाद बाळगायला हरकत नसावी, दुसरे काय? ●●●

**(लेखक आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# ‘पन्नास खोके, समदं ओके’

**यशवंतरावांच्या महाराष्ट्राच्या राजकारणाचे आजचे बरबटलेले चित्र पाहिल्यानंतर तेही स्वर्गातून अश्रू ढाळल्याशिवाय राहणार नाहीत. महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण देशाचाच राजकीय पोत इतका बदललाय, की ‘सत्तेसाठी वाटेल ते’ करण्याची पक्षांची आणि नेत्यांची तयारी आहे.**



**प्रा.डॉ. सुधाकर शेंडगे**

राजकारणाचा पोत बदलतोय. काळानुरूप तो बदलत असतो हे जरी मान्य केले, तरी एक प्रश्न उरतोच, की राजकारणाला स्तर असतो की नाही? एकूण देशातले आणि राज्यातले राजकारण बघितले, की राजकारण आणि राजनेते कोणत्या थराला पोहोचलेत, हे पाहून सामान्य माणूसच गळीतगात्र झाल्याशिवाय राहत नाही. राजकारण्यांना मात्र याबद्दल काहीही वाटत नाही. गेंड्याची कातडी पांघरूण त्यांनी आपल्या सवंग राजकारणाचा ‘धंदा’ तेजीत आणलाय. पूर्वी राज्य करायचे असेल, तर ‘फोडा आणि झोडा’ या नीतीचा अवलंब केला जाई. आता मात्र एक पाऊल पुढे टाकत राजकारणासाठी, सत्ता आणि संपत्ती अबाधित राखण्यासाठी ‘विका अथवा विकत घ्या’ हे नवे सूत्र विकसित होताना दिसतेय.



**राजकारण ही जनसेवा नसून तो एक ‘बिझनेस’ झालाय?**

थोडक्यात काय, तर राजकारण ही जनसेवा नसून तो एक ‘बिझनेस’ झाला आहे. आता बिझनेस म्हटले, की ‘पैसा लगाओ और पैसा निकालो’ हे सूत्र आलेच. राजकारणात येण्यासाठी पैसे लागतात, हे तर पूर्वीही आपण बघत आणि ऐकत आलो आहोत. पक्षाकडून तिकीट हवे असेल, तर पक्षाला फंड द्यावा लागत होता. निवडून येण्यासाठी खर्च करावा लागत होता. पूर्वीचा राजकारणी आपला पक्ष आणि आपला मतदार यांच्याशी एकनिष्ठ राहत होता. त्या एकनिष्ठतेच्या आधारावरच पुन्हा-पुन्हा निवडून येत होता. यशवंतराव चव्हाणांच्या या महाराष्ट्रात त्यांच्यानंतर अनेकांनी तहहयात एकाच पक्षात राहून त्याच पक्षाचा झेंडा आपल्या खांद्यावर मिरवला. सत्तेसाठी अनेकांनी अनेक पक्षांत खांदेपालट करून आपली भूक भागवली; पण जनतेशी आणि पक्षाशी एकनिष्ठ राहणारे, सत्तेसाठी कधीही सौदेबाजी न करणारे अनेक नेते या महाराष्ट्राने पाहिले आहेत.

**आपल्या पक्षाशी व विचारधारेशी शेवटपर्यंत एकनिष्ठ**

अगदी आता आताचे उदाहरण द्यायचे झाले, तर ज्यांच्या पुढे आदराने नतमस्तक व्हावे वाटायचे असे एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व या महाराष्ट्राने पाहिलेय, अनुभवलेय. त्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे नाव होते, भाई गणपतराव देशमुख. मरेपर्यंत त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे नेतृत्व केले. एकदा, दोनदा, तीनदा नव्हे, तर तब्बल अकरा वेळा ते ‘सांगोला’ या मतदारसंघातून निवडून आले. ५२ वर्षांहून अधिक काळ ते आमदार होते. खरं म्हणजे, हा एक विक्रमच होता.

ज्याची नोंद इतिहासाला घ्यावीच लागेल; पण त्यापेक्षा जास्त महत्त्वाचा मुद्दा आहे तो हा, की ५२ वर्षे हा माणूस एकाच पक्षाशी आणि आपल्या जनतेशी एकनिष्ठ राहिला. त्याने कधीही आपले इमान विकले नाही. त्यांच्यासमोर अनेक माणसे पक्ष सोडत होती, सत्तेसाठी हातमिळवणी करीत होती, नवा पक्ष काढत होती. ५२ वर्षे सत्तेत राहिलेल्या या माणसासमोर किती तरी पक्षांनी, राजकारण्यांनी हात पुढे केला असेल; पण समाजवादी निष्ठा असलेल्या माणसाने कधीही समझोतावादी होणे पसंत केले नाही. त्यांनी ते केले असते, तर सत्ता आणि संपत्ती दोन्ही मिळाले असते; पण इतिहासाने त्यांची नोंद 'गद्दार' म्हणूनच केली असती. म्हणूनच त्यांनी स्वतःशी आणि जनतेशी कधीच बेइमानी केली नाही आणि आपला पक्ष व विचारधारेशी शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिले.

**शेतकरी, शेतमजूर, दीन-दलितांच्या हक्कांसाठीच आयुष्यभर लढत राहिले**



याच महाराष्ट्रातले दुसरे एक उदाहरण देता येईल, ते म्हणजे प्रा. एन.डी. पाटील यांचे. तेही गपतरावांच्या पावलावर पाऊल टाकून आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व. तेही शेकापचे माजी आमदार. पुन्हा-पुन्हा निवडून यायचे भाग्य त्यांना नाही लाभले; पण तेही मरेपर्यंत एकाच पक्षाचा झेंडा अभिमानाने खांद्यावर मिरवत आले. विशेष म्हणजे, ज्या महाराष्ट्रात घराणेशाही आणि नात्यागोत्याचे राजकारण होत राहिले, त्या महाराष्ट्रात एन.डी. पाटील यांनी महाराष्ट्रातील दिग्गज नेते शरद पवार यांचे सख्खे मेहुणे असूनदेखील आपला पक्ष आणि विचार कुणाच्याही दावणीला बांधला नाही. वेळप्रसंगी शरद पवार यांच्यावरदेखील कठोर टीका केली. आयुष्यभर शेतकरी, शेतमजूर, दीन-दलितांविषयी बोलत राहिले. नव्हे, त्यांच्या हक्कांसाठीच लढत राहिले.

अर्थात, ही अपवादात्मक उदाहरणे असली, तरी याच महाराष्ट्रातील आहेत. यशवंतरावांच्या महाराष्ट्राच्या राजकारणाचे आजचे बरबटलेले चित्र पाहिल्यानंतर तेही स्वर्गातून अश्रू ढाळल्याशिवाय राहणार नाहीत. महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण देशाचाच राजकीय पोत इतका बदललाय, की 'सत्तेसाठी वाटेल ते' करण्याची पक्षांची आणि नेत्यांची तयारी आहे. अनेक दिवसांनी महत्प्रयासाने सत्ता मिळाली आहे. आता काहीही झाले, तरी ही सत्ता सोडायची नाही. उलट तिच्यासाठी जे-जे म्हणून करावे लागेल ते-ते करायचे. सत्तेचा उपयोग जनतेसाठी, विकासकामासाठी नव्हे, तर साम, दाम, दंड, नीती, भेद निर्माण करण्यासाठीच करायचा. सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर ज्या राज्यात आपली सत्ता नाही तिथेही 'खोके' सोडून 'ओके' राजकारण करायचे, अशी नवी राजनीती आता जन्माला घातली गेली आहे.

**अनेक राज्यांत भाजपचा आमदार खरेदीचा फंडा यशस्वी!**

गोवा, मिझोरम, त्रिपुरासारख्या राज्यांत आमदार खरेदीचा फंडा यशस्वी झाल्यानंतर मध्य प्रदेशात ज्योतिरादित्य सिंधिया यांना गळाला लावून तिथेही सत्तापालट करण्यात भाजपला यश आले आणि मग त्यांनी आपला मोर्चा महाराष्ट्राकडे वळवला. अर्थात, यापूर्वीच २०१९ लाच सत्ता संपादनाची सर्व तऱ्हेने पायाभरणी केली गेली होती. काँग्रेस-राष्ट्रवादीत पिढ्यान्‌पिढ्या राजकारणात राहिलेली दिग्गज घराणी ईडी, सीबीआयचा धाक दाखवून, आपल्या दावणीला बांधून झाली होती. ही सगळी मंडळी प्रस्थापित असल्याने निवडूनही आली होती. भाजपची ताकद पूर्वीपेक्षा आणखी वाढली होती. भाजप-सेना युतीला स्पष्ट बहुमत मिळाले होते; पण सेनेचा पूर्वानुभव चांगला नव्हता. दुय्यम खाती, दुय्यम दर्जा, सतत डावलले जाणे, यामुळे मानापमानाचे विष अनेक वेळा पचवावे लागले होते. त्यात मुख्यमंत्रिपदाने काऱ्हळ कालवण्याचे काम केले आणि





युती दुभंगली. शरद पवारांनी या संधीचा फायदा घेत तीन पक्षांची मोट बांधली, सेनेला मुख्यमंत्रिपदाचे स्वप्न दाखवले, महाराष्ट्रात आघाडीचे सरकार आले.

**त्यांना पाहिजे ते द्या अन् लवकर आपल्या कळपात आणा...**

आघाडीचे मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांनी शपथ घेतली आणि नवखे असूनही महाराष्ट्राच्या जनतेवर आपल्या कामाचा ठसा उमटवला; पण सत्तेचा हातातोंडाशी आलेला घास हिसकावल्यामुळे भाजप अस्वस्थ झाला. आता थेट उद्धव ठाकरेंशीच दोन हात करायचा चंग त्यांनी बांधला. ज्यांच्या जिवावर उद्धव ठाकरे फुरफुर करतात, ते सैन्यच आपल्या कळपात आणायचे. 'त्यांना पाहिजे ते द्या अन् लवकर आपल्या कळपात आणा' असे फर्मानच वरच्या साहेबांनी केले. म्होरक्याला मुख्यमंत्रिपद देऊ केले आणि जे मंत्री होते त्यांना मंत्रिपदे, प्रत्येक आमदाराला पन्नास खोके, निवडून आणण्याची जबाबदारी, मतदारसंघासाठी मागाल तेवढा निधी, असे म्हणताच सगळे निसटले. शिंदेंबरोबर वीस आमदारांचा ताफा होता. नंतर वीस त्यांना जाऊन मिळाले. आमदारांची सुरत, गुवाहाटी, गोवा, अशी वारी झाली. गुवाहाटीला असताना एका आमदाराला सामान्य कार्यकर्त्याने 'बापू कुठं आहात, काय हे' म्हणून फोन केला, तर आमदार म्हणाले, 'काय झाडी, काय डोंगर, काय हाटेल, समदं ओके!' कहर म्हणजे ही क्लिप प्रचंड व्हायरल झाली. त्यावरून अनेकांनी कविता, विनोद




तयार केले. मुख्यमंत्र्यांनादेखील हे खूप भारी वाटले. त्यांनीही त्या आमदाराला जाहीर कार्यक्रमातून हा डायलॉग ऐकवण्याची फर्माईश केली. इतकेच काय, त्या प्रराक्रमामुळेच ते आमदार महाशय थेट माझा कट्ट्यावर दाखल झाले. एवढे लोकप्रिय काम त्यांनी केले.

**'पन्नास खोके, समदं ओके' हा स्लोगन महाराष्ट्रभर पोहोचला**

महाराष्ट्रात नवे सरकार स्थापन झाले अन् बहुमत सिद्ध करण्यासाठी अधिवेशन बोलावण्यात आले. विधिमंडळात बोलताना दस्तूरखुद्द मुख्यमंत्र्यांनी 'दिवसा मी यांच्याबरोबर असायचो अन् रात्री त्यांच्याबरोबर असायचो. आम्ही लाठ्या-काठ्या खाल्ल्या, आमच्यावर अनेक आरोप झाले, आम्ही जेलमध्ये गेलो', असेही अभिमानाने सांगितले. अनेक मंत्री आक्रमक होऊन बोलले, 'आम्ही अनेक वेळा तडीपार झालो, अनेक वेळा जेलमध्ये गेलो.' राजकारणात आवश्यक असलेली पात्रता कशी आमच्यात ठासून भरलेली आहे, असे ही मंडळी कशाचाही मुलाहिजा न बाळगता राजरोसपणे सांगत होती.

एव्हाना 'पन्नास खोके, समदं ओके' हा स्लोगन महाराष्ट्रभर पोहोचला होता. विरोधी पक्षांनी विधिमंडळाच्या दारात उभे राहून 'पन्नास खोके, समदं ओके' या घोषणा देऊन फुटिरांना उघडे पाडायचा प्रयत्न केला. घोषणा देण्यात आघाडीवर असलेले धनंजय मुंडे यांच्याकडे बघून मुख्यमंत्री म्हणाले, 'तुम्ही मला कशाला बोलायला लावता, तुमचं मला सगळंच माहितीये, तुमची करुणा फडणवीसांनी एकदा ऐकलेली आहे.' झाले, दुसऱ्या दिवसापासून धनंजय मुंडे पायऱ्यांवर घोषणा देताना दिसलेच नाहीत. ठाण्याच्या बारचा प्रश्न जेव्हा चर्चेला आला, तेव्हा 'ठाण्याचा बार आणि बारबालांविषयी जितेंद्र आव्हाडांना सगळंच माहितेय. सांगू का आव्हाड साहेब?' असे म्हणून मुख्यमंत्र्यांनी त्यांनाही गप्प केले.

**राज्यात 'निष्ठे'ऐवजी 'निसटा' हे नवे राजकीय झाड रुजू पाहतेय**

थोडक्यात काय, तर 'मस्त चाललंय आमचं'. लोक काय म्हणतील याच्याशी कुणालाच देणे-घेणे नाही. लोकांचा फारसा विचार करायची गरज नाही. लोकांनाही सत्तेचे वलयच आवडत असते. कार्यकर्ता तर सत्तेसाठीच धडपडत असतो. तो झक मारत आपल्यामागे येणार, हा विश्वासही त्यांना आहे. या अडीच वर्षांत भरपूर निधी मिळवू आणि लोकांना आपल्या बाजूने वळवू, हा आशावादही त्यांच्या मनात आहे. एक महाशक्ती आपल्या पाठीशी उभी असल्याचा त्यांना सतत भास होतो. बरं, यापूर्वीही अनेकांनी पक्ष फोडला आहे किंवा सोडला आहे; पण महाराष्ट्रात पक्ष पळवायचीदेखील रणनीती आखली गेली आहे. खरा प्रश्न हा आहे, की ज्या पक्षाने तळागाळातील कार्यकर्त्यांना बळ दिले, मोठे केले, आमदार-मंत्री केले, चार-चार, पाच-पाच वेळा निवडून आणले, त्यांनी असलेली सत्ता सोडून सौदेबाजी करीत इतरांशी घरोबा करावा, ही घटना महाराष्ट्राचे राजकारण किती रसातळाला गेलेय, ही गोष्ट अधोरेखित करते. महाराष्ट्रात 'निष्ठे'ऐवजी 'निसटा' हे नवे राजकीय झाड रुजू पाहतेय. ते मूळ धरण्याआधीच महाराष्ट्राच्या जनतेने उखडून फेकले पाहिजे, तरच महाराष्ट्राचे भविष्य आपल्याला वाचवता येईल! नाही तर महाराष्ट्राच्याच जाहिरातीप्रमाणे 'कुठे नेऊन ठेवलाय आपला महाराष्ट्र!' असे म्हणण्यावाचून काहीही गत्यंतर उरणार नाही.

**(लेखक प्रगतिशील लेखक संघाचे अध्यक्ष आहेत.)**

व्यक्तिविशेष

# अण्वस्त्रविरोधात जागतिक शांततेचा प्रचार करणारे : मिखाईल गोर्बाचेव्ह

**अमेरिका आणि रशियातील शीतयुद्धाचा अंत होणे गरजेचे आहे असे वाटणारे, तसा प्रयत्न करणारे, साम्यवादी सोव्हिएत युनियनला सुधारणेची वाट दाखविणारे रशियाचे माजी अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह (वय ९१) यांचे नुकतेच दीर्घ आजारामुळे निधन झाले. काळाला प्रभावित करून जगाचा इतिहास व भूगोल बदलणारा नेता गेला, अशी जगभरातील नेत्यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. त्यानिमित्त थोडेसे...**



डॉ. नागार्जुन वाडेकर

युनियन ऑफ सोव्हिएत सोशलिस्ट रिपब्लिक्स (यूएसएसआर) म्हणजेच सोव्हिएत युनियन आणि आपल्याला माहीत असलेला रशिया हा जगातील एकेकाळचा सर्वांत मोठा देश आतून कसा आहे हे कोणालाच समजू नये इतका पोलादी होता. त्याच्या सरकारी माध्यमातूनच निवडक बातम्या समजत असत. त्यातून रशिया एक शक्तिशाली महासत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानात तितकाच पुढारलेला देश म्हणून बाहेरच्या जगाला माहीत होता. १९५७ मध्ये 'स्पुटनिक' नावाचा उपग्रह अवकाशात सर्वप्रथम पाठवून आपली नवीन राजकीय, सामरिक, तंत्रज्ञान क्षमता सिद्ध करून रशियाने एका नव्या अवकाश युगाचा प्रारंभ केला होता. त्यातून रशिया आणि अमेरिकेत एक नवीन स्पर्धा सुरू झाली - अवकाश स्पर्धा.



मात्र, साम्यवादी विचारसरणीचा प्रसार-प्रचार करण्यासाठी परदेशी विद्यार्थ्यांना शिक्षणसाठी शिष्यवृत्त्या देणे, जगभरातील साम्यवादी नेत्यांना रशियाची प्रगती दाखवण्यासाठी पूर्ण खर्चाने अधिवेशनास आमंत्रित करणे, सोव्हिएत साहित्यिकांचे साहित्य जगभरात पोहोचविणे, विविध भाषांत त्याचा अनुवाद करण्यास अनुदान देणे, असे अनेकविध कार्यक्रम राबवून रशिया महासत्ता म्हणून प्रगट होत होता. कालांतराने जशी रशियाची आर्थिक स्थिती खालावत गेली तसतसे अनेक कार्यक्रम बंद होत गेले. मात्र, श्रीमंत भारतीयांसाठी स्वस्तात वैद्यकीय शिक्षण देणारे छोटे-छोटे देश अजूनही रशिया म्हणूनच ओळखले जातात.

सोव्हिएत संघाने अत्यंत कमी कालावधीत अमेरिका आणि पश्चिम युरोप इतका विकास करून दाखविला; पण शीतयुद्ध काळात अमेरिकेला/नाटोला आपले लष्करी सामर्थ्य दाखविण्याच्या नादात रशिया आर्थिकदृष्ट्या फसत चालला होता. या संकटातून बाहेर पडण्यासाठी अमेरिका आणि रशियातील शीतयुद्धाचा अंत होणे गरजेचे आहे असे वाटणारे, तसा प्रयत्न करणारे, साम्यवादी सोव्हिएत युनियनला सुधारणेची वाट दाखविणारे रशियाचे माजी अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह (वय ९१) यांचे नुकतेच दीर्घ आजारामुळे निधन झाले. काळाला प्रभावित करून जगाचा इतिहास व भूगोल

बदलणारा नेता गेला, अशी जगभरातील नेत्यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**राजकीय कारकीर्द**

मिखाईल गोर्बाचेव्ह यांचा जन्म नॉर्थ कोकसस क्राई प्रांतात २ मार्च १९३१ रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. रशियाच्या दक्षिण पश्चिम टोकाला असलेला हा प्रदेश कास्पियन समुद्र आणि काळा समुद्र यामधील भाग आहे. त्याच भागात १९३०-३३ दरम्यान मोठा दुष्काळ पडला होता आणि त्यात लाखो लोकांचा जीव गेला होता. त्यावेळी राष्ट्राध्यक्ष जोसेफ स्टॅलिन यांच्या चुकीच्या धोरणांचा परिणाम म्हणून दुष्काळ पडला होता असे म्हटले जाते.

पहिल्या पंचवार्षिक योजनेनुसार धान्याची जबरदस्तीने प्रचंड साठवणूक, वेगवान औद्योगीकरण, शेतीतील घटते मनुष्यबळ आणि अनेक दुष्काळ यामुळे ही परिस्थिती आलेली होती. स्टॅलिनकडून तेथील लोकांचा हा नरसंहार असल्याचाही आरोप झाला; पण काहींच्या मते हा सोव्हिएत साम्यवादी पक्षाच्या मूलतत्त्वाच्या विरोधात खाजगी संपत्तीसाठी जमीनदारांच्या राजकीय हस्तक्षेपाचा परिणाम होता. या काळात गोर्बाचेव्ह लहानाचे मोठे झाले. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीला रशियानेच थांबवले होते, तो नरसंहार त्यांनी अनुभवला होता. स्टॅलिनच्या कार्यकाळात शेतकरी असलेल्या त्यांच्या आई-वडिलांवर साम्यवादाविरोधात जनमत तयार करण्याचा आरोप करण्यात आला होता आणि शिक्षा देण्यात आली होती. त्यामुळे गोर्बाचेव्ह यांना हिंसाचाराचा तिटकारा होता आणि त्यांचा दृष्टिकोन मानवतावादी झालेला होता, असे त्यांच्या एकूण राजकीय कारकीर्दीतून दिसून येते.

दुसऱ्या महायुद्धानंतर मॉस्कोत कायद्याचा अभ्यास करताना ऑगस्ट १९५५ मध्ये त्यांनी साम्यवादी पक्षात कामाला सुरुवात केली होती. त्यानंतर कृषी उत्पादनाचे शिक्षण घेतले. स्टॅलिननंतर अध्यक्ष झालेल्या निकिता ख्रुश्चेव्ह यांच्या सुधारणावादी कार्यक्रमांचा त्यांच्यावर प्रभाव पडला आणि त्यांनी ख्रुश्चेव्ह यांच्या स्टॅलिन-विरोधी भूमिकेचा प्रसार करण्यास सुरुवात केली. 'गोरकाया बाल्का' नावाने चर्चा गटाच्या माध्यमातून परिसरातील शेतकऱ्यांना सामाजिक संबंध वाढवण्यास मदत केली.

संपूर्ण कारकीर्दीत गोर्बाचेव्ह यांना पक्षातील अनेक महत्त्वाच्या पदांवर काम करण्याची संधी मिळाली. त्यात साम्यवादी पक्षाचे सरचिटणीस ते सोव्हिएत संघाचे अध्यक्ष, अशी महत्त्वाची पदे होती. गोर्बाचेव्ह वयाच्या ५३ व्या वर्षी म्हणजे १९८५ ते १९९१ पर्यंत साम्यवादी पक्षाचे सरचिटणीस आणि १५ मार्च १९९० ते २५ डिसेंबर १९९१ या काळात ते सोव्हिएत युनियनचे अध्यक्ष झाले. अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेण्यापूर्वी शीतयुद्धामुळे देशाची आर्थिक स्थिती डबघाईला आलेली होती म्हणून त्यांनी आर्थिक सुधारणांना प्राधान्य देण्याचे निश्चित केले. आर्थिक स्थिती सुधारायची असेल, तर अण्वस्त्रस्पर्धा आपल्याला परवडणार नाही, म्हणून त्यांनी सर्वप्रथम अमेरिकेशी सुरू असलेले शीतयुद्ध संपवण्याचा निर्णय घेतला. शीतयुद्धामुळे रशिया आणि पाश्चिमात्य देशांमध्ये कायम तणाव होता आणि त्याची झळ संपूर्ण देशाला बसत होती.

**शांतता पुरस्काराने गौरव**

दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्व जर्मनीपर्यंत रशियाने आपली राजकीय पकड बसवून तेथील राष्ट्रांमध्ये आपल्या अंकित असलेली साम्यवादी कठपुतली सरकारे आणली, तर अमेरिकेने आपल्या अर्थसत्तेच्या जोरावर पश्चिम युरोपवर आपले राजकीय प्रभुत्व प्रस्थापित केले. अमेरिका आणि मित्र देश (नाटो - उत्तर अटलांटिक संधी संघटना) विरुद्ध सोव्हिएत रशिया आणि मित्र देश (वॉर्सा करार) यांच्यात १९४७ पासूनच अण्वस्त्र स्पर्धा सुरू झाली होती.

अण्वस्त्रधारी देश असल्याने दोघेही एकमेकांच्या विरोधात



हजारो अण्वस्त्रधारी मिसाईल लावून बसले होते. शीतयुद्धाचे प्रत्यक्ष युद्धात कधी रूपांतर होईल, याची सतत भीती होती. त्यामुळे देशाचा संरक्षण खर्च प्रचंड वाढलेला होता. त्यातून देशात मंदीचे सावट पसरत होते आणि आर्थिक स्थिती खालावत होती. त्यामुळे संरक्षण खर्च कमी करून महागाई आटोक्यात आणणे गरजेचे झाले होते, म्हणून गोर्बाचेव्ह यांनी अण्वस्त्रांच्या नियंत्रणासाठी आणि शीतयुद्ध संपवण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांच्याबरोबर शिखर वार्ता करण्यास सुरुवात केली.

दोन्ही बाजूंनी सहा वर्षांच्या विविध पातळ्यांवरील चर्चांच्या प्रयत्नांनंतर आण्विक युद्धातून कोणीही जिंकत नाही, असा निष्कर्ष काढत एकमेकांच्या विरुद्ध अण्वस्त्रांचा वापर करणार नाही आणि हळूहळू अण्वस्त्रांची संख्या कमी करू, यावर त्यांचे एकमत झाले (जिनिव्हा घोषणापत्र, १९८५). अशा रीतीने अमेरिकेसोबत अण्वस्त्र

नि:शस्त्रीकरणाचा करार करून शांततेच्या मार्गाने शीतयुद्ध समाप्त करण्याच्या प्रक्रियेत पुढाकार घेतल्याबद्दल त्यांना १९९० मध्ये नोबेल शांतता पुरस्काराने गौरवण्यात आले.

**इतिहास घडविण्यात योगदान (१९८६-१९९१)**

गोर्बाचेव्ह यांनी 'ग्लासनोस्त' (Glasnost) आणि 'पेरेस्त्रोईका' (Perestroika) अशी दोन धोरणे आखली. 'ग्लासनोस्त' म्हणजे मुक्त धोरण/पारदर्शकता/खुलेपणा आणि 'पेरेस्त्रोईका' म्हणजे पुनर्रचना/पुनर्गठन/फेररचना. लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी, विकासाची गती वाढवणे, सरकारचे नियंत्रण कमी करणे आणि विरोधी विचारांना मुभा देणे, ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी पक्षात आणि देशात अनुकूल परिस्थिती निर्माण केली आणि ती अंमलात आणली. 'ग्लासनोस्त'च्या खुलेपणाने अभिव्यक्ती स्वातंत्र्य जनतेपर्यंत पोहोचले. त्यांच्या काळात वृत्तपत्रे आणि कलाकारांना सांस्कृतिक स्वातंत्र्य देण्यात आले. आपल्याकडील माहितीच्या अधिकारासारखे पारदर्शकतेचे, सरकारला सल्ला देणे आणि माहितीच्या प्रसाराचे धोरण स्वीकारले गेले. त्यामुळे सरकारी धोरणांमधील पोलादी पडदे हटले. सामान्य जनतेला सरकारच्या धोरणांवर टीका करता येऊ लागली.

'पेरेस्त्रोईका'च्या पुनर्रचना कार्यक्रमाने आर्थिक निर्णयक्षमतेची फेररचना करण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रशासन, न्यायपालिका, शिक्षण आणि अर्थव्यवस्थेच्या साम्यवादी यंत्रणेत तातडीने आणि आमूलाग्र बदल करून तरुण नेतृत्वाला, नव्या विचारांना प्राधान्य देण्यात आले. वॉर्सा करारातील मित्र राष्ट्राच्या अंतर्गत मामल्यात हस्तक्षेप केला जाणार नाही, अशी घोषणा केली. महागाई आणि अपुरा पुरवठा यातून मार्ग काढण्यासाठी आर्थिक सुधारणांवर भर दिला गेला. विदेशी गुंतवणूक वाढेल, अशी अपेक्षा होती. त्यांनी आणलेल्या लोकशाहीवादी सुधारणा आवश्यकच होत्या; पण आधीच सरकारच्या दडपशाहीला कंटाळलेल्या आणि अर्थव्यवस्था कोसळल्याने युरोपात सोव्हिएत युनियनमध्ये साम्यवाद्यांकडून लोकशाही समर्थक निदर्शने वाढली.

पोलंडमधील सॉलिडॅरिटी चळवळ, डॅन्स शिपयार्ड चळवळ, चेकोस्लाव्हाकियातील वेल्व्हेट क्रांती, व्हॅक्लाव्ह हॅवेल राजकीय विरोध, रोमानियन क्रांतीतून कोसेस्कचा पाडाव, पूर्व बर्लिनमधील दंगे इत्यादींची परिणती अखेर बर्लिनची भिंत कोसळण्यात झाली (१९८९) आणि पूर्व व पश्चिम जर्मनीचे एकीकरण झाले (१९९०). पश्चिम जर्मनी आधुनिक आणि संपन्न देशात जाण्यासाठी उद्ध्वस्त पूर्व जर्मनीतील लोकांची रीघ लागली. दरम्यान, पूर्व युरोपातील अनेक देशांत साम्यवादी अर्थव्यवस्था कोसळून लोकशाहीवादी व्यवस्था निर्माण होण्यात आणि पुढे त्याची परिणती सोव्हिएत युनियन कोसळण्यात झाली.

अर्थव्यवस्था सुधारण्याच्या कार्यक्रमातून सोव्हिएत युनियन वाचवण्याचे भरघोस प्रयत्न त्यांनी केले. मात्र, त्यात त्यांना यश आले नाही. काही जाणकारांच्या मते यावेळी त्यांच्या जिवालासुद्धा धोका होऊ शकला असता; पण ते डगमगले नाहीत. सोव्हिएत युनियनचे विघटन झाले म्हणून पाश्चिमात्य देशांनी आनंद व्यक्त केला. त्यांना वाटले त्यांचा एक शत्रू संपला; पण आज आपण पाहतो, की शस्त्र स्पर्धा संपली तर नाहीच; पण वाढली आणि आज त्या भागात तर युद्धच सुरू आहे.

गोर्बाचेव्ह यांनी १९८९ मध्ये पूर्व युरोप आणि अफगाणिस्तानच्या लांबत चाललेल्या युद्धातून रशियन फौजा माघारी घेतल्या. त्यांच्या कार्यकाळात मानवतावादी दृष्टिकोनातून हजारो राजकीय कैद्यांची सुटका केली गेली. १९९१ मध्ये सोव्हिएत युनियनच्या विघटनापूर्वी लिथुआनिया, लाटव्हिया आणि एस्टोनियादेशांनी फारकत घेऊन स्वातंत्र्य घोषित केले. त्यावेळी गोर्बाचेव्ह यांनी सैन्य पाठवले. त्यात मोठी मनुष्यहानी झाली. पुढे त्यांच्या लोकशाहीवादी सुधारणांना विरोध म्हणून त्यांच्या सहकाऱ्यांकडूनच ऑगस्ट १९९१ मध्ये त्यांची सत्ता उलथवून टाकण्याचा प्रयत्नही झाला. अखेर त्यांनी डिसेंबर



१९९१ मध्ये सोव्हिएत युनियनच्या विभाजनाची घोषणा केली आणि अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. गोर्बाचेव्ह हे उदारमतवादी होते; पण सोव्हिएत युनियनच्या विघटनामुळे रशियन जनता त्यांच्यावर कायमची नाराज झाली आणि लवकरच ते विस्मृतीत गेले. १९९६ मध्ये त्यांनी राजकारणात पुन्हा परत येण्याचा क्षीण प्रयत्न केला होता. मात्र, त्यात त्यांना यश आले नाही. पुढे त्यांनी 'गोर्बाचेव्ह फाउंडेशन' नावाची संस्था स्थापन केली आणि अनेक देशांत अण्वस्त्रविरोधात जागतिक शांततेचा प्रचार केला.

**रशिया आणि भारत**

भारत-पाकिस्तान युद्धात तोडगा काढण्यासाठी भारताचे प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री आणि पाकिस्तानचे जनरल अयुब खान यांच्यात जानेवारी १९६६ मध्ये सोव्हिएत युनियनमधील उझबेकिस्तानची राजधानी ताश्कंदला करार झाला होता. करार झाल्यानंतर तिकडेच लालबहादूर शास्त्रींचे निधन झाले होते. रशिया हा जवाहरलाल नेहरू, लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी यांच्या काळापासून आपला कट्टर समर्थक होता व आजही आहे. सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतरही रशियाचे आणि आपले संबंध कायम मैत्रीचे राहिले.

भारताचे परराष्ट्र धोरण कायम रशियाच्या बाजूचे होते. अमेरिका मात्र पाकिस्तानला सर्व प्रकारची मदत करत होता. संयुक्त राष्ट्र समितीमध्ये व्हेटो पॉवर असलेल्या रशियावर आपली कायम भिस्त राहिलेली आहे. अन्नधान्य तसेच संरक्षण क्षेत्रात रशियाने भारताला कायम मदत केली आहे. रशियाकडून युद्धसामग्री, लढाऊ विमाने आणि तंत्रज्ञान मिळाल्यामुळे आपण संरक्षण उत्पादनात आणि अणू क्षेत्रात स्वयंपूर्ण झालो आहोत. भारत अलिप्ततावादी परराष्ट्र धोरणाचा जनक असला तरी रशियाने युद्धसदृश परिस्थितीमध्ये भारताला मदत केली आहे. गोर्बाचेव्ह आणि प्रधानमंत्री पंतप्रधान राजीव गांधी यांची घनिष्ठ मैत्री होती. १९८६ ला त्यांनी भारताला भेट दिली होती. गोर्बाचेव्ह यांनी मदत करून भारताच्या विकासाला हातभार लावला आहे.

शीतयुद्ध संपून जगात शांतता नांदावी म्हणून त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन भारताने त्यांना १९८७ साली 'इंदिरा गांधी शांतता पुरस्कार' देऊन गौरवले आहे. भारताने युक्रेन-रशिया युद्धाच्या वादात न पडता रशियाला मदत केली असली तरी आज चीनच्या भीतीने भारताचे परराष्ट्र धोरण अमेरिकेच्या बाजूने झुकत असल्याचे दिसत आहे.

**जागतिकीकरण आणि साम्यवादी चीन-रशिया**

चीनसुद्धा एक साम्यवादी देश असताना जागतिकीकरणाचा फायदा घेण्यासाठी त्यांनी समाजवादासोबतच भांडवलवादी अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. साम्यवादी सरकारच्या विरोधातील लोकशाही स्वराला वेळीच चिरडून टाकण्यात चीन सदैव अग्रेसर असतो. थिआनमेन चौकात लोकशाहीची मागणी करणारे तरुण विद्यार्थी आंदोलक असोत (१९८९), जॅक मा, ग्वा ग्वांगचांग, रेन झिकीयांगसारखे उद्योगपती असोत (२०१५-२०) वा हाँगकाँगमधील लोकशाहीची मागणी करणारे तरुण आंदोलक असोत (२०१९), चीन आपली कठोर साम्यवादी भूमिका सोडायला तयार नाही. या पार्श्वभूमीवर १९८९ मध्येच चीनला भेट देऊन आलेले गोर्बाचेव्ह यांनी सोव्हिएत युनियनमधील लोकांच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षांना मुक्त वाव देण्याची भूमिका निश्चितच त्यांच्या उदारमतवादी, मानवतावादी विचारांची साक्ष देणारी आहे.

जग जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावर असताना सोव्हिएत युनियनमधील तरुणाईला पाश्चिमात्य देशांची प्रगती, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आधुनिक जीवनशैली खुणावत होती. तरुणांच्या आकांक्षांना वाट करून देण्यासाठी खुलेपणा आणि पुनर्रचनेचा स्वीकार करण्याशिवाय सोव्हिएत युनियन आणि गोर्बाचेव्ह यांना पर्याय नव्हता. त्यांनी केलेल्या सुधारणांचे जगभरात कौतुक झाले; पण रशियाची खालावलेली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी पाश्चिमात्य देशांकडून म्हणावी तशी आर्थिक मदत मिळालीच नाही.

सोव्हिएत युनियनचे विघटन झाले म्हणून व्लादिमीर पुतीन यांचा आजचा रशिया शांत झालेला आहे, असे दिसत नाही. पूर्वीचा महासत्ता असलेला सोव्हिएत त्यांना पुन्हा हवा आहे. त्यातील प्रत्येक देश आपल्याच बाजूने हवा आहे किंवा विरोधी गटात नको आहे या हट्टातून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांची नाटोबद्दलची भीतीसुद्धा व्यक्त होत असेल. काही वर्षांपासून पूर्वाश्रमीच्या सोव्हिएत युनियनमधील



शेजारी राष्ट्रांवर आक्रमण करण्याच्या रशियाच्या भूमिकेतून एक बाब स्पष्ट होतेय, की शीतयुद्ध कधीच संपलेले नव्हते.

प्रधानमंत्री व्लादिमीर पुतीनच्या काळात रशियाने वेगळेच 'शीत'युद्ध लढले - अमेरिकेच्या २०१६ च्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष हस्तक्षेप करून डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार हिलरी क्लिंटन यांच्याविरोधात आणि रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्या बाजूने सायबर/डिजिटल प्रचार करून डोनाल्ड ट्रम्प यांना जिंकण्यासाठी मदत केली म्हणून सुरू झालेले वादंग अजून शमलेले नाही. याचाच अर्थ आज शीतयुद्ध वा प्रत्यक्ष युद्ध शस्त्रांचा वापर न करता आर्थिक आणि सायबर क्षेत्रांच्या माध्यमातून लढले जात आहे. एखाद्या देशाची धोरणे आपल्याला हवी तशी वाकवण्यासाठी वाट्टेल तो मार्ग निवडण्याची पद्धत रूढ झालेली आहे. एखाद्या देशाच्या निवडणुका प्रभावित करणे म्हणजे त्या देशाच्या सार्वभौमत्वावर, लोकशाहीवर, अर्थात जिवंत लोकांवर प्रत्यक्ष हल्लाकरण्यासारखेच आहे.

युक्रेन नाटो संघटनेत सामील झाला, तर रशियाला धोका आहे म्हणत रशियाने युक्रेनवर आक्रमण केले आहे. अजूनही युक्रेन-रशिया प्रत्यक्ष युद्ध सुरू आहे. अमेरिका आणि नाटो युक्रेनच्या बाजूने प्रत्यक्ष युद्धात सहभागी नसले, तरी युक्रेनला शस्त्रास्त्र पुरवठा करत आहेत आणि रशियाने युद्ध थांबवले नाही, तर शीतयुद्ध संपवून नाटो प्रत्यक्ष युद्धात सहभागी होईल, अशी धमकीसुद्धा देत आहेत. रशिया अण्वस्त्रांचा वापर करेल की काय, अशी पाश्चिमात्य देशांना भीती आहे. अण्वस्त्रांनी सज्ज असलेले अनेक देश प्रत्यक्ष युद्ध लढायलाही तयार आहेत. उद्याच्या जगात शीतयुद्धाचे अक्ष कदाचित रशिया-अमेरिका, अमेरिका- चीन, चीन-भारत, असे बदलेले असतील, तेव्हा भारत अलिप्त असेल का, हा प्रश्न आहे.

पृथ्वीवरील सर्व सजीव सृष्टी अण्वस्त्रांच्या छायेखाली असताना अण्वस्त्र नि:शस्त्रीकरणाचा करार करण्यासाठी शांततेचा पुरस्कार मिळविणाऱ्या मिखाईल गोर्बाचेव्ह यांना आपण कशी श्रद्धांजली वाहणार, हे आपण निवडून दिलेल्या नेत्यांच्याच हाती असणार आहे!

**(लेखक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात सहयोगी प्राध्यापक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख आहेत.)**

# वाचनाने मला घडवले, मी कायम वाचकांचा ऋणी : प्राचार्य रा. रं. बोराडे

**माझ्या लिखाणामध्ये माझ्या पत्नीचे म्हणजेच सौ. सुलभा बोराडे हिचे मला नेहमी सहकार्य लाभले. कुटुंबाच्या तसेच माझ्या आयुष्यात आलेल्या अनेक वाचकांच्या आणि सामाजिक संस्थांच्या सहकार्यामुळे हा प्रवास अधिक सोपा झाला. 'पाचोळा' कादंबरीच्या यशामध्ये या कादंबरीच्या प्रकाशकांचा मोठा वाटा आहे. असे मनोगत ज्येष्ठ साहित्यिक रा.रं. बोराडे यांनी त्यांच्या गाजलेल्या पाचोळा कादंबरीच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.**



**आशय बबिता दिलीप येडगे**

दिगज साहित्यिक आणि साहित्यप्रेमींच्या उपस्थितीत औरंगाबादेत पार पडला 'सुवर्णमहोत्सवी पाचोळा' समारंभ 'वाचनाने मला घडवले' माझ्या लिखाणप्रवासाची प्रेरणा हे माझे वाचनच आहे. गेल्या ६५ वर्षांच्या माझ्या साहित्यिक प्रवासात मी एकाच वाङ्मय प्रकारात अडकून राहणार नाही, याची काळजी घेतली आणि नेहमी त्याच अंगाने लेखन करत राहिलो. माझ्या लिखाणामध्ये माझ्या पत्नीचे म्हणजेच सौ. सुलभा बोराडे हिचे मला नेहमी सहकार्य लाभले. कुटुंबाच्या तसेच माझ्या आयुष्यात आलेल्या अनेक वाचकांच्या आणि सामाजिक संस्थांच्या सहकार्यामुळे हा प्रवास अधिक सोपा झाला. 'पाचोळा' कादंबरीच्या यशामध्ये या कादंबरीच्या प्रकाशकांचा मोठा वाटा आहे. असे मनोगत ज्येष्ठ साहित्यिक रा.रं. बोराडे यांनी त्यांच्या गाजलेल्या पाचोळा कादंबरीच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.



ज्येष्ठ साहित्यिक रा.रं. बोराडे यांच्या 'पाचोळा' या गाजलेल्या कादंबरीला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने औरंगाबाद येथील एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात 'सुवर्णमहोत्सवी पाचोळा' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या उद्‌घाटन सोहळ्याला अध्यक्ष म्हणून मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, तर समारोपाला ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्‌घाटक म्हणून ९५ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि कथाकार भारत सासणे, प्रमुख पाहुणे म्हणून एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, ज्येष्ठ कवी आणि साहित्यिक फ.मुं. शिंदे, भालचंद्र कांगो, साकेत प्रकाशनाचे बाबा भांड, महात्मा गांधी मिशनचे विश्वस्त प्रतापराव बोराडे, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, डॉ. अपर्णा कक्कड, अशोक तेजनकर, सुहास तेंडुलकर, डॉ. गणेश मोहिते, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे नीलेश राऊत, राहुल कोसंबी, प्रेरणा दळवी, कैलास अंभुरे, डॉ. रेखा शेळके आदी मान्यवरांची उपस्थिती होती. औरंगाबाद, मराठवाडा आणि महाराष्ट्रातील साहित्य रसिकांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने हजेरी लावली. 'पाचोळा' या ग्रामीण साहित्यातील कादंबरीच्या प्रकाशनाला पन्नास वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने औरंगाबाद येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

'पाचोळा' ही मातीचा सुगंध अबाधित ठेवणारी कादंबरी असून, समकालीन स्पंदनांनी प्रेरित होऊन रा.रं. बोराडेंनी साकारलेली ही एक अप्रतिम साहित्यकृती आहे. 'पाचोळ्या'तून त्यांनी गरिबीशी लढणाऱ्या एका माउलीची कथा जगासमोर मांडली आहे. मराठी साहित्याला त्यांनी 'पाचोळ्या'चा रूपाने एक अनमोल ठेवा दिला आहे. असे प्रशंसोद्गार ९५ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे यांनी 'सुवर्णमहोत्सवी पाचोळा' या कार्यक्रमाचे उद्‌घाटक म्हणून बोलताना काढले. 'सुवर्णमहोत्सवी पाचोळा'निमित्त दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उद्‌घाटन सोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील युवा साहित्यिक सुनीता बोर्डे, मेघा पाटील, प्रसाद कुमठेकर, सुशील धसकटे आणि संतोष जगताप यांचा सन्मान करण्यात आला.




'पाचोळा' आणि समकालीन साहित्यावर, मराठी साहित्यातील मराठवाड्याच्या साहित्यिकांच्या योगदानावर बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील म्हणाले, की मराठवाड्यात दीर्घकाळ निजाम आणि परकीय सत्तेचा प्रभाव असल्याने मागील काही शतकांमध्ये साहित्य समृद्ध होऊ शकले नाही. एक-दोन उदाहरणे सोडता दर्जेदार साहित्यिक तयार झाले नाहीत. मात्र, १७ सप्टेंबर १९४८ नंतर मराठवाडा भारतात सामील झाला आणि तेथून साहित्यिकांच्या पिढ्या मराठवाड्यात तयार होऊ लागल्या. मराठवाडी साहित्याला घडविणाऱ्या पहिल्या पिढीचे महत्त्वाचे साहित्यिक म्हणजे रा.रं. बोराडे. मराठवाड्याचे साहित्य पाच खांबांवर उभारले गेले आहे. कवितांचा विचार केला, तर ज्येष्ठ कवी ना.धों. महानोर, विचारांच्या बाबतीत नरहर कुरुंदकर, साहित्य समीक्षेच्या क्षेत्रात सुधीर सराळ, कादंबरीकार लक्ष्मीकांत तांबोळी आणि मराठवाडी साहित्याचे पाचवे स्तंभ म्हणजे रा.रं. बोराडे हे आहेत.

या कार्यक्रमाचे उद्‌घाटक आणि ९५ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे बोराडेंच्या 'पाचोळा' कादंबरीचे कौतुक करताना म्हणाले, पाचोळ्यात मातीचा सुगंध आहे. समकालीन स्पंदनांचे ते वास्तव चित्रण आहे. एखाद्या कादंबरीच्या पन्नाशीनिमित्त एवढा मोठा सोहळा आयोजित केला जाणे आणि त्या सोहळ्याला साहित्य रसिकांची एवढ्या मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त उपस्थिती असणे हेच या कादंबरीचे महत्त्व विशद करत असते. दरम्यान, अजूनही 'पाचोळा' या कादंबरीची योग्य समीक्षा साहित्य समीक्षकांनी केलेली नसल्याची खंतही भारत सासणे यांनी व्यक्त केली. उद्‌घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन प्राध्यापिका ज्योती स्वामी यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. कैलास अंभुरे यांनी केले.

उद्‌घाटन सोहळ्यानंतर 'पाचोळा ७१ ते २१' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात रणधीर शिंदे, नितीन रिंढे, दत्ता घोलप या समीक्षकांनी वेगवेगळ्या अंगांनी पाचोळा या साहित्यकृतीबद्दल आपले मत नोंदविले. मराठी समीक्षण क्षेत्रातील उणिवा आणि त्यायोगे 'पाचोळा' कादंबरीचे झालेले अपुरे समीक्षण यावर उपस्थित समीक्षकांनी बोट ठेवले. 'पाचोळा ७१ ते २१' या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. समिता जाधव यांनी केले, तर प्रा. राहुल कोसंबी यांनी उपस्थितांचे आभार मानले.


दुपारच्या सत्रात 'पाचोळा ७० mm' या कार्यक्रमात 'पाचोळा' कादंबरीवर आधारित चित्रपटाचा ट्रेलर आणि त्यात काम केलेल्या रंगाकर्मींतर्फे अभिवाचनही करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेते मकरंद अनासपुरे आणि ज्येष्ठ नाटककार अजित दळवी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात 'पाचोळा' कादंबरीतील काही भागाचे अभिवाचन नीना निकाळजे यांनी केले, तर या कादंबरीवरील प्रस्तावित चित्रपटातील कलाकारांनी नाट्यरूपांतर सादर करत 'पाचोळा' कादंबरीवरील चित्रपट करत असतानाचा अनुभव सांगितला. 'पाचोळा ७० mm' या कार्यक्रमाचे संवादक शिव कदम होते. सूत्रसंचालन प्रा. समाधान इंगळे यांनी केले, तर ज्येष्ठ पत्रकार प्रशांत पवार यांनी आभारप्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'पाचोळा' कादंबरीचे लेखक रा.रं. बोराडे यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. या सत्कार समारंभास आवर्जून उपस्थित असलेले ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांनी आपल्या भाषणात बोराडेंचे मराठी साहित्यविश्वाला मोठे योगदान असल्याचे सांगितले. सन्मान सोहळ्याला शहर आणि राज्यभरातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. सन्मान सोहळ्याचे सूत्रसंचालन राहुल गिरी यांनी केले, तर आयोजकांच्या वतीने आभारप्रदर्शन प्रेरणा दळवी यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महात्मा गांधी मिशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचा मराठी विभाग, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, यशवंतराव चव्हाण जिल्हा केंद्र, औरंगाबाद, अभ्युदय फाउंडेशन या संस्थांनी पुढाकार घेतला होता. ●●●

**(लेखक 'बाईमाणूस' पोर्टलचे समन्वयक आहेत.)**

# जात वास्तवाची उकल मांडणारा कवितासंग्रह : सालं अतीच झालं!



डॉ. मिलिंद विनायक बागुल

सद्यःस्थितीला भिडस्तपणे सामोरे जात आपल्या लेखणीला धार देत सन्मानाने, स्वाभिमानाने जगण्याची दिशा ठरविणारा साहित्यिक, विचारवंत, लेखक, कवी इतिहास घडवीत असतात. समाजमनाला एक नवी जागृती निर्माण करण्यासाठी ते प्रयत्नशील असतात. अशा प्रयत्नांतून जाती-धर्माच्या पलीकडचा माणुसकी जोपासणारा माणूस घडताना दिसत असतो, असा माणूस घडावा, अशी अपेक्षा समाजमन आजही ठेवून आहे, ही अपेक्षा रास्त आणि स्वाभाविक अशीच आहे. लाचार आणि स्वार्थी जगणाऱ्या माणसांची संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसते आहे. आपल्या कुटुंबाला सुख, चैन आणि मौजमस्ती या पलीकडे दिशा न देणारी मानसिकता वाढू लागली असल्याने माणसाच्या नैसर्गिक अधिकारांची मागणी करणाऱ्या चळवळी हळूहळू लाचार आणि बेबनाव करणाऱ्या ठरू लागल्या आहेत, अशा लाचार मानसिकतेला जागा दाखवणारा 'सालं अतीच झालं!' हा खेमराज भोयरलिखित कवितासंग्रह समाजमनाला आत्मभान आणणारा असाच आहे. ९६ कवितांचा समावेश असलेला हा कवितासंग्रह जी वास्तवता मांडून जातो त्या वास्तवतेतून निश्चितच चीड निर्माण होऊन वेदनेतून विद्रोहाकडे होणारी वाटचाल आपल्या न्याय्य हक्कांकडे नेणारी ठरत असते. कवी खेमराज भोयर 'रोडवर अन् बेडवर' या कवितेत लिहितात,

**इरसाल प्रस्थापित कारट्यांनो**
**तुम्हीही त्याच मायच्या**
**उदरातून जन्मल्या**
**आणि आम्हीही त्याच मायच्या उदरातून**
**मग तुम्ही काहून बेडवर आणि आम्ही काहून रोडवर**
**याचं खरं कारण**
**मले आता आता कळलं**

शिक्षणातून आलेल्या सजगतेमुळे आपल्याला फसवणारी प्रस्थापित समाज व्यवस्थेची मानसिकताच उघडपणे लक्षात येते. ही किडलेली, सडलेली मानसिकता लक्षात घेत कवी आपल्या कवितेतून त्या मानसिकतेचा समाचार घेतात. त्यांना त्यांची जागा दाखवतात. लेखणीचे हत्यार उगारतात. लेखणीतून प्रस्थापित समाजव्यवस्थेला जाब विचारतात. उघडपणे होणारा अन्याय अत्याचार हा कसा जाणीवपूर्वक केला जातोय याची मांडणीच कवी कवितेतून लिहितात.

समाजात असणाऱ्या उपद्व्यापी, अराजक माजविणाऱ्या मानसिकतेला लगाम घालण्यासाठी आपल्यातली नैतिकता आणि विचारशीलता जागृत करण्याबरोबरच आता आम्हाला घराबाहेर पडले पाहिजे, घराला सोडताना समाजाची माणसे माणुसकीच्या वर्तुळात आणण्याची जबाबदारी आम्हाला समजून घेतली पाहिजे. माणसाच्या वृत्ती-प्रवृत्तीला एकूणच जबाबदार असलेल्या व्यवस्थेला बदलविण्यासाठी आम्हाला निश्चितपणे बऱ्याच अंशी त्यागाची, शौर्याची, पराक्रमाची इतिहासातील पाने पडताळून पाहिली पाहिजेत. यासाठी कवी आपल्या स्वतःच्या लेखणीला परजून घेताहेत, सोडवून घेत आहेत. 'पेट्रोल काढू दोस्ता' कवितेत ते लिहितात,


**नाव डबक्यातील आता सागरात सोडू दोस्ता**
**लाथ मारून पाणी नाही चल पेट्रोल काढू दोस्ता**
**काठ फिरून खोलीचा अंत लागणे नाही इथे**
**मेंदू नासण्या भक्तीची**
**ती कोंडी फोड दोस्ता**

आपली लेखणी परजून घेताना कवी आपल्या कवितेतून नवा आशावाद मांडतात. हा आशावाद स्फोटक जरी असला तरी त्यातून माणसांच्या विचारांना योग्य दिशा देण्यासाठी कवीचा आक्रमकपणा निश्चितपणे समाजपरिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करणारा असाच आहे. माणसाला मिळालेला निसर्गदत्त अधिकार जेव्हा माणूसच माणसाला नाकारतो त्यावेळी शोषणाच्या तऱ्हा वेळोवेळी लक्षात घेत अन्याय, अत्याचारी माणसाच्या विरोधात बंड करून उठण्याची ताकद येण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आत्मसात करण्याची गरज असण्याबरोबरच त्या विचारांना अनुसरून संघर्षाची तयारी केली पाहिजे. स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरदेखील अस्पृश्यता कायम टिकवून ठेवणाऱ्या इथल्या व्यवस्थेचा कवी निषेध करतात. माणसाच्या मनातल्या जातीयतेला इथल्या जातव्यवस्थेला सडेतोड उत्तर देण्याची गरजच कवीला अपेक्षित आहे. क्रिया, प्रतिक्रिया या उक्तीच्या अनुषंगाने जशास तसे अशा प्रकारची मानसिकता वृद्धिंगत करण्याची गरज निश्चितच आहे, हे कवी स्पष्टपणे मांडून जातात. वंचितांचे, कामगारांचे, मजुरांचे आणि शेतकऱ्यांचे दुःख हे समाजव्यवस्थेत अजून कायमच आहे. व्यवस्थेतील वास्तवता मांडताना कवी खेमराज भोयर आत्महत्या डॉट कॉम या कवितेत लिहितात,

**कागदी घोडे अन्**
**कम्प्युटरचा जमाना आहे**
**शेतकऱ्यांसाठी आत्महत्येचा**
**कॉलम रोज रिकामा आहे**

गेंड्याच्या कातड्याची असलेली इथली व्यवस्था माणसासाठी आहे की स्वार्थासाठी, प्रश्न दूर करण्यासाठी आहे की प्रश्न वाढविण्यासाठी किंवा निर्माण करण्यासाठी आहे, असा सवालच कवी विचारतात. संगणकाच्या युगात माणुसकीशून्य होत जाणारा माणूस दुसऱ्याच्या दुःख, वेदनेकडे दुर्लक्ष करीत आपली पोळी शेकण्याचा प्रयत्न करतोय. यामुळे समाजव्यवस्था पोखरली जात असल्याचे लक्षात आल्यावाचून राहत नाही,

**जनावरांच्या चाऱ्याला सोन्याचा भाव येते**




**अन् सोन्यासारखा पोरगा**
**भाकर भाकर म्हणत जीव देते**
**याला जबाबदार आमचे नालायक भाडोत्री नेते**
**नाइलाज आमचा आम्ही पोटासाठी विकतो मते**

भारतीय लोकशाहीची होणारी वाटचाल कवी वास्तव अशी मांडतात. इथल्या भांडवलदार व्यवस्थेने भारतीय लोकशाही फक्त नावापुरती मर्यादित केली आहे. इथल्या तळागाळातल्या वंचितांच्या लेकरांना भाकरीची आस अजूनही आहे. अन्न, वस्त्र, निवाऱ्यापासून वंचित असलेली अनेक कुटुंबे आजही गावाच्या वेशी, शहराच्या फुटपाथवर कायम आहेत. दुःख, दारिद्र्यापासून अजूनही त्यांची सुटका नाही. राज्यकर्त्यांना त्यांच्या सुटकेसाठी त्यांच्या जीवनमानाला उंचावण्यासाठी प्रयत्न करावासा वाटत नाही. भांडवलदारी व्यवस्थेने घेरलेल्या इथल्या पुढाऱ्यांना, नेत्यांना आपली दुकाने कायम टिकविण्यासाठी, थाटण्यासाठी गरीब-वंचितांना वेशीबाहेरच ठेवायचे आहे. साऱ्या गरिबांचाच असा कसा नाइलाज आहे, की ते पोटासाठी मत विकतात ही वास्तवता कवी आपल्या समाजव्यवस्थेतील भयानक, विदारक असे चित्रच कवितेतून रंगवतो. यातून लोकशाहीचा होणारा प्रवास किती यातनामय आहे, हे लक्षात येते. लोकशाहीचा डोलारा कोसळावा यासाठी सर्वांकडून प्रयत्न चालवलेले आहेत. धर्म, जातीच्या आड लेखण्या बरबाद केल्या जाताहेत. सर्व क्षेत्रांत राजकारणाचा प्रवेश होतोय. साहित्य क्षेत्रातल्या राजकारणाविषयी लिहिताना कवी साहित्यातील राजकारण कवितेत लिहितात,

**साहित्याचे राजकारण दलालांच्या घरात आहे**
**लांडग्यांच्या दावणीला मेंढरांची वरात आहे**
**गंपूचे कंपू झाले कुणासाठी काय लिहितात**
**थापा परिवर्तनाच्या मन शाल पुरस्कारात आहे**

समाजस्वास्थ्याच्या माणसाच्या जगण्याचा, त्याची दुःख, वेदना आणि त्यातून निर्माण होणाऱ्या विद्रोहाचा विचार मांडणारी आपल्या लेखनातून व्यक्त होणारी फार थोडीथोडकी माणसे, लेखक, साहित्यिक लिहिणारी आहेत. बाकी बरीचशी साहित्य मंडळी राजकारण्यांच्या दावणीला बांधलेली आहे. काही खुशमस्करे स्वतःला मिरवत आहेत, तर मानपान आणि पुरस्काराकडे लक्ष ठेवून आपल्या लेखणीची वाट लावणारे आहेत. अशा या वृत्तीमुळे समाजमन दिशाहीन आणि भरकटलेले आहे. व्यवस्थेवरचा लेखणीचा असलेला अंकुश राहिलेला नाही. यामुळेच कवी आपल्या कवितासंग्रहाचे शीर्षक समर्पक असे देतात 'सालं अतीच झालं!'. हे शीर्षक देशभरातल्या परिस्थितीचे भान लक्षात आणून देते. कवितासंग्रहाला ज्येष्ठ कवी प्रा. डॉ. यशवंत मनोहर सरांची प्रस्तावना असून, सासवडच्या 'परिस पब्लिकेशन'ने प्रकाशित केलेले 'सालं अतीच झालं!' या कवितासंग्रहातील खेमराज भोयरलिखित कविता व्यवस्थेला जाग आणणाऱ्या आहेत. वास्तवता निदर्शनास आणून देताना विनाशाचा इशारादेखील देऊन जाणाऱ्या आहेत. कवी लोकनाथ यशवंत, सागर सरहद्दी यांनी कवितासंग्रहाची केलेली पाठराखण ही निश्चितपणे प्रामाणिक अशा देशाप्रती निष्ठा राखणाऱ्या कवीला ऊर्जास्रोत देण्याबरोबरच लेखणीला अर्थ प्राप्त करून देणारी अशीच आहे. खेमराज भोयर यांच्या प्रामाणिक निष्ठेला, लेखणीला सन्मानपूर्वक शुभेच्छा!

**(लेखक भीम रमाई प्रतिष्ठान, जळगावचे अध्यक्ष आहेत.)**

# द्रविडीस्थानच्या सावल्या



भारत एक संघराज्य आहे आणि या संघात केंद्रशासित प्रदेशासह छत्तीस राज्ये आहेत. या सर्व राज्यांची संस्कृती वेगळी आहे. प्रदेश वेगळा आहे. इतिहास वेगळा आहे. भाषा वेगळी आहे. ही सर्व विविधता असतानाही भारताला एक राष्ट्र करण्याचे स्वप्न घेऊन ही सारी राज्ये एका साखळीत बांधली गेली. त्यांचा एक संघ झाला. एक सुगंधित माळ झाली. या माळेला, या संघाला टिकवण्याची आणि ती अधिक बळकट करण्याची जबाबदारी केंद्रावर असते. ती पार पाडताना काही वेळा आपपरभाव असतो. त्या-त्या प्रदेशातील संस्कृतीचा आदर करताना, ती विकसित करतानाही असा भाव तयार होतो. आपल्याकडे वेगवेगळे प्रदेश आणि वेगवेगळे पक्ष आहेत. हे पक्ष आपापले राजकीय अस्तित्व टिकवण्याचा, आपापल्या संस्कृतीशी इमान राखण्याचा प्रयत्न करत असतात. त्यात केंद्राचीही भूमिका महत्त्वाची आणि प्रोत्साहनाची असते; पण यात थोडीही हालचाल झाली, की वेगवेगळ्या कारणांवरून प्रादेशिक वाद उफाळून येतो. केंद्र आणि राज्य यांचे संबंध आपल्या राज्यघटनेने अतिशय सुंदर गुंफण्याचा प्रयत्न केला आहे; पण कधी-कधी केंद्रातील कारभाऱ्यांची सत्तातृष्णा वाढू लागली आणि आपापल्या पक्षाचा साम्राज्यवाद वाढू लागला, की केंद्र-राज्य संबंधांना धक्के बसू लागतात. असे धक्के अनेकदा बसलेही आहेत. त्यातून सावरण्याचा प्रयत्नही केला गेला आहे आणि काही-काही वेळा त्याची जबरदस्त किंमतही मोजली आहे. अगदी पंतप्रधानांचे प्राण गमवण्यापर्यंत ही किंमत चुकवावी लागली ती पंजाबने सुरू केलेल्या खलिस्तान आंदोलनाच्या वेळी. मंदिरात फौजा घुसवून अतिरेकीवाद मोडून काढावा लागला. संघराज्याचा विकास करताना, तो आखतानाही केंद्राला आपण सुटे नसून एकसंघ आहोत, अशी भावना ठेवावी लागते. राष्ट्र नीट चालावे म्हणून केंद्राला काही जादा अधिकार दिले असले, तरी ते वापरताना गडबड झाली, की संघातल्या कड्या आवाज काढू लागतात. प्रदेश, भाषा, विकास, संस्कृती या नावाने आंदोलने तीव्र होतात. आसाम, नागालँड, पश्चिम बंगाल आदी अनेक ठिकाणी आपण अशी आंदोलने बघितली आहेत.

गेल्या दहा वर्षांत केंद्रातले सरकार भरभक्कम आहे. एकहाती सत्ता त्यांच्याकडे आहे. राजकीय अस्थिरता लोप पावली आहे. या साऱ्या गोष्टी दिसायला बऱ्या वाटत असल्या, तरी केंद्रातल्या पक्षाला देशातील सर्वच राज्यांतील सत्ता आपल्याकडे असावी, अशी स्वप्ने पडायला लागतात. प्रत्यक्षात ती राबवणे शक्य होत नाही. मोडतोडीचे, दबावाचे, प्रादेशिक पक्ष काहीही करून क्षीण करण्याचे राजकारण चालू होते. राज्यांच्या आर्थिक नाड्या आवळण्याच्या प्रयत्नात नवे कायदे येतात. नागरिकत्वाचेही नवे कायदे येतात. जम्मू-काश्मीरचे तीन प्रदेशांत विभाजन होते. जीएसटीसारखा नवा कर आणला जातो आणि वस्तूंवरील सर्व करउत्पन्न दिल्लीच्या तिजोरीत आणि नंतर राज्यांकडे जाते. उत्पन्न वाटप करण्यावरून, ते वेळेवर देण्यावरून वाद होतात, 'एक देश, एक पक्ष, एक कर' किंवा 'विरोधी पक्षमुक्त भारत' अशा घोषणा तयार होतात. पुढे त्याला एक धर्म, एक संस्कृती जोडण्याचा प्रयत्न होतो. अनेक प्रदेशांत यावरून खदखद सुरू होते. ती व्यक्त करण्यासाठी नवे गट-तट, पक्ष जन्माला येतात. केंद्राविरुद्ध प्रदेश असा एक सुप्त सामना तयार होतो. संस्कृतीच्या बाबतीत बहुसंख्य असणारे लोक आपली संस्कृती, आपल्या श्रद्धा अल्पसंख्याकांवर लादण्याचा प्रयत्न करतात. 'जो रामाचे नाव घेतो तो रामजादा आणि जो घेत नाही तो हरामजादा', अशा घोषणा तयार होतात. वास्तव हे आहे, की दक्षिण भारत आणि उत्तर भारत यामध्ये बहुतेक बाबतीत टोकाचे अंतर आहे. एक स्वतःला आर्य समजतो, तर दुसरा स्वतःला अनार्य-द्रविड समजतो. एक रामभक्त, तर दुसरा रावणभक्त असतो. या साऱ्या गोष्टी रुंदावत गेल्या, की मग कलह तयार होतात.

द्रविडस्थानची कल्पना काही नवी नाहीय. ई.व्ही. रामस्वामी यांनी (१८७९-१९७३) उघडपणे ती मांडली होती. द्रविडांसाठी स्वतंत्रपणे द्रविडनाडू म्हणजे द्रविडभूमी असायला हवी, असे त्यांनी म्हटले होते. आपली अस्मिता आणि आपला आत्मसन्मान त्यात

आहे, असे सांगत त्यांनी आंदोलन चालवले होते. मद्रास प्रांताचे शेवटचे मुख्यमंत्री सी.एम. अण्णादुराई यांनीही ही मागणी उचलून धरली आणि द्रविड मुन्नेत्र कळघम् (डीएमके) हा पक्ष काढला. डीएमके याचा अर्थ द्रविडींच्या हिताचा विचार करणारा पक्ष. या पक्षात तुकडे पडत गेले असले, तरी मूळ डीएमकेचा वारसा सांगणारा आणि स्वतःला डीएमकेच समजणारा गट सध्या तामिळनाडूत सत्तेत तर शेजारच्या पाँडिचेरीत विरोधी पक्षात आहे. भाजपला दक्षिण भारत भगवा करायचा आहे. कर्नाटक त्याने केला; पण महत्त्वाचा तामिळनाडू मात्र गळ्यात अडकलेल्या हाडाप्रमाणे ठरतो आहे. केरळ, आंध्र याठिकाणी आणि नव्याने जन्मास आलेल्या तेलंगणामध्येही भगवा चकाकू शकत नाही; पण भाजप प्रयत्न सोडणाऱ्यांपैकी नाही. तसा तो काँग्रेसनेही सोडला नव्हता. भाजपला दिल्ली ते पाँडिचेरी स्वतःची सत्ता हवी आहे. राजकारणाद्वारे ती मिळवता येत नसेल, तर अन्य मार्गही त्यांच्याकडे आहेत. या मार्गाला टक्कर देण्यासाठी तामिळनाडूत आता राज्याच्या आत्मसन्मानाचा आणि स्वायतत्तेचा विचार पुढे येऊ लागला आहे. पहिल्यांदा तो उघडपणे मांडला डीएमकेचे खासदार आंदिमुथू राजा यांनी.

एका जाहीर समारंभातच द्रविडीस्थानला पुन्हा एकदा त्यांनी वाचा फोडली. जर आमची स्वायत्तता, सन्मान नाकारला, तर आम्हाला द्रविडीस्थानकडे जाण्यापासून कोणी रोखू शकणार नाही, असा तो इशारा आहे. एका माजी केंद्रीय गृहमंत्र्याने दिलेला तो इशारा आहे आणि त्यांच्या पक्षाचे सरकार तामिळनाडूत पूर्ण बहुमतात आहे. दक्षिणेकडच्या अन्य राज्यांशी चांगले संबंध ठेवून स्वतंत्र तामिळनाडू देश बनवण्याचे स्वप्न १९ व्या शतकापासूनचे आहे. याविषयीचा अप्रत्यक्ष आवाज तामिळनाडूतील विद्यमान सरकारही उठवते आहे. राज्यांशी सापत्न भावाने वागू नका, असा इशारा डीएमके सरकारने अनेक वेळा दिला आहे. दक्षिणेकडच्या अन्य राज्यांतही अशा प्रकारचे आवाज अधूनमधून क्षीण स्वरूपात का होईना, उमटत असतात. तामिळनाडूने त्रिभाषा सूत्र सातत्याने नाकारले आहे. त्यांना आपल्या तामिळ भाषेलाच प्रतिष्ठा द्यायची आहे. तिच्या विरोधात त्यांना हिंदी भाषा नको आहे. गेल्या दहा वर्षांत केंद्राकडून दक्षिणेला दुर्लक्ष केले जात आहे. उत्तरेकडची संस्कृती त्यांच्यावर हळूहळू लादली जात आहे, अशी भावना तामिळनाडूत तयार होते आहे. या भावनेचा भडका उडण्यापूर्वीच केंद्राने सावध व्हायला हवे आणि राजकारण, विकास व संस्कृती या भिन्न गोष्टी आहेत, हे लक्षात ठेवायला हवे. जी राज्ये सीमेवर आहेत त्यांच्याबाबत अधिक काळजी घ्यायला हवी. भारत एक राष्ट्र आहे याबाबत कुणाच्याच मनात शंका येऊ नये; पण त्याचबरोबर हे भिन्न संस्कृती जतन करणारे राष्ट्र आहे, हेही विसरता कामा नये. राष्ट्रीय एकात्मता आणि ऐक्य हे केव्हाही निवडणूक निकालातून तयार होत नसते, तर परस्परांच्या संस्कृतीचा सन्मान ठेवून ते येत असते. हिंदू राष्ट्रवाद आणण्यास निघालेल्यांनी तर या गोष्टीचा विचार जरूर करायला हवा. स्वतंत्र राज्याची मागणी वेगळी, कारण ती उपलब्ध भूगोलात राहूनच करायची आहे; पण स्वतंत्र राष्ट्र आणि स्वतंत्र प्रदेश, अशा मागण्या डोकावणे याचा अर्थ असाही होतो, की संघपद्धतींमध्येच काही गडबड चालू आहे.



# सीमा पात्राने केलेल्या अन्यायाला ना सीमा, ना लज्जा !

भारतात एकीकडे आदिवासींचा सन्मान वाढवण्याच्या नावाखाली आदिवासी महिला द्रौपदी मुर्मू यांना राष्ट्रपती बनवण्याच्या हालचाली सुरू होत्या आणि त्या अगोदर आठ वर्षे भाजपच्याच महिला मोर्चाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतील सदस्या आणि निवृत्त सनदी अधिकारी माहेश्वर पात्रा यांच्या पत्नी सीमा पात्रा यांनी आपल्या घरातील आदिवासी मोलकरणीचा असा काही छळ केला, की इतका निर्दयी छळ यापूर्वी कोण्या महिलेने कोण्या महिलेचा केला नसावा. सीमा पात्रा राजकारणात आणि बाहेर प्रतिष्ठित म्हणून वावरत होत्या. या प्रतिष्ठेच्या आवरणामुळे आदिवासी मोलकरीण सुनीता खाका हिचा आक्रोश बाहेर पडू शकत नव्हता. सीमाच्या मुलालाच हा छळ पाहताना असह्य झाले आणि आई करत असलेल्या पापाला त्यानेच वाचा फोडली. सीमाने स्वतःला वाचवण्यासाठी स्वतःच्या मुलालाच मनोरुग्ण ठरवण्याचा प्रयत्न केला. तो यशस्वी झाला नाही आणि समाजात, देशात होत असलेल्या लज्जेखातर भाजपने सीमाला पक्षातून निलंबित केले. पोलिसांनी कारवाई करून तिला तुरुंगात टाकले. उद्या ती तुरुंगातून बाहेर पडेल, कदाचित तिला शिक्षाही होईल किंवा कदाचित ती निर्दोषही सुटेल; पण स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांत आदिवासींच्या वाट्याला आलेले यातनामय जीवन, अपमानास्पद जीवन, छळाचे जीवन संपत नाही, संपायला तयार नाही, हेच सिद्ध होते. भाजपमध्ये जाऊन खुर्च्या उबवणाऱ्या कोणाही दलित वा आदिवासी नेत्यांनी याप्रकरणी तोंड उघडलेले नाही. मोफत गॅस घेणाऱ्या आदिवासी महिलेबरोबरचे ज्यांचे फोटो देशभर लावले जातात, त्या कारभाऱ्यानेसुद्धा तोंड उघडले नाही. हा प्रश्न एवढ्याचसाठी गंभीर वाटतो, की कारण अन्याय करणारे आणि ज्यांच्याकडून प्रतिकार किंवा प्रतिक्रियेची अपेक्षा असते, ते जणू काही मिलीजुली भगत झाल्यासारखे वाटतात. अशा घटनांमध्ये राहुल गांधी अन्यायग्रस्तांची भेट घ्यायला जातात, तेव्हा पप्पू म्हणून त्यांना हिणवणारे हेच नेते असतात. सवर्ण भारतीयाला अमेरिकेत गोऱ्या माणसाने अपमानास्पद बोल सुनावले, की हे जागे होतात. अमेरिकेला इशारा देण्यापर्यंत ते जातात. तसे घडायलाच हवे. प्रश्न तोच आहे, की भारतात उच्चवर्णीय सवर्ण

इथल्या दलित-आदिवासींवर तसा किंवा त्यापेक्षा गंभीर अन्याय करतो, तेव्हा यांना दातखिळी का बसते? सगळेच पक्ष दलित-आदिवासींची मते पळवण्याच्या प्रयत्नात असतात; पण या अन्यायग्रस्तांना न्याय, सामाजिक न्याय देण्यासाठी कोण पुढे येणार? दलित नेते आपल्याच समाजात फितूर होऊन व्यवस्थेच्या कच्छपी लागले आहेत. एक तुकडा कुठून तरी आला, की यांचे भागते; पण त्याच तुकड्यासाठी बड्या लोकांकडे नोकरी करणाऱ्यांच्या वाट्याला काय येत असेल, हे पाहण्यासाठी कोणती हेरगिरीची व्यवस्था आणायची, की ईडीचा वापर करायचा!



सीमा पात्रा कोणी सामान्य नाही. एका बड्या अधिकाऱ्याची पत्नीच नाही, तर एकेकाळी आपल्या सौंदर्याच्या अहंकारातून ती बिहारची ड्रीम गर्ल बनण्याच्या प्रयत्नात होती. राजकारणातील काही गब्बर नेते वगळता ती कोणाच्या स्वप्नात जाऊ शकली नाही. तेव्हाचे आरजेडीचे एक नेते जे पुढे चारा प्रकरणात अडकले त्या आर.के. राणा यांनी या बाईला मुंबईत इतके फिरवले, की त्यासाठी वीस कोटी रुपये खर्च झाले आणि तेव्हा हा मुंबई दौरा बातम्यांचा विषय बनला. राणा जेव्हा लोकसभेसाठी १९९१ मध्ये उभे राहिले, तेव्हा त्यांच्या प्रचारासाठी सीमाचे फोटो झळकवण्यात आले. जनता दलात आपली डाळ काही शिजत नाही, हे पाहून त्या काँग्रेसमध्ये गेल्या. तेथेही बस्तान बसेना म्हणून त्या भाजपमध्ये आल्या. एव्हाना भाजपमध्ये शुद्धीकरणाचा कारखाना सुरू झाला होता. भाजपमध्ये एखादा कोणी आला, की त्याच्यावर तीर्थ शिंपडून त्याला रात्रीत शुद्ध केले जाते आणि भाजप बाहेर राहणारा कोणताही सुगंधी स्प्रे शिंपडून घेऊ दे, तो अस्वच्छच राहतो. सीमा शेवटी भाजपच्या किनाऱ्यावर जाऊन थांबली. एवढी मोठी बाई, एवढी कारकीर्द! ती महिलांच्या उद्धाराचे काही तरी करेल, या हेतूने तिला महिलांच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत घेतले गेले. ज्यांच्या उद्धाराची म्हणजे महिलांच्या उद्धाराची जबाबदारी तिच्यावर होती, त्यापैकी एकीचा छळ करून हिने वाट लावली.

सत्ता, संपत्ती, प्रसिद्धी आणि वरिष्ठ जात यांच्या जोरावर बरेच जण अहंकारी बनतात; पण हा अहंकार व्यक्त करण्यासाठी बाहेर कुठे जागा मिळाली नाही, की मग हे घरातल्या नोकरांचा छळ करतात. अशी किती तरी उदाहरणे घडली आहेत. मध्यंतरी पुण्यात एका महिला सनदी अधिकाऱ्याने आपल्या दलित मोलकरणीला जातीच्या कारणावरून कसे छळले हाते, हे अजून ताजेच आहे. सत्ता, संपत्तीच्या जोरावर मस्तवाल, निर्दयी बनणारे आणि घरातील गरीब नोकरांना छळणारे खूप आहेत, तर या सीमाने कसलीही सीमा न बाळगता सतत-आठ वर्षे हा छळ होता. छळ करून सीमा स्वतः कंटाळली की काय म्हणून ती सुनीताला आपली मुलगी वत्सलाच्या घरी कामासाठी पाठवे. तिथेही काम कमी आणि छळ जास्त. बड्या कुटुंबातील या मायलेकींना विकृतीने घेरले होते. गरिबांचा जेवढा जास्त छळ करू तेवढी आपली प्रतिष्ठा वाढणार, म्हणून की काय सुनीताच्या वाट्याला छळाचे वेगवेगळे प्रकार आले. शिव्या, लोखंडी सळईचे चटके, उपासमार, डांबून ठेवणे, गरम तव्याचे चटके, असे सगळे प्रकार झाले, की या मायलेकी बाहेरगावी जाताना तिला डांबून ठेवायच्या. जेथे डांबून ठेवले जायचे, तेथे अन्नपाणी नसायचे. या परत येईपर्यंत ही उपाशीच. सांगता येत नाही आणि सहन करता येत नाही, अशा अवस्थेत ती जगत होती.

सीमाने छळाचे नवनवे प्रकार तयार केले होते, जे माणुसकीला काळिमा फासणारे आणि निर्दयतेला कळसावर पोहोचवणारे होते. दोन-दोन, चार-चार दिवस जेव्हा सुनीताला कोंडले जायचे, नाइलाजाने ती नैसर्गिक विधी स्वतःच्या कपड्यातच करायची. हे मलमूत्र जिभेने चाट आणि कपडे स्वच्छ कर, कामाला लाग, असे सीमा सुनीताला सांगायची. सुनीताला माराच्या, छळाच्या भीतीपोटी हे सारे करावे लागत असे. माणसाने स्वतःच स्वतःचे मलमूत्र खाणे, असा या गोष्टीचा अर्थ झाला. लाजेची, नैतिकतेची, माणुसकीशी संबंध नसलेली आणि विकृत बनलेली सीमा हे सारे रोज करायची. कसला आनंद मिळत असेल, हे तिलाच ठाऊक! रोजची ही छळछावणी तिच्या निवृत्त सनदी अधिकारी पतीला कशी दिसली नाही, हाही एक प्रश्नच आहे. शेवटी हे सारे पाहून वेड्याच्या अवस्थेत पोहोचू पाहणाऱ्या सीमाच्या मुलाने हे प्रकरण बाहेर काढले. छळ करणाऱ्याला काहीच लाज वाटत नव्हती. लाज वाटली ती रोज छळ पाहणाऱ्या पोराला! छळामुळे सुनीताची प्रकृती इतकी खालावली आहे, की दुरुस्त होण्यासाठी काही काळ जावा लागणार आहे. मानसिकदृष्ट्या ती इतकी खचली आहे, की त्यातूनही बाहेर पडायला काही काळ जावा लागणार आहे. आपल्या देशातील युवतीवर अत्याचार झाला आणि ती मरण पावली, की मेणबत्त्या पेटवण्यासाठी गर्दी करणारी काही मंडळी तयार होतात. अर्थात, ते चांगलेच करतात; पण दलित, आदिवासी, अल्पसंख्याकांवर अन्याय होतो, तेव्हा मेणबत्त्या पेटवण्यासाठी गर्दी का होत नाही? अशा वेळी होलसेल मेणबत्त्या पेटवणारे आणि त्यांचे आंदोलनात रूपांतर करणारे मौनात का जातात? दिल्लीतल्या मुख्यमंत्र्यांचा भ्रष्टाचार त्यांना दिसतो आणि दिसायलाच हवा; पण रांचीतील घटना त्यांना का दिसत नाही? राज्यघटनेला हात लावला, तर हा कलम करू, अशा उसन्या डरकाळ्या फोडणारे नेमके कुठे असतात? अजून बरेच काही सांगता येईल...

# वाइफ म्हणजे Wife असे नव्हे, तर वरी इन्हायटेड फॉरेव्हर...

भारतातल्याच नव्हे, तर जगभरातील कुटुंबसंस्था आणि विवाहसंस्थेला घरघर लागली आहे, हे पुन्हा वेगळे सांगण्याची काही एक आवश्यकता नाहीय. पूर्वी सारी कुटुंबे विस्तारलेल्या मुळ्या, फांद्या, उपफांद्या, असा प्रवास करणारी

होती. मग पुढे आठ, त्याच्या पुढे चार, मग दोन, असे करत जगात अनेक ठिकाणी एक सदस्यीय किंवा बिनसदस्यीय कुटुंबे जन्माला आलेली आहेत. ८०-९० च्या दशकात कुटुंबांना अशी घरघर लागली तेव्हा नव्या भांडवलशाहीचे आणि नव्या तंत्रज्ञानाचे आगमन झाले होते. कुटुंबातून मिळणारी सेवा बाह्य जगातून मिळू लागली. कुटुंब म्हणजे ओझे वाटू लागले. कुटुंबात व्यक्तिगत स्वातंत्र्याचा आणि विकासाचा संकोच होतो, असे सांगितले जाऊ लागले. व्यक्ती कुटुंबाबाहेर राहिली, की तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व लाभते, तिचा विकास होतो, कुटुंबात तयार होणाऱ्या गुलामगिरीतून मुक्त होता येते, असेही सांगितले जाऊ लागले. शिवाय नव्या भांडवलशाहीला नव्या ग्राहकांचे जग हवे होते. एकत्रित कुटुंबात कुटुंबाचा म्होरक्याच ग्राहक होतो. कुटुंबासाठी काय, किती आणि कधी हवे, हे तोच ठरवत असतो. कुटुंब फुटले, की त्यातील सर्वच सदस्य ग्राहक होतात. प्रत्येकाला स्वतःचे निर्णय घेण्याचा अधिकार प्राप्त होतो. भांडवलशाही आणि सेवाक्षेत्रांची चंगळ होते. एकत्रित कुटुंब फुटले, की अनेक ग्राहक जन्माला येतात. याचा परिणाम विवाह संस्थेवरही होऊ लागला. लग्न का करायचे इथपासून ते का टिकवायचे आणि मुलेबाळे का जन्माला घालायची इथपर्यंत अनेक प्रश्न तयार होऊ लागले. ज्यांना मुळेबाळे हवीत; पण स्वतःच्या पत्नीपासून किंवा स्वतःपासून नको असे




वाटायचे, त्यांना दत्तक मुले, टेस्टट्यूब बेबी, सरोगसी मदर, असे अनेक मार्ग विज्ञानाच्या विस्तारात तयार झाले. विवाहाचे प्रयोजन काय, एकत्र कुटुंबाचे प्रयोजन काय, असे अनेक प्रश्न विचारले जाऊ लागले आणि तर्कशास्त्राशी मैत्री करतील, अशी उत्तरेही शोधू लागले. केवळ शरीरसुख हेच लग्नाचे उद्दिष्ट असेल, तर असे सुख उपलब्ध करून देणाऱ्या नव्या-जुन्या बाजारपेठाही नव्या भांवडलशाहीत तयार झाल्या. वेश्या व्यवसाय मान्यताप्राप्त झाला. सरळ मार्गाने तो करायचा एक व्यवसाय झाला. बरेच काही घडत गेले, घडणार आहे. विवाहसंस्था आणि तिच्यापासून जन्माला येणारी कुटुंबसंस्था अडचणीत आली आहे. शेवटच्या घटका मोजू लागली आहे.

केरळ उच्च न्यायालयाने घटस्फोट मागण्याच्या एका प्रकरणात तडा जाणाऱ्या विवाह संस्थेचा पुन्हा गांभीर्याने विचार केला आहे. ऐंशीच्या दशकानंतर जगभर वाऱ्याच्या वेगाने पसरलेल्या आणि तेवढ्याच वेगाने रुजू पाहणाऱ्या ग्राहक संस्कृतीलाही याबाबत न्यायालयाने जबाबदार धरले आहे. 'वापरा आणि फेका' हे ग्राहक संस्कृतीचे मूलतत्त्व असते आणि ग्राहकाला सर्वोच्च पदावर नेऊन ठेवलेले असते. म्हणजे तो राजा असतो आणि कोणतेही निर्णय तो घेऊ शकतो. त्याच्या मते सारे निर्णय त्याचे असतात. म्हणून ते योग्य असतात. वस्तूला लागू होणारा सिद्धांत पुढे जाऊन व्यक्तीलाही लागू होऊ लागला. जशी वस्तू वापरून फेकायची आणि नवी आणायची, तशी व्यक्तीही वापरून फेकायची आणि नवी आणायची. मोबाइलचा एकच हॅण्डसेट किती दिवस वापरायचा तसा आयुष्यात जोडीदार म्हणून येणारी ती किंवा तो किती दिवस वापरायचा? कुछ नया हो जाए, कुछ अलग हो जाए... असे भांडवलशाहीने तयार केलेले सुविचार तो आळवू लागला. घटस्फोटासाठी नवनवी कारणे पुढे येऊ लागली. ती किंवा तो घोरतो इथपासून ते तो किंवा ती परस्परांना मॅच होत नाही, इथपर्यंत अनेक कारणे न्यायालयात आणली जात आहेत. एकदा का ग्राहकसिद्धांत व्यक्तीला लागू झाला, की तिचेही स्वाभाविकच वस्तूत रूपांतर होते. व्यक्ती आणि वस्तू बनलेल्या व्यक्ती यांच्यात टकराव होऊ लागतो. व्यक्तीनेच तयार केलेल्या संस्थांना तडे जातात. इथे कोण कुणाचा नसतो, तर आपणच आपले असतो, हे कोणते तरी धंदेवाईक बाबाचे सूत्र सांगितले जाते. माणूस कळपापासून तोडला जातो.

पत्नी आणि पती या नात्याचे जेवढे गौरवीकरण आणि महत्त्व जगाच्या संस्कृतीत सांगितले आहे तेवढे अन्य कोणत्या नात्याचे सांगितले नसावे. केरळ न्यायालयाने वाइफ या शब्दाचे नेमके काय झाले आहे किंवा होत आहे, यावर मार्मिक भाष्य केले आहे. वाइफ या शब्दाचे स्पेलिंग Wife असे आहे; पण आता त्याचा विस्तार Worry Invited Forever असे झाले आहे. पत्नी म्हणजे कायमसाठीची ब्याद, त्रास, डोकेदुखी वगैरे-वगैरे मानले जात आहे. कुटुंबसंस्था टिकली पाहिजे, असेच कोणीही म्हणेल. तिच्या स्वरूपाबाबत मतभिन्नता असू शकते. मनुष्य हा तसा अन्य प्राणी आणि पक्ष्यांपेक्षा दुर्बल असतो. त्याला चालायला, बोलायला दोन अडीच वर्षे लागतात. तो संगोपनाचा धनी असतो. तो बरेच काही कुटुंबाकडून घेतो. त्याच्या सर्व प्रकारच्या विकास प्रक्रियेत कुटुंब असतेच. आता तेच डिलिट करणार असेल, तर जग व्यक्तीऐवजी आकृत्यांचे आणि व्यक्तीऐवजी सतत बाजारात फिरणाऱ्या ग्राहकांचे होईल, याविषयी कुणाला शंका असणार नाही. ●●●

**– पंक्चरवाला**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2020-22
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

With Best Compliments





Sos. Agrotech Pvt.Ltd

